म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. १९६०

# शतपावली

REFBK-0017292

मधुकर

१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९६०

१५२९२

श|त|पा|व|ली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# श|त|पा|व|ली

**मधुकर**

REFBK-0017292

**मौज प्रकाशन गृह**
खटाववाडी, मुंबई ४

मौज प्रकाशन : १७२

पहिली आवृत्ती : फेब्रुवारी १९६९

© १९६९, सौ० मीना जावडेकर

किंमत पाच रुपये

मुखपृष्ठ :
केशव फडके

प्रकाशक :
वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

लघुनिबंधकार

प्रा० गो० वि० करंदीकर

यांना

| | |
|---|---|
| संध्यासमयी सागरतीरी | १ |
| कायदा, हातभट्टी आणि मी | ६ |
| लहान ती चोरी, मोठी हुषारी | १२ |
| पुणेकर आणि बंबईवाला | १७ |
| माझी दिनचर्या | २५ |
| एक शहाणा, काही वेडे | ३० |
| मागचे पाहून घेतील | ३६ |
| छळवादी | ४० |
| अजिंठा आणि 'वारूळ' | ४५ |
| प्राणिसंग्रहालयात मी | ५१ |
| मा निषाद | ५५ |
| माझे पहिले व्याख्यान | ६० |
| सद्‌गुणांचे व्यसन करणारा चारुदत्त | ६६ |
| मृत्यूचा गोल | ७२ |
| पंचतंत्राचा नायक | ७७ |
| मी आणि माझे व्यक्तिमत्त्व | ८२ |
| कोश करून राहिलेले शब्द ! | ८७ |
| क्षितिजे दूर गवाक्षाची... | ९२ |
| शतपावली | ९७ |
| शब्द बोलतात... | १०३ |
| शब्दवेध | १०८ |
| मिळाली तर दया, खपली तर माया, पचली तर चोरी ! | ११३ |
| अखेर सारी सौदेबाजी | ११८ |

पूर्वप्रसिद्धी

मनोहर, मेनका, हंस, वसुधा, नवे जग, साधना, माहराष्ट्र टाइम्स, नवशक्ती इत्यादी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक .......................... नों. दि .............
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स. क्र. १८२९२
संग्र. शाखा

# संध्यासमयी सागरतीरी

तसा माझा काव्यावर राग नाही. वेळीअवेळी मी क्वचित गाणे गुणगुणतो आणि माझे हे गुणगुणणे ऐकून इतरेजन मला कवीही समजतात. पण मला कधीच त्यात अर्थ वाटला नाही. कविता गुणगुणायची तर आत्म्याला जाग यायला हवी आणि आत्मा सजग व्हायचा तर डोंगरांनी आपल्यासाठी आकाशघंटा बडवायला हव्यात! हे काही होत नाही आणि जेव्हा होते तेव्हा ते आपल्या कानांपर्यंत पोचत नाही. मग त्या गुणगुणण्याला अर्थ राहात नाही आणि माझा मीच आदळआपट करीत बसतो. लोक म्हणतात की, मला काव्य कळत नाही म्हणून मी काव्यावर रागावतो. पण खरेच सांगतो की माझा तसा काव्यावर राग नाही.

माझा काव्यावर राग असता तर मी या लेखनाला वरीलसारखे काव्यमय शीर्षक का दिले असते? खरे तर ते शीर्षक मला नापसंतच होते. पण दुसरे काही आठवेना तेव्हा ते पत्करावे लागले. असले शीर्षक दिल्यावर 'अस्ताचलास जाणाऱ्या भास्कराचे' वर्णन करण्यास मी बांधला राहातो आणि 'भूमातेचे चरणतल धुणारा' सागर, मी त्याच्याविषयी काही लिहावे अशी अपेक्षा करतो. आणि मला तर यातले काहीच करायचे नाही. कारण मला तसले काहीच 'त्या तिथे' तेव्हा एकदा दिसले नव्हते! म्हणून मला 'संध्यासमयी सागरतीरी' हे शीर्षक टाळायचे होते. पण ते टळले नाही.

आणि मी ते टाळणार होतो म्हणूनच केवळ माझा काव्यावर राग आहे असे सिद्ध होत नाही. संध्यासमयी सागरतीरी सागर स्तब्ध भासत होता आणि वाळूचा प्रचंड किनारा मशिदीत मुसल्मान करतात तसली प्रार्थना तारस्वराने करीत होता! सागर स्तब्ध होता म्हटल्यावर असे वाटेल की, मी शरद-हेमंतातला सागर पाहिला असावा. तसे नाही. अगदी वर्षाऋतूतला भयंकर खवळलेला काळानिळा सागर पाहूनही मला त्याच्या तांडवाचे कौतुक वाटले नाही. कारण त्याचे ते तांडव मुळी तांडव नव्हतेच. कणाकणांतून वाळू जो आकांत करीत होती त्या मानाने सागराचा आक्रोश डोळ्यांत टिपूस नसताना ऊर बडवून रडणाऱ्यांच्या भाडोत्री शोकासारखा एकदम कर्णकटू वाटत होता.

त्या संध्यासमयी सागरतीरावर बरीच वर्दळ होती. पाऊस अजिबात नव्हता. दिवसभर चक्क ऊन पडले होते. प्रेमी युगुले, विवाहित जोडपी, स्नेहांकित कुटुंबे आणि असेच 'दिल बहलानेके लिये' जमलेले नाना रंगाचे नाना लोक. एवढा जमाव गोळा झालेला पाहून तरी त्या विशाल सागराने आपले गांभीर्य टिकवावे की नाही? पण छे. पाहुणे मंडळी जमल्यावर घरातले एखादे चुणचुणीत पोर आपली हुशारी दाखवायला जशी आगाऊ वटवट आणि खटपट करील तसाच त्या संध्यासमयी सागराचा एकूण आवेश आणि आटापिटा मला भासला होता.

शतकानुशतके विश्वाने साठवलेल्या अनुभवाचा अर्क म्हणजे, वास्तविक पाहाता, सागर! पण त्याच्या चेहऱ्यावर इतका अवखळपणा का दिसतो ते मला समजत नाही. त्याने कितीही थयथयाट केला आणि स्वतः उरी फुटत असल्याची बतावणी केली तरी ती नेहमी 'बतावणी'च भासते. ज्याला घालून दिलेल्या मर्यादा कधी ओलांडताच येत नाहीत तो कसला अमर्याद? नदीचा सरळ रेषेतील धावता वेग आणि मनात आले तर बैलाएवढे अंग फुगवणाऱ्या बेडकीसारखी तिची आपले तीर फुगवण्याची उन्मत्त आकांक्षा सागराला कधी भावतच नाही. पर्वतासारख्या म्हणे त्याच्या लाटा प्रचंड असतात! तरीही त्याची उडी जाऊन किती लांबवर जाणार ते सगळ्यांना ठाऊक असते. आणि म्हणूनच भुईतून वर आलेली चिमणी पोरेसुद्धा खुशाल त्याची मस्करी करतात. त्याच पोरांची एखाद्या छोट्या नदीजवळ जाण्याची प्राज्ञा नाही. गुरगुरत लाटांचा धुमाकूळ घालणारा प्रचंड (!) सागर आणि

चिमण्या पोरांचे केळीच्या कोंबासारखे पाय यांच्यामध्ये त्याच्या पाण्याचा फक्त फेस पसरलेला असतो !

त्या दिवशी त्याचा तो शुष्क खळखळाट ऐकून मी नेहमीप्रमाणे त्याच्याकडे पाठ फिरवली आणि वाळूच्या लांबलचक किनाऱ्यावर शतपावली घालू लागलो. ओलसर वाळूत अनेक ठसे उमटले होते. पावलांचे, पादत्राणांचे, व्यक्तिमत्त्वांचेही. तुरुतुरु चालत गेलेली लांबलचक ठशांची रांग, एकाच ठिकाणी घोटाळलेली पावलांची नर-मादी, व्यायामाच्या उद्देशाने नाकासमोर केलेले 'लेफ्ट-राइट' आणि वाळूची झोपमोड होऊ नये म्हणून अगदी अलगदपणे तिच्यावर उठवलेली पावलांची खूण ! डाव्या बाजूला विस्तीर्ण वाळवंटावर माणसाचा अपक्व अनुभव लटपटती पावले टाकीत होता तर उजव्या बाजूला क्षितिजापर्यंत पोचलेला अवखळ सागर माणसाची अनुभूती जरा कुठे आकार धारण करू लागली की तिच्यावर पाणी ओतीत होता ! डाव्या हाताला 'जडाच्या जांभया' होत्या तर उजव्या हाताला चेतनेचा हुंकार होता. आपले आळून बसलेले विचार प्रवाही व्हावेत अशी अपेक्षा असेल तर संध्याकाळी सागरतीरावर जाऊन बसावे... लाटांच्या तुषारांत मनाचे पंख भिजवून घ्यावेत...वाळूवर उमटलेल्या कोणत्या पावलांत आपले पाऊल बसू शकते ते नीट पाहावे...आकाशातून उडणाऱ्या बगळ्यांच्या माळा गळ्यात बांधाव्यात...अंधार पडल्यावर झोपलेल्या वाळूच्या अंगावर समुद्राची दुलई अगदी गळ्यापर्यंत ओढून घालावी आणि पाऊल न वाजवता पुन्हा घरी परतावे...संध्यासमयी सागरतीरी जाऊन बसल्यावर मनाच्या माळावर असलेल्या त्या जीर्ण शिवालयात परतीच्या घंटा किणकिणू लागतात. सूर्याची समयी मंद तेवत असते आणि धाबळी नेसलेला सागर त्या मंद प्रकाशात भरड्या आवाजाने 'गाथा' वाचीत असतो. विझण्यापूर्वी ज्योत मोठी व्हावी तसा सूर्य तीन वेळा तांबडालाल गरगर फिरतो आणि मुठीत नाक धरून गंगास्नान करण्यासाठी बुडी मारणाऱ्या कर्मठाप्रमाणे अवचित समुद्रात बुडी मारतो. सारे संपते. किट्ट काळोखात चांदण्या डोळे मिचकावीत राहातात तेवढ्याच !

संध्याकाळी सूर्य समुद्रात बुडताना पाहिल्यावर 'पाण्यात राहून कोरडे कसे राहावे' ते चांगले समजते. दिवसभर त्याने विश्वाचा व्यवहार टक्क डोळ्यांनी

पाहिलेला असतो आणि संध्याकाळी अनुभवाचे ओझे पाठीशी घालून तो रात्रीच्या निवाऱ्यासाठी समुद्राच्या पांघरुणाखाली दडतो. पण समुद्रात बुडी मारताना पाण्याचा थेंबही त्याला चिकटत नाही हे तुम्ही पाहिले आहे काय? तेजाचा गोळा आणि पाण्याचा सागर यांचे इतके शांततामय सहजीवन पाहिले की अचंबा वाटतो.

संध्याकाळी सागरतीरावर जाऊन बसलो की मनातील हूरहूर छाती फोडून बाहेर येऊ पाहाते! विशाल सागर समोर पाहून मी फक्त 'एका ठिकाणी' धपकन बसू शकतो याचे मला वाईट वाटते. माझ्या अस्तित्वाने वायुरूप धारण करावे आणि सबंध सागरावर विहरावे अशी माझी तडफड असते. आकाशाचा डोह आणि सागराचा पसारा पाहिला की, माझ्या जाणिवेच्या कक्षेबाहेर केवढा तरी अनुभव अजून अस्पर्शित आहे, अनाघ्रात आहे ते समजते आणि माझ्या शरीरातील रक्तबिंदू व्याकुळतेने नाचू लागतात. सागराच्या पलिकडे कुठेतरी महात्म्याचा आत्मा समाधिस्थ आहे तो मला पाहायचा आहे. आकाशाच्या घुमटाखाली कुठेतरी जाणीव पंख पसरून तरंगत आहे ती मला कवळून घ्यायची आहे...वाळूचा किनारा अजून सुटत नाही म्हणून तगमग होते...एक पाय किनाऱ्यावर वाळूत रोवला आहे आणि दुसरा लाटांच्या पोटात मगरीने गिळावा तसा आत आत जात आहे. पायाखालची वाळू घसरत आहे तरी माडासारखा मी उंच उंच होतो आहे आणि माझे मस्तक आकाशाला भिडत आहे...निदानपक्षी सूर्याचा लाल गोळा तरी माझ्या कवेत यावा असे वाटते...पण तोवर पाय अधांतरी झाले आणि मीच पाण्यात पडलो आहे...आता सागर पुन्हा मला किनाऱ्यावर फेकून देईल...

...एक अजस्र डोंगर सागरात घुसला आहे. डोंगराच्या नाकाडावर एक तांबडा दिवा उघडमीट करतो आहे. दाक्षिणात्य देवदासीच्या नाकात चमकी चमचम करते तसे वाटते आहे. पसरणाऱ्या सागराला अजस्र डोंगर नेहमीच तांबडा दिवा दाखवतात. तरीही तो त्यांना धडका मारतो. डोंगरांचे बुरूज फोडून सागर आत घुसेल तेव्हा कड्याकड्यांवर बांधलेले तटस्थतेचे मोर्चे ढासळतील. मी डोंगराच्या माथ्यावर पाय खाली सोडून कधीचा बसलो आहे. सागर तिथपर्यंत पोचेल तेव्हा मी डोंगराची नाव करून सागरपार होईन! सागरपार काय असेल? पाण्याच्या डबीवर आकाशाचे झाकण. मी

अवचित आत घुसेन. कालांतराने माझा पाणीदार मोती होईल. संध्याकाळी अद्‌भुतदर्शनाला निघालेल्या यामिनीच्या नाकात तो चमकेल !

एकदा संध्याकाळी सागरतीरावर मी बसलो असताना माझ्या डोळ्यां-देखत आकाशाचा अर्धवक्र घुमट पसरून सपाट होणार आहे आणि त्याचा पातळ थर समुद्रावर बसणार आहे. म्हणजे मग समुद्रावरून दुडदूड धावता येईल. आकाश वितळले तरच समुद्राचे पाणी पुन्हा वाहू लागेल. पण शेवटपर्यंत मी वाळूची संगत सोडणार नाही. सागर एकसारखा बोलत असतो तेव्हा त्याच्या शब्दांना नेमका आणि एकच अर्थ असतो. वाळूचे मूकपण मात्र अत्यंत मुखर असते. सागर फक्त ओठाने बोलतो, वाळू उभ्या अस्तित्वाने बोलते. व्रात्य मुलाच्या आरोळीपेक्षाही वृद्ध आजोबांची करडी भुवई अधिक ताकीद देते. शब्दापेक्षा भाव अधिक सामर्थ्यवान असतो.

म्हणून मी वाळूची संगत सोडणार नाही. वाळू म्हणजे ब्रह्माचा हुंकार. सगळे ध्वनी पचवून ती शांत उरते. त्या जिवंत शांतीच्या पोटी माझ्या सगळ्या व्यथा सशब्द होतात. सागर एकसारखा वाद घालतो आणि मग समज फक्त ओठांवरच घोटाळत राहाते; पोटात शिरत नाही. पण वाळू सारखी समजून घेते आणि त्या समजानंतर येणारी नितांत सहानुभूती तिच्या डोळ्यांत उमटते. सागराची उथळ बटवट केवळ वाळूनेच सोसून घ्यावी. तिच्या कुशीतून जन्मलेले माड तिला फितूर आहेत. तिला टाळून ते आकाशाशी कुजबूज करतात. प्रसंगी सागराच्या मसलतीत सामील होतात. पण तेही वाळू शांतपणे साहते. तिचा ऊर इतका विशाल आहे की चेतनेचे अनंत अपराध ती सहज उरी सामावून घेते.

मी डोंगराला भीत नाही, कारण काहीही सहजपणे त्याच्या डोक्यात शिरतच नाही. मी सागराला डरत नाही, कारण काहीही त्याच्या मनात ठरत नाही. या दोघांच्या संगतीत मी उघडा होत नाही; उलट, मलाच त्यांचे गूज स्पष्ट कळते. पण मी वाळूसमोर आरपार उघडा पडतो. तिच्या आत्यंतिक सघन शांतीत माझ्या मनातील शब्दन् शब्द उघडा पडतो आणि तो जाणल्यावर वाळूच्या मिस्किल डोळ्यात जी छटा येते तिला मी नजर देऊ शकत नाही !

# कायदा, हातभट्टी आणि मी

मी दिवसभर नोकरी करून आपले आणि कुटुंबाचे भरणपोषण करतो. ज्या बड्या व्यापाऱ्याकडे मी नोकरी करतो तो अन्नधान्याचा व्यापार करून पैसा मिळवतो. माझा शेजारी गावातला एक मध्यम श्रेणीचा राजकीय पुढारी आहे. तो काय करतो ते माहीत नाही, पण त्याचे आणि त्याच्या मुलाबाळांचे संगोपन अगदी उत्तम प्रकारे 'होत असते'. दुसरे एक मित्र वकिली करतात आणि आमच्या सर्वांच्याच समोर राहाणारी तीन कुटुंबे दारू गाळण्याचा धंदा करून आमच्या सर्वांचे भरणपोषण होईल इतका पैसा मिळवतात !

आमच्या सर्वांचा मिळून एक समाज बनतो आणि त्याच्याच कक्षा वाढल्या की देश, राष्ट्र वगैरे जे काय म्हणतात ते होते. समाजाचे जीवन सुरळीत चालावे म्हणून कायदे केले जातात. ते कायदे सर्व घटकांनी पाळावे अशी अपेक्षा असते आणि या कायदेपालनावर जागरूक देखरेख ठेवून कायदा मोडणाऱ्यास शासन करावे यासाठी पोलीस नियुक्त केले जातात.

आधुनिक सुरक्षित समाज, कायद्याचे राज्य, न्यायाची चाड व शाश्वती वगैरे जे काही आपण म्हणतो ते सारे हे असे असते. अशी समाजसंघटना निर्माण केल्यावर त्या संघटनेतील प्रत्येक घटक आपापले नेमून दिलेले काम बिनबोभाट करील म्हणता काय ? मुळीच नाही. आणि इथेच सारा इमला कोसळून पडतो. 'कायद्याचे राज्य' याचा अर्थ 'सर्व काही कायदेशीरपणे

चाललेले' असा नसून 'कायद्याची चौकट संभाळून हवे ते करा' असा लावला जातो. हा अर्थ सगळ्या घटकांना चांगला ठाऊक असतो; पण त्या चुकीच्या अर्थाबद्दल कोणी तोंड उघडू शकत नाही, बोलू धजत नाही, असे आपल्या अनुभवास सतत येत नाही काय ?

परवाचेच पाहा ना !

आमच्या मालक शेठजींनी आजच्या अन्नदुष्काळाच्या दिवसांत अन्नधान्यात भेसळ, काळाबाजार आणि साठेबाजीसारखे सारे नियमबाह्य व्यवहार करण्याचा सपाटा चालवला तेव्हा साहजिकच मला अस्वस्थ वाटू लागले. मी माझी अस्वस्थता शेठजींना बेताने कळवली तेव्हा ते म्हणाले, "अरे देशपांडे-काका, धंदामंदी असा भावना आणून चालेल कसा? धंदा म्हणजे धंदा. तिथं कवळा मन काय कामाचा बाबा? हे सरकार साला आमचा गळा घोटते तर आम्ही काय धान्याची गुदामं उघडून अन्नसत्र घालावा का काय? तुमी बी कसली वार्ता करते ही असली !"

आणि मला शेठजींचे ते भाष्य पटले नाही तरी माझ्या उपजीविकेसाठी मला नोकरी करणे भाग असल्याने, मी मनात अस्वस्थ होऊन, शेठजींना एकदा विनंती करण्यापेक्षा अधिक काही केले नाही. माझे दररोजचे काम थोडी थोडी झोपमोड होत चालू राहिले.

आमचे शेजारचे 'पांढरे' पाटील आजच्या काळातील चालू पुढारी. खणकन वाजणारे नाणे. सगळी पथ्ये निवांतपणाने पाळून त्यांनी आपल्या 'व्यवसाया'ला चांगलीच बरकत आणली होती. आम्ही सारे त्यांना बिनबोभाट आपले पुढारी समजून भोजनोत्तर होणाऱ्या दैनंदिन राजकारणचर्चेत (ते जेव्हा सफरीवर नसत तेव्हा) त्यांची राजकीय मते आवर्जून ऐकत असू. दोन दिवसांपूर्वीच ते म्हणाले, "सारा समाजच आज किडला आहे. सत्य, अहिंसा राहिली कागदावर. आमचा पक्षच काय ते हे सुधारू शकेल. महात्मा गांधींचा वारसा आमच्याकडं—"

स्वभावात असलेल्या उतावळेपणाच्या दोषामुळे नेहमीप्रमाणे त्यांचे मूल्यवान भाषण पुरे ऐकून घेण्याआधीच मी म्हणालो, "पाटीलजी, आपल्या त्या शेजाऱ्यांचा 'तो' व्यवसाय फारच वाढला आहे हो. रात्र-दिवस आंबट वास येत असतो. महिन्याकाठी उदबत्त्यांचा खर्चच दहा-पंधरा रुपये होतो.

कसा परवडणार आमच्यासारख्यांना ? त्यांचा काही बंदोबस्त—"

आपले तीनमजली सफेत हास्य जरा जास्त उत्साहाने करून पुढारी म्हणाले, "हे बघा अनंतराव, मला विचाराल तर ही दारूबंदी-बिरूबंदी म्हणजे सगळं झूट आहे. अहो, आहे काय त्यात ? असं कुठं झालंय ?"

"तुम्हांलाच विचारतोय ना. आम्ही आणखी वर कुठं कुणाला विचारणार ? तेव्हा काही इलाज करून—"

"छेः छेः, इलाज कसला करताय ? त्यांचे लागेबांधे वरपर्यंत आहेत. काही उपयोग व्हायचा नाही. हे असंच चालायचं !"

"अहो, पण तुम्हीच आता म्हणालात ना त्या सत्य, अहिंसेबद्दल काही तरी ? शिवाय तुम्ही गांधींचे वारस—"

"अहो, ते खरं हो. पण एकटादुकटा काय करणार तिथं ? सगळा समाजच वरपासून खालपर्यंत किडलाय. सगळी सिस्टीमच बदलायला पाहिजे."

"ते बरोबर आहे. आपल्यासारख्यांनी पक्षाच्या सभेत प्रस्ताव मांडून काही केले तर—"

"ना–ना–ना. भले ! अहो आम्हीच पक्षशिस्त मोडली असं व्हायचं. सोबती आम्हांला राजकारणातून उडवायला टपलेलेच आहेत की ! हे राजकारण म्हणजे तुम्हांला नाही समजायचं अनंतराव. फार भयंकर असतं ते !"

झाले. व्यापारातले मला काही कळत नव्हते. राजकारणातले काही उमजत नव्हते. पण मलाही समाजाचा घटक म्हणून जगायची इच्छा असल्याने गप्प बसणेही शक्य नव्हते. तसाच उठलो आणि वकीलसाहेबांच्याकडे गेलो. त्यांची पोलिसलोकांशी ओळख असते या भोळ्या समजुतीने त्यांना म्हणालो, "वकीलसाहेब, हातभट्टीचा उपसर्ग आपल्याला हल्ली फार होतोय हो. पोलिसांना सांगून काही उपाय करायला नको का ? आपल्या मुलाबाळांना धोका व्हायचा एखादे वेळी !"

माझे म्हणणे शांतपणे ऐकून आणि या प्रकरणात आपल्याला कसा आणि काय लाभ होणार याचा अंमळ विचार करून मग ते निराशेने उत्तरले, "मि० देशपांडे, जोवर तुम्ही त्यांच्या भानगडीत पडत नाही तोवर तुम्हांला त्यांच्यापासून काही धोका नाही. काळजी करू नका. दे आर दॅट वे गुड नेबर्स !"

"अहो, पण त्यांचा तो भयंकर धंदा?"

"करीनात. तुमचं काय जातं त्यात? उलट, आमच्या मात्र पोटावर पाय यायचा ते नाहीसे झाल्यावर."

"म्हणजे? तुमचे ते पक्षकार?"

"अलबत. अहो, गुन्ह्याचे अड्डे म्हणजे तर आमचं चराऊ कुरण. त्यांचा धंदा ठीक चाललाय, आमचं बरं भागतंय. समाजसुधारणेचा उपद्व्याप हवा कशाला तुम्हांला न् मला?"

'लावी पक्षीण आणि तिची पिले' हा धडा मग मला आठवला. (आठवावेत व आठवणे भाग पडावे असे पुष्कळ धडे होते आमच्या वेळच्या बालपुस्तकात. किंबहुना असले काही आठवून आजच्या समाजातील व्यक्तींना निष्कारण मानसिक ताप सहन करावा लागू नये म्हणूनच आजच्या पुस्तकातून ते धडे गाळले असावेत. मुलांना फक्त 'चालू साहित्याची सर्वांगीण समज' यावी अशीच आजच्या काळातील एकमेव गरज असावी बहुतेक!)

तेव्हा लावी पक्षिणीचा आदर्श समोर ठेवून नंतर मी स्वतः घरातून उठलो आणि हातभट्टीवाल्यांच्या म्होरक्यांना जाऊन भेटलो. माझ्या आयुष्यातले ते एकमेव धाडस होते. त्यांचा गैरसमज होऊ नये म्हणून प्रथमच स्पष्ट केले की, माझे मतभेद त्यांच्या उद्योगाबद्दल मुळीच नव्हते. तक्रार त्यांनी दारू गाळल्याबद्दल नव्हती. असेलच कशी? कारण सगळा समाजच किडला होता. व सगळी सिस्टीमच बदलायला पाहिजे होती. अगदी वरपासून खालपर्यंत. तेव्हा सर्व सिस्टीम बदलून होईपर्यंत त्यांना चिंता करण्याचे कारण नव्हते आणि मलाही त्यांनी एकट्यांनी बदलावे असे सांगण्याचा नैतिक अधिकार नव्हता. तेव्हा ते सारे ठीक होते. पण त्यांनी अगदी उंबऱ्यावरच अहोरात्र भट्ट्या लावल्यामुळे पोलिसांना नसला तरी आम्हांला सारखा आंबट, घाण दर्प येत होता. जेवण, झोप या गोष्टी अगदी अशक्यच झाल्या होत्या. तेव्हा त्याबाबतीत त्यांनी काही सुधारणा केली तर बरे होईल, असे माझे म्हणणे होते. म्हणजे प्रश्न तत्त्वाचा नव्हताच. तत्त्व अगदी शाबूत स्वयंसिद्ध होते. प्रश्न काय तो तपशिलाचा होता, एकमेकांनी एकमेकांची सोय पाहाण्याचा.

विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण तो पुढारी आणि त्याचा गोतावळा नागाच्या शेपटीवर पाय पडल्यासारखा चवताळून आला आणि मला म्हणाला, "साहेब, आज वीस वर्षं मी धंदा करतोय. भट्टी लावतोय. वीस वर्षांत मी कुणाला त्रास दिलाय असं एकाही पोलिसानं कधी म्हटलं नाही की एकाही शेजाऱ्यानं कधी तक्रार केली नाही. आपण नीतीनं धंदा करणारी माणसं. कोण उघड्यावर भट्ट्या लावतंय ते तुम्हीच बघा आणि त्या साफ उखडून टाका. धंद्याला काळिमा लावतात साले हे लोक! आपण वीस वर्षांत असं कुणाचं काही कधी ऐकून घेतलं नाही, समजलं?"

खरे म्हणजे व्यापार आणि राजकारण यासारखे हे नीतिशास्त्रही मला समजत नव्हतेच. कायदा मोडून ओळीने वीस वर्षे हातभट्टीच्या धंद्यावर जोगावणारा तो माणूस त्याच्या नैतिकतेची शंका घेतल्याबरोबर सात्त्विक संतापाने खडबडून जागा झाला होता. त्याच्या चेहऱ्यावर, तो बोलत होता त्यामागचा प्रामाणिकपणा व पोटतिडीक यांचे स्वच्छ प्रतिबिंब पडले होते आणि कायदा, नीतिमत्ता, सत्यप्रीती व सदाचार या मूल्यांचा परस्परात झालेला तो गोपाळकाला पाहून मी मात्र थक्क झालो होतो व तसाच घरी परतलो होतो.

तथाकथित मूल्ये तर परिस्थितीनुरूप उलटीपालटी होतातच पण कायद्याचे पालन कसे करायचे तेही बाह्य परिस्थितीवर अवलंबून असते म्हणायचे. कायद्याची चौकट उभारली असते ती त्या चौकटीच्या आत हवा तो धुडगूस घालता यावा म्हणून की काय? गुन्हा होऊ न देणे किंवा घडल्यावर. गुन्हेगार हुडकून काढणे ही कामे करण्यापेक्षा गुन्ह्याची तक्रारच कुणी आणू नये आणि उघड गुन्हे शांततेने चालतील तर तिकडे कानाडोळा करावा असा पोलिसांचा हिशेब. कायदे करणारे म्हणतात की कायदे केलेच पाहिजेत. त्याशिवाय सुधारणा कशी होणार? पण त्यांच्या पालनाबद्दल मात्र विशेष हट्ट असू नये; कारण सबंध समाजच किडलेला आहे आणि संपूर्ण 'सिस्टीमच' बदलली पाहिजे. वकील म्हणतात, कायदा आणि लोक यांच्यामध्ये एकसारखी लढत असलेली बरी, म्हणजे त्यांचा उदरनिर्वाह ठीक चालण्याची शक्यता आणि कायदे मोडणारे म्हणतात—

ते काहीही म्हणोत. मी मात्र शांतपणे सगळ्या परिस्थितीचा पुनर्विचार

केला आणि पूर्ण वेळाचा नसला तरी अर्ध वेळाचा म्हणून हातभट्टीचा धंदा स्वतःच सुरू करावा या निष्कर्षाप्रत आलो. पण मी काहीच करू शकलो नाही. कारण—

मला व्यापार कळत नाही, राजकारण उमगत नाही, कायदापालनार्थ प्राण पणाला लावणे झेपत नाही, तसेच हातभट्टीच्या धंद्यातलेही काही समजत नाही.

# लहान ती चोरी, मोठी हुषारी

माणसाचे मन म्हणजे एक अजब चीज आहे. किंवा आपण असे म्हणू की, माणसावर लहानपणापासून होणारे संस्कार इतके विविध असतात व त्यांचा त्याच्यावर होणारा परिणाम इतका अतर्क्य व खोलवरचा असतो. की त्या संस्कारांतून मूर्तरूप घेणारे हे त्याचे मन कसे तयार होईल ते आगाऊ सांगताच येत नाही.

समर्थ माणसांचा अहंकार बालपणीच जर दुखवला गेला, तर जगाच्या नरडीचा घोट घ्यावा, असा वैताग त्यांच्या मनात निर्माण होतो आणि ते तसे करतातही. खूप दारिद्र्य लहानपणी भोगले तर प्रौढपणी आपल्या हातून दुसऱ्यांची जेवढी म्हणून गरिबी दूर करता येईल तेवढी करावी, असा मनाचा पिंड बनला तर नवल नाही. स्वतः सासूचा फार जाच सहन केल्यावर ती सून जेव्हा सासू बनते, तेव्हा आपल्या सुनेशी ती वाजवीपेक्षा जास्त मायेने वागत असल्याची उदाहरणेही सापडतात.

ते असो. ज्याचा आपल्याला अधिक चमत्कार वाटावा अशी मात्र दुसरीच एक गोष्ट आहे. ती सद्‌गुण आणि नीतिमत्ता या बाबतीतील. मोठ्या प्रमाणावरचा खोटेपणा, लबाडी किंवा अनीती सहज हातून घडावी, निदान घडलेली पाहात असताना फारसा विषाद वाटू नये, पण लहानशी तसलीच चूक घरात कुणी केली तर रणकंदन माजावे, असेही पुष्कळ वेळा घडते. या

प्रकाराचा केवढातरी विस्मय वाटायला पाहिजे, पण वाटत नाही हे मात्र खरे.

परवा लोकलगाडीत फर्स्ट क्लासमध्ये एका शेठजीला तिकीट नसल्याबद्दल चेकरने पकडले. शेठजीने तिकीट काढले असावे आणि ते गहाळ झाले असावे. तिकीट मागितल्यावर, त्याने आपल्या डगल्याचे आतबाहेरचे खिसे चाचपले आणि तिकीट सापडत नाही असे पाहून चेकरला "पैसे किती भरू?" असा सरळ सवाल केला. चेकरने पैसे घेऊन मुकाट्याने पावती द्यावयाची, त्याऐवजी त्याने 'कसा चोर पकडला' असा उपहासाचा चेहरा केला, इकडेतिकडे पाहिले आणि पावती करताना "ऐसेहि लोग मिलते हैं आजकल!" असा एक छद्मी उद्‌गार काढला. ते वाक्य ऐकताच शेपटीवर पाय पडल्यासारखा तो शेठजी उलटा फिरला आणि ताडताड त्याला बोलू लागला. त्याचे म्हणणे असे की, 'तिकीट हरवलंय, पैसे घे आणि पावती दे; फुकट्या प्रवासाचा आरोप करू नको. त्याला तो कोण समजला? तो असा-तसा माणूस नव्हता' वगैरे वगैरे. ...चेकर थोडे दबून बोलू लागल्याबरोबर त्याने पुन्हा आवाज चढवला,

"अरे, तुमी काय समजते आमाला? आताच दोन तासांपूर्वी हजार रुपया गमवून आले आम्ही, समझे? पैसे की परवा कोण करेल? फुकटा बोलते आमाला, फुकटा?"

त्यांचा तो सुखसंवाद नंतर लगेच मिटला. तो मिटल्यावर मला असे आश्चर्य वाटले की, रुपया दोन रुपयाचे तिकीट न काढता फुकटा प्रवास करीत असल्याचा आरोप ऐकल्याबरोबर ज्या माणसाचा स्वाभिमान व नीतिमत्ता खडबडून जागी होते, त्याने त्याच संभाषणात आपण हजारो रुपये जुगारात गमावून आल्याचे फुशारकीने सांगावे, किंबहुना आपला मानदारपणा सिद्ध करण्यासाठी तो एक वादातीत पुरावा म्हणून सादर करावा, ही कोणत्या गावची नीती आणि संस्कृती? पण हे असे सर्रास आढळते हे मात्र खरे. अनेक वेळा असे बोलल्याचे आपण ऐकतोच ना? "अरे दोन आण्यासाठी इतकी लबाडी?" "नाही नाही, पाच रुपड्यांसाठी मी दानत सोडणार नाही." म्हणजे लबाडी किंवा अदानत हा गुन्हा नाही, ही अनीती, असंस्कृतता नाही; तर दोन आणे किंवा पाच रुपये इतक्या अल्प किंमतीस ती मिळणार नाही असा मुख्य सवाल. लहान प्रमाणावर केली तर जी गोष्ट

वाईट ठरते ती मोठ्या प्रमाणावर केली म्हणजे स्वागतार्ह ठरावी हा न्याय मोठा अजबच नव्हे काय?

कोणतीही गोष्ट करण्याचे मनात आणल्याबरोबर माणसाने ती पार पाडण्यासाठी आपल्याला किती किंमत द्यावी लागेल वा किती कष्ट उपसावे लागतील, असा विचार करावा हे रास्तच आहे. त्याबद्दल वाद होण्याचे कारण नाही. पण किंमत द्यायचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा 'अल्प किंमतीत मी अनिष्ट गोष्ट करणार नाही, भरपूर मोबदला मिळाला तर करीन' हा हिशेब मात्र बावगाच म्हणायला हवा. पण तसा तो म्हटला जात नाही हे आपण पाहातोच.

परवा ऑफिसमधून घरी गेल्यावर मला फार समाधान वाटले होते. ज्या एका केसचे पेपर माझ्या हाती गेले चार महिने पडले होते, त्याची वाट लावून मी ऑफिसाबाहेर पडलो होतो. वरिष्ठ माझ्या निर्णयावर खूष होते. एका कंपनीस परवाना द्यायचा होता, एका गावात भर दिवसा धान्य-दुकान लुटून पोलिसांच्या स्वाधीन झालेल्या काही तरुणांना, राजकीय कारणास्तव निर्दोष सोडायचे होते, आणि त्याच कारणासाठी कायद्यात न बसणारे एक टेंडर स्वीकारणे सरकारला भाग पाडायचे होते. तीनही केसेसची संपूर्ण माहिती मला असल्याने केवळ कागदी टीकाटिप्पणी करून तिन्ही प्रकरणे हातची जाणार होती, हे मला पक्के समजले होते. आणि वरिष्ठांचा तर सक्त तगादा की, तिन्ही प्रकरणे हातची न दवडता त्यांना हवा तसा निकाल लावलाच पाहिजे. मग अनेक खुंट्या पिळल्या, हव्या त्या अधिकाऱ्यांकडे ते कागद जातील अशी सोय करून त्यांच्याकडून अनुकूल शेरे आणवले व शेवटी वरिष्ठांना हवा असलेला निर्णय मंथून काढून प्रकरणे वादातीत मिटवून टाकली. वरिष्ठांची शाबासकी व बढतीचे आश्वासन खिशात घालून आनंदाने तुरुतुरू चालतच घरी गेलो.

घरी गेल्यावर मस्त चहा घेऊन बायकोशी हितगूज करावे असा विचार मनात होता. पण दारात पाऊल टाकले आणि पाहातो तो बारा वर्षांचा हुषार मुलगा रडत होता आणि त्याची आई त्याला रागे भरीत होती.

"काय, प्रकार काय आहे?"—मी.

"त्यालाच विचारा!"—ती.

"काय रे अरविंद?"

तो बोलेना. गप्पच राहिला.

"अरे, बोल की!"

"तो काय बोलणार कपाळ? कॉपी केल्याबद्दल शाळेतून त्याला घरी पाठवलंय."

मला विषाद वाटला. एका उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्याच्या मुलाने असे करणे बरे नव्हे; त्याच्या हिताचे तर ते नव्हतेच.

"तू असं करायला नको होतंस, अरू."

"आणि एवढ्यानं काय झालंय? तो हल्ली सिगरेट ओढतो, अशी मास्तरांची तक्रार आलीय." ती पुढे म्हणाली.

मला ते निवेदन ऐकून अकस्मात धक्का बसला. ज्या एका यशप्राप्तीच्या धुंदीत मी लगबगीने चालत घरी आलो होतो ती धुंदी उतरली. माझा हुषार, बारा वर्षांचा मुलगा बिघडत असल्याचे पाहून माझा विरस झाला होता. आपले लौकिक यश कःपदार्थ वाटू लागले होते; कारण त्या यशाच्या पायावर जी पुढची समर्थ पिढी तयार व्हायची तीच किडकी निपजत होती, तिच्या मनावर भलतेसलते संस्कार घडत होते.

पण असा विचार करणारे माझे मन एकदम म्हणाले, 'का बरं तू अस्वस्थ व्हावंस? आजच तू आपल्या आयुष्यात खोटेपणा, अप्रामाणिकपणा आणि अन्याय करून यश मिळवलं आहेस ना? आणि हेच सातत्यानं करून यशस्वी होत होत तू इथवर येऊन पोचला आहेस ना? मग याच गोष्टी तुझ्या लहान मुलानं बालपणापासून केल्या तर बिघडलं कुठं? तुझ्याहीपेक्षा तो आयुष्यात अधिक यश मिळवील, जास्त पारंगत होईल; वाईट काय आहे त्यात?'

मनाचा हा युक्तिवाद ऐकून खरे तर मला लाज वाटली, शीलभ्रष्ट झाल्यासारखे वाटले.

माझ्या मुलाने तसे मुळीच वागता उपयोगी नाही. पण मीही आज जे केले ते वाईट केले, अशी मला चुकचूक लागली. मी चक्रावून गेलो.

'चोरी करणे वाईट' असे लहानपणापासून मनावर ठसवून घेऊन, मग प्रौढपणी चोरी करणे वाईट नाही; पण 'चोरी करणे वाईट' असे कधीच शिकवले गेले नाही आणि मग चोरी केली तर ती फार अनिष्ट गोष्ट, असा याचा अर्थ समजायचा काय? माणसाने सद्वर्तन आणि नीती यांचे भरपूर

पाठ बालपणापासून घेऊन मग गैरवर्तन केले, लांड्यालबाड्या केल्या तर त्या तसल्या वर्तनातील तिखटपणा किंवा अनीती यांची धार बोथट होते काय? आणि आपल्या प्रौढ आयुष्यात लौकिक यश मिळवण्यासाठी हवे ते करीत सरसर वर चढणाऱ्या महाभागांनाही आपल्या लहानग्यांनी 'चोरी कधी करू नये', 'खोटं कधी बोलू नये' हेच शिकत राहावे व ती तत्त्वे प्राणपणाने मानावीत असे वाटत असते काय? का, 'चोरी करणे वाईट' हे पूर्णपणे मान्य करून चोरी करणे गैर नव्हे अशी मनाची धारणा असते?

टिळक एकदा प्रातःकाळी आपल्या मुलास म्हणाल्याचे सांगतात की, "बाळ, तुझी संध्या झाली का रे? मी संध्या सोडली असली तरी तुला ती सोडायला अजून अवकाश आहे. करून टाक पाहू!" टिळकांचे असामान्यत्व वादातीत होते, पण बहुतेक थोरांना असेच वाटत असावे की, 'आम्ही असं-असं वागत असलो तरी तुम्ही लहानग्यांनी तसं वागू नये. तुम्ही सच्छीलाचीच उपासना केली पाहिजे.'

किंवा मला वाटते की, माणसाचा अपूर्ण अहंकार, असफलित अस्मिता आणि धडपड करणारे स्वत्व आपली परिपूर्ती करण्यासाठी अशा रीतीने इतरेजनांकडे पाहात असते. मी वाईट असलो तरी समाज चांगला असावा, मी अप्रामाणिकपणे वागलो तरी दुसरे प्रामाणिक असावेत, मी पैसे खाल्ले तरी दुसऱ्यांनी, समाजाने, निःस्पृहपणालाच कुर्निसात करावा, असे त्याला वाटत असते, हेच खरे असावे. म्हणूनच अनीतीने केलेले धनही सतत दान होण्यासाठी उत्सुक असते. कसाही पैसा मिळवून आपल्या मुलांना उच्च प्रतीचे व शीलवान होण्याचे शिक्षण देण्यासाठी तो धडपडत असतो. विरोधाभासाचे हे केवढे मोठे उदाहरण! आचारधर्मातील हा केवढा मोठा चमत्कार!

किंवा हा साराच माणसाचा दुबळेपणा असावा. हीच त्याच्या माणूसकीची निशाणी असावी. आपली शीलभ्रष्टता विसरून जाऊन शीलसंपन्नतेविषयी जास्तीत जास्त ओरड करून तो आपला दुबळेपणा झाकून टाकीत असावा. म्हणूनच अनीतीला नीतीचा फार पुळका येतो, आणि खोटेपणाइतका दुसरा सत्याचा सच्चा रखवालदार नाही.

माणसाचे मन मोठे अजब असते, हेच खरे!

# पुणेकर आणि बंबईवाला

पुण्याहून मुंबईचे अंतर जरी फक्त एकशेवीस मैल असले (पुणेकर म्हणणार, एकशे एकोणीस मैल तीन फर्लांग!) तरी या दोन शहरांत दोन परस्परभिन्न संस्कृती नांदताना दिसून येतात. पुणेकर हाती घेतलेले काम तडीस नेईलच याची शाश्वती नसली तरी हाती घेतलेल्या कामाला मुलायम आदर्शवादात बुचकळून काढल्याशिवाय राहाणार नाही. मुंबईकर परीटघडी आदर्शवादाचीही आतडी बाहेर काढून भर रस्त्यावर ती टांगून ठेवण्याला बिचकणार नाही. पुण्याहून निघालेली डेक्कन क्वीन मुंबईला पोचेपर्यंत कात टाकणाऱ्या सापाप्रमाणे एक आमूलाग्र रूपांतर करते. गाडी, तसेच गाडीतील प्रवासीसुद्धा! पुण्याच्या 'स्थानका'वर (पुण्यालाच ते 'स्थानक' असते हं. मुंबईला ते फक्त 'व्ही० टी०' होते. व्ही० टी०च्या 'स्थानका'वर असा शब्दप्रयोग खुद्द पुणेकरही करू धजणार नाही.) डेक्कनक्वीनमध्ये चढणारा अस्सल पुणेकर त्या दिवशी (दिवाळीचे दिवस वगळून) प्रथमच पहाटे उठलेला असतो. उठतानाच तो आपल्याबरोबर त्या दख्खनच्या राणीचा (हाही पुण्याचाच शब्द) दिमाख घेऊन उठतो आणि प्रसंगाला साजून दिसावे म्हणून प्रथमच सदाशिव पेठेतून बसने स्टेशनवर न जाता रिक्षा करतो. (खरे तर त्याला टॅक्सीच करायची असते. पण मीटरवाल्या टॅक्सीला 'काय घेणार बोल. एकच काय ते सांगून टाक.' म्हणायचा धीर होत नाही. आणि मुंबईकराइतके

त्याला मीटरचे मशीन विश्वासार्ह वाटत नाही ! उतारूंना फसवायला ती एक क्लृप्ती काढली आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत असते.) दख्खनच्या राणीत बसल्यावर तिकीट रिझर्व असूनही 'इथं का बसला ?' असा उद्धट सवाल कोणी करणारच नाही याची त्याला खात्री नसते. पोटात ती धाकधूक असतानाच रोज त्या गाडीने मुंबईला ये-जा करून 'माणसाळलेला' दुसरा पुणेकर भर फलाटावरच त्याला गाठतो. ओरडतो, "काय गोड्या (गोडबोले याचा शॉर्ट फॉर्म), आज कुठं यात्रा काढली ?"

"जरा दादरला बहिणीकडे जाऊन येतो" हे उत्तर देताना पुणेकर डोळ्याच्या कोपऱ्यातून बाजूच्या प्रवाशांकडे पाहून घेतो. ते 'कोल', 'मोती' वाचण्यात दंग असतात. एखादा पँटबुशशर्टवाला वरील संवाद प्रत्यक्ष ऐकूनही ऐकत नसल्याची अस्सल मुंबईकराची ऐट दाखवतो. पुणेकराला आणखी एक आनंद वाटत असतो. आपण मुंबईला जात असल्याचीच गोष्ट तेवढी या 'केत्या'च्या (केतकर !) ध्यानात आली, पण 'दख्खनच्या राणी'ने जात असल्याची आली नाही व त्या घटनेला एक टप्पू मारून आपल्या सुखस्वप्नाची लक्तरे त्याने लोंबवली नाहीत म्हणून त्याला बरे वाटत असते.

मग प्रवास सुरू होतो. पुणेकराला त्या सुखासनावर बसून ओघळत जाताना फार सुख होत असते. खुद्द बॅ० जयकरांनीही लिहिले आहे की, मराठी माणसाचा एक बलवत्तर गुण म्हणजे त्याचा अल्पसंतोषीपणा. हाही गुण आणखी प्रकर्षाने दिसतो तो पुणेकरात. त्यामुळे आपल्या या (फक्त एका दिवसाच्या) स्वर्गीय प्रवासाला कोणाची दृष्ट तर लागणार नाही ना, असा धाक त्याच्या पोटात असतोच असतो. पण राणी डौलाने वाहात असते आणि पुणेकर स्वतःवर संतुष्ट असतो. आता सहप्रवाशांप्रमाणे आपणही काही वाचावे अशी ऊर्मी त्याला येते. पण शेजाऱ्यांचे रीडर्स डायजेस्ट, टाइम, न्यूजवीक पाहून त्याला आपल्या शबनम पिशवीतला 'सकाळ' व 'मराठा' (दोन वर्तमानपत्रे !) बाहेर काढायला कसेसेच वाटत असते. म्हणून मग तो मखलाशी करतो. शेजारी दुसऱ्या वाचनात दंग आहेत हे पाहून तो अदबीने त्यांचा टाइम्स प्रथम मागून घेतो. (तिथेही 'टाइम्स प्लीज' म्हणावे, की 'मे आय सी' म्हणून टाइम्सला हात घालावा हा घोळ असतोच. चारदोन क्षण या 'मॅटर'ची मनात रिहर्सलही होत

असते !) पण विशेष काही न घडता त्याला टाइम्स मिळतो. खरे तर त्यातले त्याला फक्त 'यू सेड इट'च फार आवडते. तिथेच तो घोटाळतो, स्थिर होतो. मग भराभर हेड लाइन्स पाहात तो पाने उलटतो. (या व्यापात गाडीच्या वेगाने संपूर्ण उघडलेल्या त्या अवाढव्य पानाने जरा अस्ताव्यस्त गोंधळ उडतो.) आणि प्रयासाने पुनः ते पत्र गुंडाळून तो नीट घडी करून शेजाऱ्याच्या जवळ ठेवतो.

मग तो उत्साहाने 'मराठा' काढतो आणि एकदम त्याला माणसात आल्यासारखे वाटते. गाडीच्या वेगात ते चविष्ट लिखाण वाचताना देहावरच गुंगी चढते. प्रवास चाललेला असतो. कर्जतपासून 'दख्खनची राणी' फक्त 'डेक्कन' होऊ लागते. माथेरानहून परतलेली अनेक टोळकी कर्जतला जागोजागी घुसतात. तरुण वयाच्या ललनासुद्धा पिकनिक पँट, शर्ट, गॉगल व ट्रॅन्झिस्टरसह पाहिल्या की मनात वट्ट बैठक ठोकून बसलेला आदर्शवाद पाझरू लागतो. पुणेकराला जाणवू लागते, की 'मजा आहे.' तो क्वचित हसतोही. एवढ्यात त्यातीलच एका अतिसुंदर व स्मार्ट तरुणीचा—आत येण्याच्या गडबडीत—त्याला ओझरता धक्का लागतो. तो मुळी चक्रावतोच आणि उपकृताच्या जाणिवेत तिच्याकडे पाहातो. तेवढ्यात ती त्याच्याकडे किंचित पाहून म्हणते, "ॲम सॉरी."

एका क्षणाच्या या मानसिक उत्पातामुळे व अनुभवामुळे पुणेकराला प्रश्न पडतो की, जगात इतकी आदब व सन्मान असताना भांडणे का होतात ? लढाया का होतात ?

कर्जतपासून डेक्कन पिसाळल्यासारखीच धावते. आता वाचनावर लक्ष केंद्रित करणे कठीण असते. रुळांच्या गजबजाटात थाडथाड मुलुंड, भांडूप, विक्रोळीवरून धावणाऱ्या त्या गाडीमुळे आणि भोवतालच्या त्या विराट पसाऱ्याला पाहून पुणेकराला वाटते की, मुंबईत किती काम आहे, किती नोकऱ्या आहेत, किती उद्योग आहेत ! तो भयंकर आशावादी बनतो. आणि मग व्ही० टी०ला जेव्हा तो उतरतो तेव्हा त्याच्यात आमूलाग्र बदल झालेला असतो. समोरच्या चक्क मराठी हमालावर तो गुरकावतो, "जल्दी निकालो सामान. टॅक्सीमे ले चलो." दारावरच्या टी० सी०ला तो विचारतो, "वॉट टाइम पूना मेल लीव्हज ?" टी० सी०ने इंग्रजीतच त्याला प्रत्युत्तर दिल्यामुळे बरे वाटते.

त्याला मीटरचे मशीन विश्वासार्ह वाटत नाही ! उतारूंना फसवायला ती एक क्लृप्ती काढली आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत असते.) दख्खनच्या राणीत बसल्यावर तिकीट रिझर्व असूनही 'इथं का बसला ?' असा उद्धट सवाल कोणी करणारच नाही याची त्याला खात्री नसते. पोटात ती धाकधूक असतानाच रोज त्या गाडीने मुंबईला ये-जा करून 'माणसाळलेला' दुसरा पुणेकर भर फलाटावरच त्याला गाठतो. ओरडतो, "काय गोड्या (गोडबोले याचा शॉर्ट फॉर्म), आज कुठं यात्रा काढली ?"

"जरा दादरला वहिणीकडे जाऊन येतो" हे उत्तर देताना पुणेकर डोळ्याच्या कोपऱ्यातून बाजूच्या प्रवाशांकडे पाहून घेतो. ते 'कोल', 'मोती' वाचण्यात दंग असतात. एखादा पॅंटबुशशर्टवाला वरील संवाद प्रत्यक्ष ऐकूनही ऐकत नसल्याची अस्सल मुंबईकराची ऐट दाखवतो. पुणेकराला आणखी एक आनंद वाटत असतो. आपण मुंबईला जात असल्याचीच गोष्ट तेवढी या 'केल्या'च्या (केतकर!) ध्यानात आली, पण 'दख्खनच्या राणी'ने जात असल्याची आली नाही व त्या घटनेला एक टप्पू मारून आपल्या सुखस्वप्नाची लक्तरे त्याने लोंबवली नाहीत म्हणून त्याला बरे वाटत असते.

मग प्रवास सुरू होतो. पुणेकराला त्या सुखासनावर बसून ओघळत जाताना फार सुख होत असते. खुद्द बॅ० जयकरांनीही लिहिले आहे की, मराठी माणसाचा एक बलवत्तर गुण म्हणजे त्याचा अल्पसंतोषीपणा. हाही गुण आणखी प्रकर्षाने दिसतो तो पुणेकरात. त्यामुळे आपल्या या (फक्त एका दिवसाच्या) स्वर्गीय प्रवासाला कोणाची दृष्ट तर लागणार नाही ना, असा धाक त्याच्या पोटात असतोच असतो. पण राणी डौलाने वाहात असते आणि पुणेकर स्वतःवर संतुष्ट असतो. आता सहप्रवाशांप्रमाणे आपणही काही वाचावे अशी ऊर्मी त्याला येते. पण शेजाऱ्यांचे रीडर्स डायजेस्ट, टाइम, न्यूजवीक पाहून त्याला आपल्या शबनम पिशवीतला 'सकाळ' व 'मराठा' (दोन वर्तमानपत्रे!) बाहेर काढायला कसेसेच वाटत असते. म्हणून मग तो मखलाशी करतो. शेजारी दुसऱ्या वाचनात दंग आहेत हे पाहून तो अदबीने त्यांचा टाइम्स प्रथम मागून घेतो. (तिथेही 'टाइम्स प्लीज' म्हणावे, की 'मे आय सी' म्हणून टाइम्सला हात घालावा हा घोळ असतोच. चारदोन क्षण या 'मॅटर'ची मनात रिहर्सलही होत

असते!) पण विशेष काही न घडता त्याला टाइम्स मिळतो. खरे तर त्यातले त्याला फक्त 'यू सेड इट'च फार आवडते. तिथेच तो घोटाळतो, स्थिर होतो. मग भराभर हेड लाइन्स पाहात तो पाने उलटतो. (या व्यापात गाडीच्या वेगाने संपूर्ण उघडलेल्या त्या अवाढव्य पानाने जरा अस्ताव्यस्त गोंधळ उडतो.) आणि प्रयासाने पुनः ते पत्र गुंडाळून तो नीट घडी करून शेजाऱ्याच्या जवळ ठेवतो.

मग तो उत्साहाने 'मराठा' काढतो आणि एकदम त्याला माणसात आल्यासारखे वाटते. गाडीच्या वेगात ते चविष्ट लिखाण वाचताना देहावरच गुंगी चढते. प्रवास चाललेला असतो. कर्जतपासून 'दख्खनची राणी' फक्त 'डेक्कन' होऊ लागते. माथेरानहून परतलेली अनेक टोळकी कर्जतला जागोजागी घुसतात. तरुण वयाच्या ललनासुद्धा पिकनिक पँट, शर्ट, गॉगल व ट्रान्झिस्टरसह पाहिल्या की मनात घट्ट बैठक ठोकून बसलेला आदर्शवाद पाझरू लागतो. पुणेकराला जाणवू लागते, की 'मजा आहे.' तो क्वचित हसतोही. एवढ्यात त्यातीलच एका अतिसुंदर व स्मार्ट तरुणीचा—आत येण्याच्या गडबडीत—त्याला ओझरता धक्का लागतो. तो मुळी चक्रावतोच आणि उपकृताच्या जाणिवेत तिच्याकडे पाहातो. तेवढ्यात ती त्याच्याकडे किंचित पाहून म्हणते, "ॲम सॉरी."

एका क्षणाच्या या मानसिक उत्पातामुळे व अनुभवामुळे पुणेकराला प्रश्न पडतो की, जगात इतकी आदब व सन्मान असताना भांडणे का होतात? लढाया का होतात?

कर्जतपासून डेक्कन पिसाळल्यासारखीच धावते. आता वाचनावर लक्ष केंद्रित करणे कठीण असते. रुळांच्या गजबजाटात थाडथाड मुलुंड, भांडूप, विक्रोळीवरून धावणाऱ्या त्या गाडीमुळे आणि भोवतालच्या त्या विराट पसाऱ्याला पाहून पुणेकराला वाटते की, मुंबईत किती काम आहे, किती नोकऱ्या आहेत, किती उद्योग आहेत! तो भयंकर आशावादी बनतो. आणि मग व्ही० टी०ला जेव्हा तो उतरतो तेव्हा त्याच्यात आमूलाग्र बदल झालेला असतो. समोरच्या चक्क मराठी हमालावर तो गुरकावतो, "जल्दी निकालो सामान. टॅक्सीमे ले चलो." दारावरच्या टी० सी०ला तो विचारतो, "वॉट टाइम पूना मेल लीव्हज?" टी० सी०ने इंग्रजीतच त्याला प्रत्युत्तर दिल्यामुळे बरे वाटते.

म्हणून वर म्हटले की, पुण्यामुंबईचे एकशेवीस मैलांचे अंतर म्हणजे दोन भिन्न संस्कृतींना सांधणारा तो एक झुलता पूल आहे. आयुष्यात 'काय करावे ?' याचा निवांत विचार करीत पुण्यात राहावे. आणि मुंबईत येऊन काहीतरी फक्त 'करीत राहावे.' किंवा मुंबईत आपोआप वेग घेतलेल्या चक्राप्रमाणे फिरत राहावे, काम करीत राहावे आणि मग पुण्याला येऊन निवांतपणे कृतकर्माचा विचार करीत बसावे. 'वाट पाहात राहाणे' हे पुण्याच्या जीवनाचे वैशिष्ट्य म्हटले तर 'वेळापत्रक आखणे' हे मुंबईच्या दैनंदिनीचे गमक म्हणावे लागेल.

करता येण्यासारखी प्रत्येक गोष्ट स्वतः करून पाहावी अशी आवड मुंबई-कराच्या मनात असते. तर काहीही फारसे न करता प्रत्येक गोष्टीवर टीका करीत राहाणे हे आपले जन्मजात कर्तव्य आहे याची पुणेकराला शंका नसते. माझ्या माहितीचे एक विद्वान (अर्थात पुण्यातील!) आहेत. गेली कित्येक वर्षे त्यांची अशी पक्की समजूत होती की, मुंबईत व्याख्यान देण्यासाठी फक्त पुण्याहूनच वक्ते बोलवावे लागतात आणि मुंबईकर फक्त 'वीकएंड' साजरा करायसाठीच तेवढे पुण्यात येतात. त्रेचाळीस लाखांच्या अवाढव्य गर्दीत वावरत असूनही मुंबईकराला आपण नेहमी एकटे आहोत, स्वतंत्र आहोत याची सुखद जाणीव असते. पुण्यात तुम्ही पिशवी घेऊन मंडईत निघालात तरी घरोघर चर्चा होते. सरळ, लांबरुंद रस्ता स्थिर आहे आणि पादचारी, वाहने यांचे ओघ आखून दिल्याप्रमाणे रस्त्यावरून वाहात आहेत असे मुंबईला वाटते. तर सैरावैरा धावणाऱ्या हजारो सायकली आणि पादचारी यांच्याबरोबर टीचभर रस्ताही पळत सुटला आहे असे पुण्यास भासते. अवाढव्य बस येते, थांबते व आपणाला आत घेते ही मुंबईची जाणीव. तर वाट पाहून थकल्यावर येणाऱ्या काडेपेटीसारख्या पुण्याच्या बसला चटकन उचलून खिशात टाकावे ही पुण्याची जाणीव. म्हणूनच म्हणतात की, "तुम्हांला घाई असेल तर पुण्यात चालत जा. सवड असेल तर बसने जा."

पुण्यातला माणूस विचार करीत बसतो आणि मुंबईकर कृती करतो. आगळी आणि विक्षिप्त निष्ठा ही पुणेकराला प्राणापलिकडे प्रिय असते. 'गेली आठ्ठावीस वर्षे पर्वतीचे प्रातर्दर्शन चुकलेले नाही', 'आमच्या तीन पिढ्या अमक्या-अमक्या संस्थेतच शिकून तयार झाल्या', 'उभ्या जन्मात चहाला

स्पर्श न केलेला म्हणून माझ्याकडे बोट दाखवावे', 'गेली दहा वर्षे रोज भाजीवर फक्त साडेनऊ आणे खर्च करीत आलो'—अशा प्रतिज्ञा किंवा कृतकृत्य विचार पुण्यास गल्लोगल्ली ऐकू येतील. असे कृतिवीर मुंबईच्या धबडग्यात औषधालाही सापडणार नाहीत. वरील विधाने करणारे लोक अगदी प्रामाणिक व सत्यवक्ते असतात याबद्दल दुमत नाही. आणि आजही एखाद्या मुंबईकराने सकाळी पुण्यास पर्वतीवर चक्कर मारली तर 'गेली अठ्ठावीस वर्षे पर्वतीवर न चुकता सहल' करणारा तो पुणेकर त्याला खचित भेटेल. त्याच्या धोतराचा काचा जसा अठ्ठावीस वर्षांपूर्वी होता त्याच पद्धतीने आजही दिसेल. हातातील छत्री (तिचा ब्रँडसुद्धा), पायांतल्या चपल्या, डोक्याची टोपी आणि चालण्याची पद्धत अगदी तीच, तशीच. अस्मितेला दमदारपणे जिवंत राहाण्यासाठी फक्त तोच एक मार्ग मोकळा असतो आणि हा मार्ग आत्यंतिक अविरोधाने सुकर झालेला असतो. 'गेली कित्येक वर्षे चहास स्पर्श केला नाही' असे म्हणणारा खरे तेच बोलत असतो. पण ही जाज्वल्य निष्ठा जीवनाच्या परिसरात किती महत्त्वाची आहे ते त्याला कधीच उमगणार नाही. (प्रत्यक्षात चहाला स्पर्श न करणारा हा निष्ठावान गांजा मात्र ओढत असेल.) असल्या अनाठायी निष्ठा जोपासणे मुंबईकराला कधीच परवडणार नाही. इथे कडक सूट घालून एखाद्या ऑफिसात 'चीफ एक्झिक्युटिव' म्हणून काम करणारा वयस्कर संध्याकाळी चौपाटीवर पाणीपुरी खाताना हमेश आढळेल. आणि तरीही त्या घटनेत दोन महत्त्वाच्या गोष्टी आढळतील. पाणीपुरी खाताना तो ती सबंध जग विसरून खाईल आणि नंतर आपण काय खाल्ले तेही तो आठवू शकणार नाही. बसच्या रांगेत तो उभा असला तर पुढच्या मेहेतरणीलाही तो आपल्या नंबराचा हक्क बिनधोकपणे उपभोगू देईल. प्रसंगी तिच्या हक्कासाठी इतरांशी वाद करील. कायद्यावर मुंबईकराचा फार विश्वास. म्हणूनच की काय, इथे कायदेभंगही 'कानूनसे' चालतो. मिरवणूक काढून गोळीबारास उत्तेजन देणारा आणि गोळीबार करणारा दोघेही कायद्याबाबत सारखेच वत्सल असतात. 'तू कोण मारणारा' आणि 'मी कोण मरणारा' असा प्रेमळ भाव अनेक गोळीबारांत मारणाऱ्याच्या आणि मरणाऱ्याच्या चेहऱ्यावर मला स्पष्टपणे दिसला आहे.

मुंबईकर कृतिनिष्ठ असतो हे वर सांगितलेच. दहा मजली लाँड्रीच्या

इमारतीवर कुठे कोपऱ्यात तिचे नाव असेल-नसेल. आणि तेही बहुधा 'अप्सरा', 'लकाकी' अशा स्वरूपाचे. पुण्यास मात्र टीचभर लाँड्रीवर 'जगद्धितेच्छू रजकगृह' ही पाटी ढळढळीतपणे लटकली असेल किंवा एखाद्या उसाच्या गुऱ्हाळावर 'विश्वकर्मा रसवंतीगृह' असा शिरपेच आढळेल. 'आर्यभूषण', 'शिवशक्ती' या स्वरूपाच्या नामाभिधानाखाली पुण्यात केशकर्तनालये किंवा भेळेची दुकाने सापडणे मुष्कील नाही. 'हिंदू छत्र्या नीट करणार' मुंबईत कसे बरे आढळतील? इथे वस्तूच काय माणसेसुद्धा जातिहीन असतात!

काहीही काम न करतानासुद्धा तुम्हांला मुंबईत सारखे कार्यरत असल्याचे जाणवते. कारण, सभोवती सारखे प्रचंड काम, उलाढाल, खटाटोप चालू असतो व तुम्ही त्याचा एक अविभाज्य भाग असता. 'क्यू' हे मुंबईकराच्या जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण असते. आणि गंमत अशी की, कोणत्याही क्षेत्रातील कितीही मोठी व्यक्ती असो, ती 'क्यू'चा अनादर करीत नाही किंवा रांगेत उभे राहाणे कमी प्रतीचे समजत नाही. रांगेत उभे राहूनही पुन्हा वाचनाचे किंवा लोकर विणण्याचे काम चालूच असते.

—आणि ते तरल सौंदर्य व त्याचे रसग्रहण! पुण्याच्या चतुःसीमा भावोत्कट आहेत हे खरेच. एका बाजूला सिंहगड आणि विठ्ठलवाडी, एका बाजूचे विद्यापीठ आणि एका बाजूची वानवडी. 'वहां जऱ्हेजऱ्हेपर सच है लिखारे.' पण मुंबईचे असे एक निराळेच सौंदर्य आहे—दृष्टीपेक्षा मनाला सुखवणारे, भुलवणारे. त्या सौंदर्याच्या रसास्वादासाठी तुम्हांला जवळपासच्या बागा, लेणी किंवा गुहा यांच्याकडेच धाव घेतली पाहिजे असे नाही. ते ठायीठायी तुम्हांस उमगेल. अवाक होऊन त्याला सामोरे गेले पाहिजे. शिवाजी पार्कच्या विस्तीर्ण मैदानावर राजकारण, धर्मकारण, समाजकारणविषयक फड रंगताना भोवतालच्या इमल्यांनी ज्या समतानतेने ते सारे पाहिलेले असते तसे तुम्ही पाहा म्हणजे कळेल.

एखाद्या अलिशान वातनियंत्रित चित्रपटगृहातील ऐश्वर्यसंपन्न मेळावा तुम्ही पाहा. पाहाता पाहाता त्या मेळाव्याभोवती 'असं का?' 'असं का?' विचारणारे सहस्र वखवखलेले डोळे गरगरत आहेत असे तुम्हांला दिसेल. ते डोळे पडघमवर टिपरी पडण्याची वाट पाहात आहेत. आणि

या वाट पाहाण्यातीलही जे एक सौंदर्य आहे ते तुम्हांस पाहावेच लागेल. धूर ओकणाऱ्या अजस्र गिरण्या मजुरांची रांग आत घेताना पाहा. त्याच मजुरांच्या रांगा पुढाऱ्यांच्या मागे चाललेल्या पाहा. धनपतींच्या रांगा एखाद्या अभयानंदाच्या गीताप्रवचनासाठी कशा लागतात ते पाहा. आणि हे सारे शतकानुशतके नुसते पाहात राहाणे हेच आपल्या नशिबी कसे आहे तेही पाहा. कारण, धनपती नाहीसे करून मजुरांनी धनसत्ता ताब्यात घेतल्यावरही काय झाले आहे ते आपण पाहातोच आहो. जीवनाचा धुमाकूळ एवढे एकच सत्य! आणि हा धुमाकूळ मुंबईच्या कोपऱ्याकोपऱ्यातून दिसेल.

आणि मुंबईत हा धुमाकूळ सदैव चालला आहे म्हणूनच की काय इथे माणसाला व्यक्तित्व नाही. व्यक्तित्व समाजाला आहे. चर्चगेटच्या परिसरात सकाळ-संध्याकाळ साचणारा जनसमूह गाड्यांच्या मापाने मोजून सकाळी शहरात घेतला जातो, संध्याकाळी उपनगरांच्या पदरात टाकला जातो. गिरण्यांच्या फाटकांतून सूत, रंग, कापूस आणि माणसे आत घेतली जातात, परत केली जातात. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थी आणि पदव्या यांची खुमासदार मेळ करून वाटली जाते. तिन्ही बाजूंनी मुंबईला समुद्र धडका मारीत असतो आणि बेटावरच्या वारुळांतून माणसांच्या मुंग्या अहर्निश वळवळत असतात—'पाच येथल्या, पाच फिरंगी!'

इथे रस्त्याला व्यक्तित्व आहे, इमारतींना आहे, कार्यालयांना आहे आणि कारखान्यांनाही आहे. माणसाला ते नाही! म्हणूनच किंचित्काल मुंबईच्या रिंगणात चकरा मारणारा आणि डरकाळ्या फोडणारा मुंबईकर शेवटी आपल्या जन्मग्रामाच्या पिंजऱ्यात—खेळ आटोपताच—टुणकन उडी मारून लुप्त होण्यास तळमळत असतो. मुंबईत धावपळ करतानासुद्धा 'मी पुण्याचा', 'मी साताऱ्याचा', 'मी खाटमांडूचा' हे तो विसरत नाही. मुंबईत 'माणूस' जन्मतच नाही; इथे 'माणसांचे' जीवन फक्त वाहात असते. डॉक्टर असलात तर मुंबईत या, पेशंट झालात की लगेच मुंबईबाहेर जा; बाहेर पदवी मिळवा आणि मुंबईत ती राबवा; पैसा इथे मिळवा, घर तिकडे बांधा; जगा इथे, पण जन्मा आणि मरा तिथे! अष्टौप्रहर मुंबईत राबणारा सामान्य माणूसही मनात म्हणतो, "एक दिवस ओंकारेश्वराला जाईन!"

यासाठीच पुण्याचा तो 'पुणेकर', पण मुंबईचा तो 'बंबईवाला.' अनेक

नैतिक मूल्यांची पराकाष्ठा असलेली रानडे, गोखले, फुले ही कुळे पुण्याची. तर केवळ कामाची उलाढाल दर्शविणारी घीवाला, बाटलीवाला, मिस्त्री आणि जव्हेरी ही कुळे मुंबईची. मुंबईची भाषा म्हणजे घाउकाची भाषा. व्यक्तीपेक्षा समाजाची वैशिष्टये घेऊनच ती अधिक संपन्न होते. नाना वेश, नाना रंग, नाना प्रांत आणि नाना भाषा यांच्या साहचर्याने आगळाच बनलेला 'बंबईवाला' आणि आपल्या खास पुणेकरी वैशिष्ट्याने कोश करून राहाणारा पुणेकर यांच्यामधील अंतर फक्त एकशेवीस मैलांचेच असले तरी मधोमध सह्याद्रीची एक दुस्तर दरी पसरली आहे हे विसरता येणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र०
अनुक्रम ७४०९९ वि: निबंध
क्रमांक १९६० नों. दि. ७।३।६७

# माझी दिनचर्या

सकाळी सूर्य उगवून तब्बल तीन तास झाले तरी प्रत्यक्ष उन्हाचा कवडसाही माझ्या घरात येत नाही. कारण, माझ्या चारी बाजूंस गगनचुंबी इमारतींची तटबंदी आहे. पण सकाळ झाली हे मी भावनेने जाणतो आणि नव्या उगवलेल्या सकाळबरोबरच माझे उद्यावर ढकललेले संकल्प माझ्या मानगुटी येऊन बसतात. नवीन कथा लिहायला घ्यायची हे आधीच्या कैक रात्री माझे ठरलेले असते. तासन तास मी उशिरापर्यंत टेबलाशी बसून त्या कल्पनेवर तलम प्रावरणे चढवण्याचे काम केलेले असते आणि उद्या सकाळी—पंच पंच उषःकालीच—ती कागदावर उतरवण्याचा निश्चय करून मी झोपी जातो. सकाळ उगवते. पण तिची सोनेरी उन्हे कधीच माझ्या गेही शिरत नसल्याने माझ्या कल्पना कागदावर साकार होत नाहीत. कथा पुन्हा रात्रीपर्यंत तहकूब होते.

सकाळी अकरा वाजता मी कॉलेजात जायला निघतो तेव्हा वीस मिनिटांच्या वाटचालीत मी एक विशाल सभा गाजवीत असतो. शतकानुशतके अज्ञानी राहिलेली ती शेकडो माणसे कशी निमूटपणे बसून ऐकत असतात आणि त्यांच्यासमोर माझे मुद्देसूद विवेचन एकसारखे चालू असते. मधूनच मी त्यांना म्हणतो, 'मला आपल्याला असं सांगायचं आहे की...', 'स्पष्टपणेच बोलायचं तर...', 'आपण जाणताच की...', 'आधीच्या थोर

वक्त्यांनी स्पष्ट केलंच आहे...' वगैरे. मला केवळ त्यांना जे सांगायचे असते ते सांगून टाकणे सहसा आवडत नसावे. त्यांच्यापेक्षा चार गोष्टी आपल्याला जास्त माहीत असल्या (त्या आहेत असा गोड आभास निर्माण करणे म्हणजेच खरे वक्तृत्व !) तर त्या आटोपाने सांगून टाकणे, यापेक्षाही माझ्या दृष्टीने अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे वारंवार, 'मी आपल्याला सांगू इच्छितो', 'मला आपल्याला सांगायचं आहे' या मंत्राचा जप करणे, ही होय. कर्ता विसरून ते कर्म करतील तर ते चालणार नाही. आशय त्यांच्या सहजपणे ध्यानात येईल तर त्यात मौज उरणार नाही. तेव्हा 'मी ते सांगत आहे' याची पुन्हापुन्हा त्यांना जाण देणे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यांना तशी जाण देण्यात मी कसूर करीत नाही. अखंडपणे मी त्यांच्यासमोर ते विवेचन करतो आणि मग सभा आटोपती घेतो. सभा संपतासंपता मी आमच्या महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारी असतो. पाच मिनिटांनी मी पंचाहत्तर विद्यार्थ्यांच्या वर्गात शिरतो आणि चावून चोथा झालेल्या त्या जुन्या 'थिअरी'वर प्रवचन देतो, तेव्हा वार्षिक परीक्षांचे काही प्रश्न माझ्या आणि श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर फडफडत असतात. जे ज्ञान मला झालेले असते आणि ज्या ज्ञानाची उत्कट भूक माझ्या श्रोत्यांना असते त्याची लांबी, रुंदी आणि खोली काय ती इतकीच !

मग 'मध्यंतर' होते. एका मोठ्या खोलीत अनेक विद्वान चहा पिण्यासाठी जमतात. आपल्या विद्वत्तेची निशाणी म्हणून त्यांतील काही पंडित ओठात सिगरेट पेटवतात. ज्यांचे वाचन त्याहून अधिक झालेले असते ते वाचीवीर ओठात पेटती सिगरेट ठेवूनच इतरांशी बोलतात. त्यांचे बोलणे बोबडे येते व क्वचित ते समजण्यास दुर्लभ असते. पण त्याला त्यांचा इलाज नसतो ! ते बोलतात ते सारेच इतरांना विनासायास समजले तर ते 'आहेत'च कशाला, असा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. म्हणून आपले शब्दोच्चार सहसा स्पष्टपणे होणार नाहीत अशी काळजी त्यांना घ्यावी लागते. त्यांच्याहूनही जे अधिक जुने आणि जाणते असतात किंवा एकदाचे काही संशोधन करून जे त्यातून मोकळे झालेले असतात ते स्वतःला 'डॉक्टर' म्हणवतात. नव्वद टक्के त्यांच्या तोंडात चिरूट किंवा पाइप असतो. तो नसेलच तर आपले मोजके बोलणे चहाच्या खोलीत बोलताना ते उजव्या हाताच्या चिमटीत डोळ्यांवरचा

चष्मा काढून धरतात आणि बोलून झाल्यावर तो पुन्हा नाकावर चढवतात!

मी धूम्रपान करीत नाही आणि चाळीस वर्षे होऊनही माझ्या नाकावर उपनेत्र आलेले नाहीत म्हणून विद्वज्जनांच्या या सभेत मी कमी पडतो. कधी-कधी उघडाही पडतो. त्यामुळे कॉलेजात पोचेपर्यंतच्या वाटेवर माझी सभा व प्रवचन जसे रंगते तसे त्या पंडितांच्या मेळाव्यात ते रंगत नाही. साहजिकच मला थोर विचारांच्या उच्च पातळीवरुन व्यवहाराच्या रुक्ष पातळीवर यावे लागते. यंदाची परीक्षकवृत्ती कोणाला मिळणार आणि गाइडसारखे काही उक्ते लिखाण करायचे आहे काय, असल्या चौकश्या करून मी गेलो तसाच घरी परत येतो.

तिसऱ्या प्रहरची चार वाजताची वेळ माझे मनोरथ व्यवस्थितपणे पुन्हा रचून ठेवते. प्रहरांनाही गंध असतात आणि त्यांच्यामधे मनाला जोजावण्याचे अनेकविध गुण असतात. रामप्रहरात झालेल्या चुका पुन्हा न करता जीवन नवीन जोमाने जगावे असे वाटत असते. पहिल्या प्रहरात नेहमीच युद्धयमान बनावे लागते. तिसऱ्या प्रहरी पश्चात्तापदग्ध मानस मनाला डिवचते की, 'दुपारचे सारे झगडे आवश्यकच होते काय?' संध्याकाळी वैराग्यवृत्ती बळावते. परमकारुणिक दृष्टीने वस्तुजाताकडे पाहिले जाते. क्षमाशीलता हा स्थायीभाव बनून जातो. दुसऱ्या दिवसाची सकाळ पुनश्च जोमाने उगवली नसती तर 'ढळला रे ढळला दिन सखया' म्हणत माणसांचे तांडे लांबलांब होणाऱ्या संध्याछायांना कवटाळीत राहिले असते!

जसे प्रहर तशाच सभोवतालच्या अनेक जड व चेतन वस्तूही मनाला सतत पोशीत असतात. सकाळी उठून मी कधी फिरायला जात नाही आणि जाणारही नाही. माझे वय हेच काही याचे प्रधान कारण नव्हे. एकट्याने फिरायला जाणे हे दिनभराच्या कार्यक्रमाचे भरतवाक्य होऊ शकते. ती नांदी होऊ शकणार नाही. आकंठ जेवण जेवल्यावरच सुपारी चवदार लागते. कितीही मसालेदार असली तरी सुपारीची चिमूट जेवणाआधी तोंडात टाकणे अप्रस्तुतच म्हणावे लागेल. तसेच ते संध्याकाळचे फिरणे. सूर्य आपले तेजस्वी किरण सृष्टीपासून सर्वांगांनी ओढून घेत असताना त्यांचा मागोवा घेत जाणे म्हणजे ते एक प्रकारचे संशोधन असते. सकाळी त्याच सहस्र किरणांनी तो आपल्यावर चाल करून येत असतो. दुसरा आपल्या अंगावर धावून येत असताना त्याला सामोरे जाण्याऐवजी हुलकावणी दाखवणे

गनिमी काव्याच्या शास्त्रात अधिक चपखलपणे बसते. या कारणासाठी फिरायला जाणे ही दिनक्रमाची नांदी नसून ते भरतवाक्य आहे असे मी म्हणतो.

सकाळी मी घराबाहेर पडलोच तर पांढरे कॅनव्हासचे बूट घालून, हातात रॅकेट घेऊन बाहेर पडेन. ती वेळच विधायक कर्तृत्वाची असते. दोन घाव दिले, दोन घेतले, अशी रग त्या प्रहरात नसानसांत वाहात असते. सायंकाळच्या फिरण्यासाठी मी धोतर किंवा पायजमा पेहरून पायी साध्या कोकणी चपलाच घालणार. त्या प्रहरात मला मातीशी जितके तादात्म्य पावता येईल तितके हवे असते. जीवनाचा अंत समोर दिसू लागला की मातीच्या कणाकणाशी एकजीव होण्याची भूक वाढते, तशीच दिवस संपताना तिच्याशी घसट वाढावी अशी इच्छा जन्मास येते. सकाळी आखूनमाखून तयार केलेल्या हिरव्यागार बगिच्यातील बाकावर बसून गप्पा मारल्या असतील, तर सायंकाळी उघड्या माळावर मांडी ठोकून बसावे आणि मावळतीचे रंग न्याहाळीत राहावे असे वाटते !

सारी झाडे आणि साऱ्या वनस्पती कधीही एकसारख्या वाटत नाहीत. प्रहराप्रहरातून जे भाव जन्मास येतात ते फक्त विशिष्ट झाडपाल्याशीच बोलता येतात. रामप्रहरात नाजूकसाजूक फुले गोळा करावीत. ते ओघानेच येते. पण पिंपळाची सळसळ ऐकायची असेल तर अस्तमानी कान तिकडे एकवटून त्याच्या पारावर रेंगाळले पाहिजे. बरोबर मारुतीच्या देवळात सांजवात लावून परतणारी रंगूआत्या असल्यास असू द्यावी. तुम्ही दोघे शेजारीशेजारी घडीभर बसलात तरी अनेक पावसाळे उलटून तिची दृष्टी मागे धावेल आणि तिला जे दिसेल ते तुम्हांला दिसणार नाही. पारावरचा पिंपळ तिला सांगेल, "आते, नातवाची पाचवी पुजलीस त्यालाही अठरा सालं होऊन गेलीत की गो!" 'विठ्ठला, विठ्ठला' म्हणत तांदळाचे फुलपात्र घेऊन ती उठेल तेव्हा पिंपळ तुमच्या कानात सळसळेल, "दोन बिघा जमीनही उरली नाही. पार सगळं गेलं! बुवानं मात्र दहा एकरांचा उसाचा मळा केला!" वडाची घनदाट छाया पाहिली की मला 'आपण काही अगदीच एकटे नाही' याची खात्री पटते. चिंचेचे गार बन तत मनाला थंडावा देऊन जाते.

सगळे संकेत सतत धुडकावून लावून प्रतिदिनी नव्यानेच सामोरे येणारे एक झाड मात्र आवर्जून लिहिले पाहिजे. ते झाड नव्हे; तो माड ! एकटा

माड असो किंवा माडांचे बन असो, माड हे प्रकरण मला अवचित अद्भुतात उचलून नेते. रत्नागिरीचा अंता फडणीस नव्यानेच मुंबईला आला की प्रथम आपल्या किडकिडीत पायांवर पँट चढवतो आणि डोईच्या केसांत वाटीभर तेल ओतून त्यांचा भांग काढतो, तसे हे मुंबईमधले माड वाटतात. दुसरी झाडे मला कधी विवस्त्र वाटत नाहीत. माड मात्र सतत स्नानाच्या तयारीत असतात. आणि त्यांना सचैल स्नान केल्याशिवाय कधी समाधान मिळत नाही. 'आकाशांतिल अधोरेखितें' माड पुन्हापुन्हा रेखीत असतात. दोन माड शेजारीशेजारी असले म्हणजे त्यांची परस्परांशी जी चर्चा झिंजा पिंजारून चालते ती कधी संपतच नाही. सर्वांगाने बोलणारे असे दुसरे झाड नाही. आणि माडांचे लक्ष नेहमी आपल्या संसारापेक्षा दुसऱ्याच्या संसारातच जास्त. भरभक्कम मांडा ठोकून वड, पिंपळ आपल्या जागी बसतात आणि जाताजाता कानावर जगाच्या वार्ता आल्याच तर त्या ऐकतात. पण माड मात्र दुसऱ्याच्या झोपडीत डोके खुपसून कुजबूज ऐकण्यास कमी करणार नाहीत—नव्हे, तीच त्यांची खरी प्रवृत्ती. आणि ऐकलेले गूज कधी त्यांच्या पोटात राहाणार नाही. टाळ्या पिटून दुसऱ्याच दिवशी ते जगजाहीर होईल. म्हणूनच दिनक्रमाच्या अखेरीस काय आणि जीवनाच्या अखेरीस काय, उछृंखल माडापेक्षा विद्वज्जड वडाची संगत मला पसंत पडते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, बुद्धाला झालेले ज्ञान आणि मिळालेली शांती ही वडाच्या झाडाखालीच मिळाली होती! तेच जर माडाचे झाड असते तर याने बुद्धाच्या ज्ञानास हजार फाटे फोडले असते!

माझी दिनचर्या अशी झाडामाडांत संपते. दिवसाचे चार प्रहर आणि प्रत्येक प्रहरात भेटणारी माणसे नि झाडे माझा दिनक्रम आकारतात. माझे रूप मी सतत इतरांत पाहातो. मग ती माणसे असोत किंवा झाडपाले असोत. हळूहळू मला झाडांचा रंग चढतो आणि मी माणसांना हसत राहातो. जन्मभर मी झाडांच्या छायेत वावरेन. मेल्यावरही झाड सोडणार नाही. या जन्मात वट-पिंपळाखाली मला इतके ज्ञान झाले तरी पुष्कळ झाले. अथवा या जन्मानंतर मी पिंपळावरचा मुंजा होणे अटळ आहे.

# एक शहाणा, काही वेडे

गावगन्ना जगण्याच्या तऱ्हा बदलाव्या लागतात. आपल्या लहानग्यांना दिनचर्येचा आदर्श तपशील जो आपण शिकवतो त्याबरहुकूम सर्वस्थली, सर्वकाली जर आपण आपलाही दिनक्रम ठेवला तर गोत्यात आल्याशिवाय राहाणार नाही. देशकालपरत्वे तपशिलात फरक करावाच लागतो. सुटीच्या दिवसांत खेड्यावर जातो तेव्हा (तीन पंचवार्षिक योजना आटपल्या तरीही) सकाळी उठून कानावर जानवे अडकवायचे आणि हातात तांब्या घेऊन गावकोसाबाहेर जायचे हे ठरलेलेच असते. पण तेच जेव्हा इथे मुंबईत असतो तेव्हा सकाळी दुधाच्या रिकाम्या बाटल्या घेऊन जावे लागते आणि येताना दूध भरून त्या आणाव्या लागतात. ज्या वयाला खेड्यावर केवळ रस्त्याने चालत गेले तरी नमस्कार मिळतात तेच वय बससाठी इथे रांगेत उभे असते आणि पुढची भाजीवालीही नंबर चुकवला तर फटकारते. केवळ आळशी निवांतपणा हाच खेड्यावर मुख्य उद्योग असतो आणि तो ज्याच्या ठायी भरपूर तो इसम खानदानी गणला जातो. शहरात तुम्ही रिकामे राहिलात की संपलात. किमानपक्षी बसच्या रांगेत तरी तुम्ही उभे राहिलेच पाहिजे आणि वेळ सत्कारणी लावला पाहिजे.

मुंबईची मौज ही अशीच असते. इथे धनिकाच्या वेळेला जबर मोल आणि भिकाऱ्याच्या वेळेला कवडीमोल असा भेदभाव नाही. प्रत्येकाच्या

सामाजिक वर्तनाला इथे कायद्याचे सूत्र लाभलेले असते आणि 'कानूनसे' सर्व काही ठीक चालते.

पण ठीक चालते याचा अर्थ जसे चालणे जरूर तसे चालते असा नव्हे. ठीक म्हणजे शांतपणे चालते. बिनबोभाट चालते. कोटातल्या भर रस्त्यावर 'लंच अवर'मध्ये बाहेर पडल्यावर बॉस आणि कारकून एकाच वेड्याचे चाळे पाहात शांतपणे उभे असतात किंवा बसच्या रांगेत ते शेजारी उभे असतात आणि बस आल्यावर कारकुनाने आपला नंबर बॉसला दिल्यामुळे बॉस ऑफिसात आधी पोहोचतो. पण म्हणून उशिरा येणाऱ्या कारकुनाला तो 'लेट-मार्क' केल्याशिवाय सोडत नाही. तो काय आणि इतर काय, सारे कायद्याने चाललेले असतात.

भायखळा ब्रिजच्या मोठ्या चौकात एकदा एक वेडा पोलिसाच्या जाग्यावर उभा राहून रहदारी नियंत्रण करू लागला. जवळजवळ अर्धा तास निमूटपणे शहाणे वेड्याच्या नियंत्रणाखाली होते. हमखास अपघात होणाऱ्या त्या जागी त्या दिवशी एकही अपघात झाला नाही!

एखाद्या सुमार खेड्यात एखादा वेडा अचानक उपटला तर सारे गाव आपले उद्योग सोडून त्याच्या समाचारासाठी धावेल आणि मग जरा वेळाने त्या गर्दीतून अस्सल वेडा वेचून बाजूला काढणे तुम्हांला शक्य होईलच याची खात्री देता येणार नाही. पण मुंबईत ही गफलत होणार नाही. तासन तास वेडा आणि शहाणे यांची एकत्र मैफल रंगली तरी वेडा तो वेडाच आणि शहाणे ते शहाणेच. त्यांच्यामध्ये कायद्याची एक प्रचंड भिंत उभी असते. वेड्याचे कायदे निराळे असले तरी मुंबईत तोही कायद्यानेच चालतो. तो सज्जनांसाठी असलेल्या कायद्यांवर कधीही आक्रमण करीत नाही. शहाण्यासुर्त्यांसाठी असलेले कायदेकानू आपल्या वाट्याला यावेत असली स्वार्थी अपेक्षाही कधी धरीत नाही.

खड्या पारशीजवळ एक रेल्वेचा 'ओव्हरब्रिज' आहे. तिथे एका सकाळी दहा वाजता एका वेड्यास काही शहाणे आडवे आले. (वास्तविक हे वाक्य सापेक्षतावादास धरून नाही. माझा लेख वाचल्यावर तो वेडा 'काही वेड्यांस शहाणा आडवा आला' अशा रीतीने ते दुरुस्त केल्याशिवाय राहाणार नाही.) ती मैफल फारच रंगली. पुलाखालच्या एका लोखंडी तुळईवर तो

वेडा 'घोडा-घोडा' करत बसला होता. त्याच्या पायाखाली लगेच लोकलच्या ओव्हर हेड लाइव्ह वायर्स होत्या. गाडी येताच कदाचित त्या धक्क्याने तो खाली पडला असता; कदाचित आणखी अनर्थ ओढवला असता. बरे, त्याला तिथून बाजूला घेणेही सोपे नव्हते. त्याला स्पर्श करणाऱ्या अनेक हातांबरोबर त्याने जिवंत विजेच्या तारांना स्पर्श केला तर सगळ्यांनाच एकदम मुक्ती लाभली असती. एक फायर ब्रिगेडचे पथक नाना तऱ्हांनी कथेची उकल कशी करावी याचा विचार करीत होते. आणि तुळईच्या घोड्यावरची आपली मांड पक्की रोवून वेडा निरागस कुतुहलाने सारा खेळ शांतपणे पाहात होता. जणू तो त्या गावचा नव्हताच! जणू त्या भयानक कथेचा तो नायक नव्हताच!

त्याच्या चारी बाजूंस निळ्या पोशाखातले आणि डोक्यावर लोखंडी बादल्या उलट्या घातलेले अग्निशामक सेवक पाहून त्याला मोठी गंमत वाटत होती. माणसाच्या राहणीमानात सुधारणा होत गेली आणि वल्कलापासून टेरेलिनपर्यंत वस्त्रप्रावरणात क्रांती होत गेली हे त्याच्या कानावर आले होते. तरीसुद्धा समोर दिसणाऱ्या अग्निशामक लोकांचा तो पोशाख त्याला करमणूक करणारा वाटत होता. 'माणसाला फक्त तीन हात जागा पुरते' असे लहानपणी त्याने वाचले होते. (त्यावेळी तो शहाण्यांत जमा होता. आज त्याचे वय व अनुभव वाढला होता. आता, 'माणसाला घोडा घोडा करून बसण्याइतकी जागाही पुरे असते' असे त्याचे मत होते.) तसेच माणसाला वस्त्र म्हणून चार चिंध्याही पुरेशा असताना हे असले रंगीबेरंगी पोषाख ते का घालतात आणि उलट्या बादल्या टोप्या म्हणून का वापरतात ते त्याला समजत नव्हते. त्या अग्निशामक दलात पाचसहा सेवक होते आणि एक त्यांचा अधिकारी होता. ती सारी मंडळी दोर फेकून त्याला त्या दोराच्या फासात अडकवण्याचा प्रयत्न करीत होती. दोराचा फास जसजसा त्याच्या जवळ येई तसतसा तो हाताने त्याला दूर ढकली. ते शिपाई त्याने त्या फासात स्वतःला अडकवून घेण्यासाठी त्याची भलावण करीत होते. पण सहजासहजी दुसऱ्याच्या फासात मान अडकवून घेण्यास असा कोण तयार होईल? तरीही शहाण्यांच्या फासात वेड्याने निमूटपणे मान द्यावी अशी त्या 'पोशाखी' शहाण्याची इच्छा आणि ते तो करीत नाही म्हणून त्याची वेड्यात खातरजमा! स्थितप्रज्ञ वृत्तीने वेडा तो सारा प्रकार पाहात होता. तेव्हा

त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनात काय चालले असावे ते सहज समजून येत होते. इतक्यात जोरजोराने शिटी फुंकीत खालून लोकल आली. विक्राळ आवाज काढून वेड्याच्या पायांपासून थोड्या अंतरावर ती थांबली. गाडीतून दोन्ही अंगांनी माणसांचे लोट बाहेर पडले व रुळांवर गटगटाने उभे राहून वरच्या वेड्याकडे पाहू लागले. पण त्यांनी असे नुसते पाहात राहावे हा त्यांच्या कर्तृत्वाचा केवढा बरे अपमान होता? त्यांचे मेंदू तरतरीत होते आणि त्यांची कल्पना जिवंत होती, शाबूत होती. प्रसंग इतका जिवंत लाभला असताना केवळ प्रेक्षकांची भूमिका करीत उभे राहावे हे त्यांना साफ नामंजूर होते! मग खालचे बवे एकदम क्रियाशील झाले. माकड हे माणसाचे पूर्वज. तेव्हा 'त्या' पातळीवर तरी आपल्यांत व वेड्यात समान पातळी निर्माण होते का ते त्यांनी चाचपून पाहिले. एकदोघांनी त्याला नाक खाजवले तेव्हा त्यांच्या शेजारी उभ्या असलेल्या दुसऱ्या चारचौघांना ती आपुलकीची भाषा मनोमन उमगली. हसून त्यांनी त्या चेष्टितांचे स्वागत केले. पण तुळईवरच्या वेड्याला ढिम्म नाही. त्याचे ओठ किंचित विलग झाले व शुभ्र दंतपंक्ती अचानक चमकली. पण ते गालहास्य खालच्या मर्कट-लीलांना उद्देशून होते असे समजता आले नसते.

पाहाता पाहाता आता त्या स्थानास रणांगणाचे स्वरूप प्राप्त झाले. अग्निशामक पथकाने आता आपल्या उंच शिड्या, तऱ्हेतऱ्हेचे दोर, झोळ्या, पाळणे आणून ते ठिकठिकाणी उभे केले होते. दुसऱ्या रुळावर गर्दी उभी असल्याने त्या लाइनवरची एक गाडीही तिथे उभी राहिली होती आणि आतले सारे प्रवासी पहिल्या गर्दीत येऊन मिळाले होते. ही नव्या दमाची कुमक आल्याने आता त्या अस्ताव्यस्त गर्दीनेही आपले मोर्चे बांधले. आवाज्या उभारल्या आणि हिंसेपासून करमणुकीपर्यंत प्रत्येक पथकाला कामे वाटून दिली. वेड्याला दगड मारणे हिंसक पथकाने आपल्या हाती घेतले; त्याच्या मर्कटपूर्वजांनी त्याला आपल्या हाती घेतले; त्याच्या मर्कटपूर्वजांची त्याला आठवण करून देण्यासाठी नाट्य व सर्कस करण्याचे काम करमणूक पथकाने आपल्याकडे घेतले.

त्या विस्तृत समाजाची कायदा पाळण्याची वृत्ती, मानवताप्रेम, संघटना-चातुर्य आणि कार्यैकदृष्टी पाहून माझे अंतःकरण भरून आले. उभ्या

पृथ्वीखाली सुरुंग लावून ती उडवून देण्याची जय्यत तयारी आज प्रत्येक अच्युच पातळीवर व अग्रहक्काने चालली असताना एका वेड्याचे यःकश्चित प्राण वाचवण्यासाठी समाजाचा केवढा हा खटाटोप! वेडा असला म्हणून काय झाले? प्रत्येकाला जगण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे! किंबहुना, घाऊकरीत्या, अत्यंत प्रगत समाजाने, त्यांना ठार मारेपर्यंत ते जगले पाहिजेत, जगवले पाहिजेत! किंवा तसे तरी कसले? आज एवढे अवाढव्य तनमनधन खर्च करून देशोदेशीचे शास्त्रज्ञ आणि समाजनेते विध्वंसाची साधने इतकी विपुल प्रमाणात निर्माण करीत असताना व त्यांनी आमची कोठारे भरून वाहात असताना, आजच्या प्रगत माणसाने विजेच्या तारा पकडून किंवा गाडीसमोर उडी टाकून मरण्याची इच्छा धरावी हे किती क्षुद्र आणि म्हणूनच त्याच्या प्रगतीस किती लांछनास्पद आहे बरे? असेच जर सगळे एक एक करून मरून जातील तर त्या भव्यदिव्य अस्त्रांचा उपयोग तरी कोणता आणि त्यांच्यापुढे भक्ष्य म्हणून टाकावे तरी काय? असल्या उन्नत विचाराने प्रत्येकजण भारला होता व वेड्याचे प्राण वाचवण्यासाठी स्वतःच्या जिवाचे रान करीत होता. आमच्या देशातले व्यक्तिस्वातंत्र्यही त्या घटनेवरून सहज ध्यानात येण्यासारखे होते. समाजातला एक घटक वेडा झाला, त्याला समाजाचा इलाज नव्हता. मुंबईसारख्या शहरात असले अनंत प्रकारचे अनंत वेडे सापडतील. पण वेडा झाला तरी त्याने स्वेच्छेने स्वतःसाठी जी 'करिअर' पत्करली होती ती पूर्णपणे राबवण्यासाठी त्याला समाज संधी देणार होता. त्याला भरल्या ताटावरून असे मधेच उठून जाता येणार नव्हते; जाऊ दिले जाणार नव्हते. प्रत्येकाला इथे व्यक्तिस्वातंत्र्य होते. या स्वातंत्र्यप्रेमापोटी एका वेड्याचा जीव वाचवण्यासाठी सरकारचे चतुरंगदल आणि समाजातील सारे शहाणपण सिद्ध होते!

आता त्या कुरुक्षेत्रावर घटना फारच वेगाने घडू लागल्या. लोकांच्या उत्साहाला उधाण आले. किंबहुना, लोकांचा उत्साह आटोक्यात आणण्यासाठीच आता पोलिसांची कुमक मागवली गेली. पुलावर, रस्त्यावर, रुळांवर माणसांचे थवेच्या थवे उभे राहिल्याने अगदी बाहेरून येणाऱ्या नवीन माणसांना आत काय चाललेय ते प्रत्यक्ष कळत नव्हते. तेव्हा स्वतंत्र माहितीखाते उघडण्यात आले. लोकलचा अपघात, आत्महत्या, पूल उडवून देण्यासाठी घातपात,

असल्या चवदार बातम्या पाहाता पाहाता पसरू लागल्या आणि दरडोई पुढे जाताना त्या बाळसे धरू लागल्या. एकच हलकल्लोळ उडाला.

इतक्यात त्या असंख्य वेड्यांचा तो एकूण प्रकार असह्य झाल्याने तुळईवरचा तो शहाणा सावकाश, संथपणे खाली उतरला आणि रस्त्यावरून चालू लागला.

आणि आपली करमणूक अशी अचानकपणे बंद करून चाललेल्या त्या वेड्यामागे मग शहाण्यांचा तो जथाही संतापाने हातवारे करीत तसाच चालू लागला!

# मागचे पाहून घेतील

नऊ पस्तिसला मी रांगेत जाऊन उभा राहिलो. नेहमीप्रमाणे पंधरा मिनिटांनी एक बस आली. टणटण घंटी वाजवून ती पसार झाली. नेहमीप्रमाणेच. पाच मिनिटांनी मग दुसरी बस आली. एक इसम आत चढला. त्यामागोमाग तिसरी बस आली. सगळी रांग एकएक पाऊल वर सरकली, पण आत कुणाचाच शिरकाव झाला नाही. कंडक्टरचा कठोर हात आडवा आला आणि त्यामागोमाग त्याचे ते परवलीचे शब्द—"जागा नाही. मागची बस रिकामी आहे!"

बसमध्ये शिरकाव होवो किंवा न होवो, बस येऊन गेली की प्रत्येकजण एक तरी पाऊल बसच्या दिशेने पुढे सरकतो. लौकिकार्थाने हरघडीस आपली 'प्रगती' होत आहे हे समाधान काही औरच असते. ते मिळवण्यासाठी दुसऱ्या कुणावर अवलंबून राहावे लागत नाही. त्यात आपली अस्मिता पोसली जाते ती निराळीच.

पण मला अचंबा वाटतो तो कंडक्टरच्या त्या स्थितप्रज्ञ सूचनेचा : "मागची बस रिकामी आहे!"

जगण्यासाठी माणूस किती क्षुद्र निमित्ताला टेकलेला असतो! किती थोड्या शब्दांत त्याची पराभव पत्करण्याची तयारी होते! किती सहजपणे तो आत्मवंचना करून घेण्यास सिद्ध होतो!

तसे पाहिले तर बसच्या तुटक्या रांगेत येणारा हा किरकोळ अनुभव एका विशाल जीवितानुभवाचाच एक भाग आहे. माणूस पराभव पत्करण्याला कधीच डरत नसतो. फक्त प्रत्येक पराभवानंतर कुणी तरी त्याला सांगायला हवे, "ते 'तसं' असतं तर आज तुमच्यावर 'असा' प्रसंग येता ना. चालायचंच!" एवढे म्हटले की मग त्याची तक्रार असत नाही. पण एवढे कधी म्हटले जात नाही हेही तितकेच खरे. पराभूतांची अस्मिता शाबूत राहाणे त्यांच्या दृष्टीने जसे महत्त्वाचे असते तसेच ती डंखित करण्यातच इतरांचा अहंकार पोसला जात असतो. म्हणून या चार शब्दांनाही माणूस महाग होतो.

वास्तविक लहानपणापासून माणसाला हवे तसे शिक्षण मिळालेले असले तरी प्रौढपणी हा फरक होतो. पाय घसरून लहानपणी पडताच जवळचे-दूरचे, आप्त-स्नेही सारे एकदम स्वाभाविक प्रतिक्रियेनेच 'उंदीर पळाला' हे समहगीत म्हणतात. त्यात तरी दुसरा कोणता अर्थ असतो? उंदरावर पराजय लादून आपली 'तंगडी' बचावण्याचे सुंदर आणि साधे तत्त्वज्ञान 'पडलेल्या बाला'स शिकवण्यात, प्राण्यापासून माणसापर्यंत आपल्या झालेल्या उत्क्रांतीचे शिखर आपण गाठत असतो. पडलेल्या बालकाच्या ठिकाणी कोणतीच अस्मिता असू शकत नाही म्हणून लहानथोर सारी माणूस-मंडळी एक होऊन किरकोळ उंदराची हुर्यो करून वेळ मारून नेतात. "तू कसला पडलास? तो पाहा तिकडे उंदीर पळाला," एवढ्यात माणूस खूष असतो. 'तंगडी सलामत' तर असले 'पचास' उंदीर सहज पिटाळून लावू ही जिद्द लगेच त्याला उठून उभी करते!

'मागची बस रिकामी आहे' हा त्यातलाच प्रकार. मात्र प्रौढ बुद्धीची तार्किक खात्री पटवण्याची ताकद या मंत्रात आहे. उंदरावर लादला गेलेला पराजय खोटा असतो. त्यातला समाधानाचा भाग एवढाच की, दुसऱ्याचा पराभव झाला, दुसऱ्याची फजिती झाली, हे सुख. प्रौढ मनाला दुसऱ्याचा पराभव कितीही हवासा असला (खरे तर तो बालापेक्षाही जास्त हवा असतो.) तरी इतक्या सहजपणे ते तो मानीत नाही. ते मन प्रौढ व अनुभवी असते ना! इतक्या सहजपणे व विनासायास फसायचे, फसवायचे तर त्याने ते शिक्षण आणि तो अनुभव घेतला तरी कशाला? म्हणून ते सूक्ष्म युक्त्या काढते. दुसऱ्याचा पराभव दाखवून त्याला गप्प करणे तितकेसे सोपे असत नाही. त्यापेक्षा

त्याला आशा दाखवली तर काम सहज होते. "कुणालाच जागा नाही. पाहा, सारे कसे ताटकळत उभे आहेत" असे सांगून रांगेतला माणूस ऐकत नाही. पण 'मागची बस रिकामी आहे' म्हणताच एक पाय फूटबोर्डावर ठेवून आत घुसण्याचा प्रयत्न करणारा कट्टर प्रयत्नवादीही झटकन पाय मागे घेऊन रांगेतले आपले आसन व नंबर भक्कम करून उभा राहातो. मागून येणाऱ्या रिकाम्या बसची वाट पाहात!

'मागचे पाहून घेतील' हे फार सोयीचे आणि सुखाचे समाधान असते. कंडक्टरची सारी लढत कौशल्याने त्याने 'मागच्यावर' लोटलेली असते. अफाट हल्ला मुलायमपणे दुसऱ्याकडे वळवण्यात त्याला सेनानायकाचे कौशल्य व पराक्रम दाखवल्याचा सुप्त आनंद होत असावा. बरे, 'मागची बस रिकामी आहेच तर तुझ्याशी—आणि मुख्य म्हणजे चालू वडीला—हुज्जत घालण्यात काळ व श्रम यांचा अपव्यय करा कशाला' हा उतारूंच्या दृष्टीने किती प्रौढ विचार! मागची बस रिकामी नसती तर त्यांनी चालू कंडक्टर 'तसा' सोडला नसता! केवळ घनचक्करच तिथे संभवली असती. पण तो वाचला. केवळ मागच्या रिकाम्या बसमुळे.

चालू क्षणात उभे असलेल्या प्रश्नांशी दोन हात करणे नेहमीच फार जिकिरीचे असते. प्रश्न टाळणे, ते उद्यावर ढकलणे फार सोयिस्कर असते, सुखाचे असते! आजची लढत उद्यावर—निदान घटकाभरावर—ढकलण्यासाठी किरकोळ निमित्त माणसाला बहाल करणारा कंडक्टर मनुष्यस्वभावाचा फार मोठा जाणकार असला पाहिजे.

माझे एक वकीलमित्र आहेत. मोठा महत्त्वाकांक्षी इसम. गेली पस्तीस वर्षे क्षणक्षण राबून त्यांनी धंदा राबवला आणि माया उभी केली आहे. पाच वर्षे धंदा करून जम बसत चालला तेव्हा म्हणायचे, "मंगेशजी, आपण ठरवलंय. बरोबर पन्नासाव्या वर्षी हा धंदा बंद करायचा. खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं. आहे काय दुसरं त्यात? पन्नाशीनंतर लेखन, वाचन, मनन, चिंतन—काहीतरी भरीव काम करायचं. मागची पंचवीस वर्षे रिकामीच आहेत." आज त्यांचे वय त्रेसष्ट वर्षांचे आहे. दोन शिकाऊ वकील व स्वतःचा मुलगा हाताशी घेऊन आजही धंदा जोरात चालू आहे. त्यांच्या फीत दसपटीने वाढ झाली आहे. अजून भेटले की पहिले वाक्य हे,

"'जेरीस आलो बुवा. एवढं या सूरजमलच्या लफड्यातून बाहेर आलो की सारं मुलावर सोपवून देणार. निदानीची दहा वर्षं तरी रिकामी आहेत. काही चिंतन करावं असा विचार—"

या गृहस्थांना गेल्या पस्तीस वर्षांत दोन दिवस सुटी घेऊन महाबळेश्वरास जाता आलेले नाही. अनेकदा म्हणाले, "मंगेशजी, ठरलं बरं का. हिनं अगदी 'शो-कॉज' नोटीसच दिलीय. महिन्यानंतर नाताळात उटीला जाऊन येणार. हसू नका. या खेपेस अगदी नक्की. बवाल तुम्ही." मुद्दाम सुटीपूर्वी दहा दिवस त्यांच्याकडे गेलो. तितक्याच उत्साहाने म्हणतात, "मी म्हणतो, आताच काय घाई आहे? दहाबारा दिवसांत म्हणजे नाहीतरी धावपळच होणार. त्यापेक्षा नक्की ठरवलंय की, यंदा उन्हाळ्यात महिनाभर महाबळेश्वरलाच जायचं. अहो सबंध एप्रिल, मे रिकामेच आहेत."

'मागचे पाहून घेतील' हा काही इतरांपुरता करायचा वाद नाही. स्वतःचे प्रश्न सोडवण्याचाही तो हमेश फलदायी असा उपाय आहे. चालू पराभव, जबाबदारी, श्रम किंवा कर्तव्य यांबद्दलच्या नाकर्तेपणावर त्यामुळे चांगले पांघरूण पडते. शिवाय जिद्द कायम राहाते ती निराळीच. कारण, प्रश्न सोडवण्यात अपयश आले असे न मानता त्याची सोडवणूक उद्यावर ढकललेली असते आणि 'उद्याच्या' लढाईत यश हमखास आपलेच असते!

पण त्या उद्याच्या लढाईकडे लागलेले माणसाचे डोळे थोडे करुण असतात. नीटपणाने पाहिले तर त्याच्या या खुबीच्या आत्मवंचनेला कारुण्याची झिरझिरीत झालर असलेली दिसून येईल. उद्यावर, पुढच्या घटकेवर, ढकललेल्या साऱ्या लढतीतून, न जाणो, थोडेफार यश कदाचित मिळेलही अशी एक अंधुक आशा—अपेक्षात्मक विचारसरणी—प्रत्येकाच्या मनात असते!

नाहीतर 'मागची बस रिकामी आहे' असे कठोर हातांनी (पण मिस्किल चेहऱ्याने!) म्हणून टणटण करून पुढे जाणारा कंडक्टर तसे म्हणताच रांगेतल्या एकूण एक उतारूंनी, त्या कधीही न येणाऱ्या मागच्या रिकाम्या बसकडे भाबडेपणाने आणि केविलवाणेपणाने अशा नजरा वळवल्या नसत्या!

## छळवादी

शब्दाचा अर्थ आयुष्य जगत असताना पक्का होत जातो. अनुभवाच्या मुशीत शब्दाचा नेमका आणि पक्का अर्थ सघनपणे आळून बसतो. शब्दकोशातील शब्द आणि त्यांचे अर्थ म्हणजे मांडावर विकायला ठेवलेल्या चुरमुऱ्याच्या भुसभुशीत भोतासारखे असतात. त्यांना व्यक्तित्व नसते. त्यांच्या चेहऱ्या-मोहऱ्यांवर अजून आशयाच्या छटा उमटायच्या असतात. एका रांगेत आणि उंचीप्रमाणे ते उभे असतात खरे, पण अजून त्यांचे जिणे समाईकच असते. दिनचर्या घाऊक असते. रंगहीन, गंधहीन अशी त्यांची फक्त कुडी उभी असते.

पण आदिमायेने एकदा का त्यांना जीविताच्या रणांगणात खेळायला पिटाळले की मग व्यक्ती आणि अनुभूती यांच्याशी होणाऱ्या त्यांच्या झोंबा-झोंबीने त्यांना रंग चढू लागतो. कुणी बाळसे धरतात, कुणी तसेच पोरके राहातात. कुणी छचोर बनतात तर कित्येकांच्या अंगावर गंध-भस्माचे पट्टे येतात. आता शब्द चुरमुऱ्यासारखा सफेत आणि विशविशीत उरत नाही. डाळ आणि शेंगदाणे यांच्यासारख्या इष्टमित्रांच्या संगतीत आणि अनुभवाचे तिखटमीठ पेहरून ते जीवनकलहाच्या आचीने उलथेपालथे झालेले असतात. त्यांचा खमंग चिवडा झालेला असतो. शब्दकोशातला शब्द चुरमुरा असेल तर जीवनात वापरलेला शब्द चिवड्यातल्या चुरमुऱ्यासारखा तिखट आणि व्यक्तित्वसंपन्न असतो.

आणि शब्दाच्या 'नेमक्या' अर्थाचा उगम अशा प्रकारे जीवितानुभूतीत असतो हे एकदा मान्य केले म्हणजे मग ती अनुभूती जितकी तीव्र आणि प्रामाणिक तितका तो अर्थ अधिकाधिक 'खरा' हे मान्य करणे ओघानेच येते. व्यासपीठावर आरोळ्या ठोकणाऱ्या एखाद्या आधुनिक राजनीति-धुरंधराला शब्द म्हणजे काय ते कधीच समजलेले नसते. किंबहुना त्याच्या अखंड 'ध्वनियज्ञा'त शब्द त्याला एकसारखे टांग मारून पाडीत असतात. अशा शब्दसृष्टीच्या परमेश्वराचे हे वाक्‌तांडव म्हणजे वक्ता, श्रोते आणि शब्द अशा तिघांची ती एक 'फ्री-स्टाइल' झोंबीच असते. त्या गदारोळाचाच काय तो परिणाम तिथे जमलेल्या श्रोत्यांवर होत असतो! एरव्ही त्या शब्दांचा अर्थ कधीच देशांतराला गेलेला असतो. आणि असे असते म्हणूनच की काय बहुतेक राजकारणधुरंधर वक्त्यांना "मी तसे बोललोच नाही" असा खुलासा करावा लागतो. आणि ते खरेच असते. तो 'काही'च बोललेला नसतो. शब्दांच्या पलटणींनी त्याला चांगलेच कुबललेले असते इतकेच.

व्यासपीठावरील असले ध्वनिनाट्य, शैक्षणिक खुर्चीवरून बोललेले उप-देशात्मक शब्द, रंगभूमीवरून हिंडणारे 'मेकअप'मधले शब्द आणि समरांगणावरील मोजकेच पण भयंकर शब्द हे असेच एका अर्थाने खोटे असतात.

पण दैनंदिन व्यवहारात उमटलेले कित्येक शब्द मात्र अतिशय खरे असतात आणि म्हणूनच ते नेमके, जोरकस आणि अर्थगुरू वाटतात. पति-पत्नी, प्रियकर-प्रेयसी, मित्र किंवा गुरु-शिष्य अशा जोड्यांमधील काही शब्द जन्माला येऊन जीवनाचे सार्थक करतात. कित्येकदा हे शब्द 'ध्वनिरूप' असण्या-ऐवजी 'स्पर्शरूप'ही असतात आणि मग तर त्यांच्या अर्थात आशयाचे सागर उधाणले आहेत असे प्रत्ययास येते. हे शब्द केवळ दंत, जिव्हा आणि ओष्ठ यांच्या वापरानेच उच्चारले जातात असे नसून कधीकधी फक्त डोळेही ते शब्द उच्चारतात! तिथे 'शब्द' काहीच बोलत नाही. अर्थाच्या एका अवाढव्य गाठोड्यावर तो शब्द म्हणजे एक 'लेबल' असते. किंवा ती एक कळ असते. ती कळ दाबायची आणि अर्थाचा डोंगर आपल्या अंगावर कोसळून घ्यायचा. या शब्दाला 'प्रतिशब्द' नसतो; त्याला साथीची, क्रियेची साद असते.

आई आणि तिचे एखादे अजाण बाळ यांमधील शब्दोत्सव तुम्ही कधी एकाग्रतेने ऐकलेला आहे काय ? असे 'उत्सव बहु थोर होत' नाहीत. ते तसे दुर्मिळच असतात. म्हणून भाग्यानेच एखादे वेळी ऐकायला, पाहायला सापडतात. मुख्य म्हणजे या पात्रांनी सोंगे घेतलेली असता कामा नयेत. ती खरी असायला हवीत. आई आईच हवी, बाळ बाळच हवे. आता यामधील पूर्वार्धच खरा असतो, उत्तरार्ध असू शकत नाही. आपण 'अजाण बालक, आहोत अशी मानसिक धारणा असलेले बाळ अजून माझ्या पाहाण्यात नाही. नुकतेच देवाघरून आलेले असल्याने की काय कोण जाणे त्याच्या 'सर्वज्ञते'बद्दल त्याला शंकाच नसते आणि असली प्राकृत शंका त्याच्या विषयात घेणाऱ्या मानवजातीबद्दल (तिचे प्रतिनिधित्व आईच्या रूपात त्याच्यासमोर असतेच.) त्याला अपरंपार दया असते. तेव्हा बाळ अजाण नसते. पण निदान आई तरी खरी असली पाहिजे म्हणजे मग त्यांच्यामधला शब्दोत्सव अतिशय उद्बोधक असतो.

अशा बाळाची 'शत्रू नंबर एक' म्हणजे आई! ती 'मातृदेवो भव' 'जिचे हाती पाळण्याची दोरी—' आदी सारी सुभाषिते लिहिली गेली ती, मला वाटते, बाळे म्हातारी झाली तेव्हा. म्हातारेही एका अर्थाने बाळ असले तरी ते अजाण नसल्याने 'खोटे' असतात. म्हणून त्यांच्या शब्द-सुभाषितांना फक्त ग्रांथिक महत्त्व असते. पण अजाण बाळास तुम्ही विचारा बरे! किंबहुना विचारण्याचे कारणच नाही. अशा एखाद्या 'बाळा'च्या तावडीत सापडलेली त्याची आई तुम्ही पाहा आणि तो खेळ जरा वेळ पाहात राहा. आईला 'माऊली' का म्हणतात ते तुम्हांला मग निराळे सांगायला नको. तिने आपली मान निमूटपणे त्या 'अर्भका'च्या स्वाधीन केलेली असते. साधी गोष्ट करण्यासाठीसुद्धा तिला प्रचंड व्यूह रचावा लागतो आणि 'शत्रू'च्या फळ्या फोडाव्या लागतात. एकेका हुकुमाबरोबर सूर्य, चंद्र, तारे भराभर खुडून आणावे लागतात. भरताच्या सार्वभौमत्वाप्रमाणे या बाळाचे तमाम प्राणिसृष्टीशी सलोख्याचे संबंध असल्याने आईलाही सिंह-व्याघ्रादी जंगली श्वापदांना मानगूट पकडून सतत रिंगणात आणावे लागते. बरे, हा सर्व कार्यक्रम होत असताना तिला तर्कशास्त्राची संगत अजिबात सोडून चालत नाही. 'तर्कशास्त्राची कडवट शराब' पिऊन धुंद झालेले

बालकाइतके दुसरे 'प्राणिमात्र' अजून माझ्या पाहाण्यात नाही. नव्हे, मी तर असेच म्हणतो की, प्रत्येक मातापितरांना आपल्या 'अजाण' बालकाच्या अत्यंत कठीण अशा तर्कशास्त्राच्या परीक्षेस अगदी प्रथम तोंड द्यावे लागते, त्यात ती संपूर्णतया नापास होतात आणि म्हणूनच मग केवळ 'श्रद्धेची' कास धरून त्यांना उरलेले आयुष्य संपवावे लागते. परवा एका गुंडाच्या तावडीत सापडलेली एक माता पाहात होतो. विषय होता त्या 'नीचा'ला भात भरवण्याचा. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' हे अशाच प्रत्यक्ष रणांगणाला पाहून एखाद्या संजयाने केलेले निरूपण असावे. यज्ञकर्म चालू होते! क्षणाक्षणाला त्या अबलेच्या सर्वस्वाची आहुती यज्ञकुंडात पडत होती आणि तीही 'वीरमाता' प्रत्येक घाव लीलया झेलत होती. शत्रू शरण आल्यावर तरी पूर्वीची धर्मयुद्धे थांबत असत! या युद्धाला तोही शेवट नसतो. बरे, इथे शत्रूला पार नष्ट करून ते संपवण्याची दयाही ते बालक दाखवीत नाही. शत्रूला केवळ घायाळ करून अर्धमेल्या अवस्थेत सोडून द्यायचे आणि पुन्हा नव्या दमाने शत्रूला फैलावर घ्यायचे ही त्याची नीती असते.

"अरे राजा, भात खायचा ना?" शत्रूचे सार्वभौमत्व एकदम मान्य केल्याने पुढचा समरप्रसंग टळावा ही आईची इच्छा.

आईकडे एक निर्घृण दृष्टिपात!

"भूक लागली ग चिमण्याला. सकाळपासून उपाशी आहे माझं बाळ ते." तिने त्याला एकदम कुरवाळले आणि मांडीवर घेऊन पुढे ताटली ओढली.

हे व्यक्तिगत संबंध 'राजा'ला कसे सहन व्हावेत! त्याने थाडकन ताटली उलथून फेकून दिली आणि विजयी मुद्रेने तिच्याकडे एकदा पाहिले.

'नरडीचा घोट घ्यावा' ही अंतरीची इच्छा दाबून आईने दुसरी ताटली आणली आणि त्याच्यापासून जरा दूर ठेवून ती पुन्हा दादा-पुता करू लागली.

नंतरच्या पंधरा मिनिटांत केवळ हुकूमशाही वृत्तीने त्या भाताच्या ताटलीत दूध, दही, ताक, पुन्हा थोडा भात, वरण, मीठ, मग साखर—असे किती पदार्थ येऊन मिसळले ते सांगणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. तो अमृतमधुर जीवनरस तयार झाला आणि पुन्हा एकदा त्याचा घास जिवाच्या आकांताने बाळाच्या मुखाकडे नेण्याचा तिने एक केविलवाणा प्रयत्न केला.

आपल्यासाठी तयार केलेले अन्न आई सांगते म्हणून एकदम मुखात

घेणारे विश्वासू बाळ अजून माझ्या आढळात यायचेय. एवढ्या लहान वयातही आपले अन्न आपल्यासमोर इतरांकडून प्रथम चाखवून ते 'विषहीन' असल्याची खातरजमा करून मग खावे हे ज्ञान त्या 'राजा'ला पक्के असते. इथे तर शत्रूच समोर असल्याने त्यानेच ते प्रथम चाखावे हे त्याचे म्हणणे सरळच म्हटले पाहिजे! आता तो अष्टसात्त्विकरसयुक्त 'घास' तिच्या मुखी कसा जावा? पण तेही कर्म तिने जिवावर उदार होऊन केले. आणि पुन्हा दुसरा घास तिने त्याच्या मुखाजवळ नेला. आता वास्तविक तो कार्यभाग संपायला हवा होता. पण नाही. आईनंतर, बाबा, ताई, माई आदी सर्व पितरांचे आणि प्रपितरांचे नाव घेतल्याशिवाय हा 'सुपुत्र' कधीच अन्नग्रहण करीत नसतो!

जे जेवणाच्या बाबतीत तेच इतर सर्व नैमित्तिकांच्या बाबतीत. या साऱ्या संगरास ती 'अबला' शिर तुटलेल्या मुरारबाजीप्रमाणे तोंड देत असते.

आणि अशा अनेक लढाया जिंकून जिवंत राहिलेली ती एकदा संगरात गुंतलेली असतानाच म्हणाली, "छळवादी आहे नुसता!" छळवादी, छळवाद! इतका अर्थगुरू शब्द प्रत्यक्ष जीवन भोगल्यावाचून कसा सापडणार? कुणी समाजवादी असतो, कुणी साम्यवादी असतो, तर कुणी गांधीवादी असतो. आईला आपले पोर 'छळवादी' वाटते. हेतू प्रामाणिक, अंतरी प्रेम, पण वृत्ती छळवादी. केवळ छळत राह्यचे. 'मज जन्म देई माता' म्हणून केवळ तिचा छळाने सूड उगवायचा. बाळाचे जीवितविषयक तत्त्वज्ञान एका शब्दात सांगायचे तर 'छळवाद!'

मात्र त्या निर्घृण छळानंतरही ती त्याच्या मुखी केवळ वात्सल्यधाराच स्रवते हेही त्या छळवादाचेच एक अंग असते!

# अजिंठा आणि 'वारूळ'

अठ्ठावीस गुहा, अर्धचंद्राकृती डोंगर आणि प्रत्येक गुहेतील लहानमोठ्या पुतळ्यांची ती सेना पाहून नवल वाटले की, काळाच्या वाहत्या ओघावर स्वतःच्या स्मृतीचा एक छाप मारण्याचे हे कसले भयानक वेड माणसाला लागलेले असते! माझ्या घरापलिकडे चार घरे मी माहीत व्हावा आणि पिढ्यान पिढ्या मी 'कीर्तिरूपें उरावें' ही भूक सार्वत्रिक आहे, सत्य आहे; पण म्हणून ती मोलाची ठरते काय? या वेडापायी माणूस धरतीला भोके पाडीत सुटतो आणि आकाशावर हातापायाचे ठसे उमटवीत राहातो. त्यातून त्याला काय मिळते कोण जाणे, पण पंचमहाभूतांची लक्तरे लोंबवल्याचा ठपका त्याच्यावर आल्यावाचून राहात नाही.

गुहेतील शिल्पापेक्षा, खरे बोलायचे तर, बाहेरील शिल्पच अधिक आश्चर्यकारक होते. विश्वाचे अस्तित्व ते शिल्प जगजाहीर करीत होते. डोंगर हे नेहमीच प्रश्नचिन्हांसारखे भरीव असतात! आणि ते प्रश्नचिन्ह इतके भरीव, दमदार व गंभीर असते की ज्याला डोळे आहेत त्याला ते लाथाडून पुढे जाताच येत नाही. सृष्टीची कवाडे उघडीत तुम्ही पुढे पुढे जाता आणि शेवटी या प्रश्नचिन्हासमोर येऊन उभे राहाता. या प्रश्नातील अर्थ वाचण्याचे सामर्थ्य जिवंत प्रतिभेशिवाय इतरत्र असत नाही. म्हणूनच प्रज्ञाहीन प्रवासी डोंगराला सरळ धडक मारून, भोके पाडून आरपार पसार होतात.

जसे डोंगर तसाच तो पाऊस. पावसाने आकाशाचे धरणीशी नाते जुळते. सृष्टीच्या सर्जनाचा प्रत्यक्ष आविष्कार म्हणजेच पाऊस. पावसाच्या अनेक प्रकारांप्रमाणे त्याचे मनावर होणारे परिणाम वेगवेगळे असतात. उघड्या प्रदेशात मुसळधार पावसाचे धारानृत्य मनात जोष निर्माण करते, तर त्याची मेंगळट-पणाने होणारी रिपरीप मनात उदासीनतेची दलदल माजवते. ऊन-पावसाचा पाठशिवणीचा खेळ मनावर चांदणे पसरतो. आणि नुसतेच मळभ दाटून आले म्हणजे कोणत्याही प्रश्नाची तड लावावी असा हुरूपच वाटत नाही.

अजिंठ्याच्या गुहा एकामागून एक पाहाताना तिथे 'पाहायला' जमले त्यांनाच पाहाणे मोठे उद्‌बोधक ठरते. माणूस माणसाला किती प्रकाराने बनवीत आला आहे पाहा! गुहेमागून गुहा पाहाताना या कित्येकांना केवळ 'आपण काहीतरी पाहिले' याचे समाधानच अपूर्व वाटते. आपल्या गाठी काही कर्तृत्व जमा झाले म्हणजे जीवनाचे सार्थक झाले ही भावना. दुसऱ्या कित्येकांची भावना, पूर्वी समाज किती पुढारला होता, त्याने किती उच्च संस्कृती निर्माण करून ठेवली आहे, असे म्हणत स्वतः न्यूनगंडाने पछाडणे अशी असते. कोणी परदेशी मुशाफीर येतात, ते भारतात आल्यावर प्रथम पाहाण्याची ठिकाणे अशी असल्या स्थळांची नोंद त्यांच्या प्रवासी कार्यक्रमात झालेली असते म्हणून. आणि रिकामटेकड्यांची रीघ असल्या स्थळी लागते हे माहीत झाल्याने मिळेल तो दाणा गोळा करावा या हेतूने वारुळातून बाहेर पडणाऱ्या मुंग्यांच्या रांगेसारखी प्रामाणिक पोटभरूंची रांग तिथे जमा होते ती मात्र त्या स्थळाची खरी शोभा.

एका बाजूने वारुळातून अव्याहतपणे माणसांची रांग बाहेर पडत असते आणि दुसरीकडे काळाच्या पोटात गडप होता होता वाहाणाऱ्या पाण्यावर आपल्या अस्तित्वाच्या खुणा उमटवून जाण्याचा ती प्रयत्न करीत असते. असली स्थळे आणि प्रदर्शने पाहायचीच कशाला?

काहीतरी निमित्त काढून शहरात वेळोवेळी जी प्रदर्शने भरवली जातात ती मी कधीच उत्साहाने पाहायला जात नाही. म्हणजे मी उत्साहाच्या विरुद्ध दिशेला तोंड करून जाणे नेहमी पसंत करतो असा त्याचा अर्थ नव्हे. उत्साह खरा असो, खोटा असो, उत्साहाची शेव धरून निमूटपणे जाणे मलाही आवडते. एकटा माणूस जेव्हा कंटाळतो तेव्हा तो गर्दीकडे तोंड करून चालू

लागतो. गर्दी मुळातच उत्साही असते. कुणाचे खिसापाकीट लंपास झाल्यामुळे गर्दी जमा होवो, किंवा एखादे लहान पोर चुकून सापडलेले असो; एखाद्या वेड्याचे चाळे पाहाण्यास ती जमा होवो किंवा शहाण्यांवर लाठीमार झाल्याने ती गोळा होवो; गर्दी नेहमीच उत्साहाची जननी असते. गर्दीत नेहमीच आनंदाचा गुणाकार आणि विषादाची वजावट होत असते. किंवा 'आपण समाजनिष्ठ आहोत' हे माणसाचे पुस्तकी ज्ञान गर्दीत त्याला प्रत्यक्षात अनुभवायला मिळते. तो गर्दीत खुलतो आणि गर्दीही त्याला नेहमी खुलवते. त्यामुळे वेळोवेळी ही प्रदर्शने भरवली जातात त्यांचा मुख्य उद्देश गर्दीच्या उत्साहाला वाट काढून देणे असाच असतो आणि म्हणून त्यात भाग घेऊन गर्दीच्या उत्साहाला सन्मुख होणे मलाही आवडते. पण मी प्रदर्शनांच्या वाटेला जात नाही त्याचे कारण मात्र निराळे आहे. असली प्रदर्शने बहुधा खोटी असतात आणि माणसाच्या नैसर्गिक उत्साहाला ती विनाकारण शास्त्रकारांच्या कसोटीवर घासून बघतात म्हणून मला ती आवडत नाहीत.

एखादे चित्रकलेचे प्रदर्शन घ्या. 'सब्र कुछ गौरीशंकर' अशा मासल्याचे चित्रदर्शन असले तर ते पाहिल्यावर मला 'गौरीशंकर' या असामान्य चित्रकाराची ओळख तर होत नाहीच पण त्या थोर कलाकाराची चित्राचित्रागणिक उभी असलेली तपस्या मोजूनमापून तुमच्या पदरात टाकण्याचा जो प्रयत्न त्या प्रदर्शनात असतो तो तर एकदमच निषेधार्ह वाटतो. कोणत्याही 'कलेचे प्रदर्शन' हा शब्दप्रयोगच मुळी बाजारी वाटतो. कला ही क्षणाक्षणाला आकार घेत असते आणि आकारताना प्रतिक्षणी नवीनवी भासत असते. ती प्रक्रिया किंवा कलेने मूर्त रूप घेणे हे कोणत्याही प्रकारच्या प्रदर्शनात 'दाखवणे' शक्य नसते. मग ते प्रदर्शन अगदीच घाऊक होते आणि चित्रांच्या मालिकेसमोरुन सरकणारी रांग शेवटचे चित्र आणि त्यानंतरचा आइस्क्रीमचा स्टॉल यात फरक करताना दिसत नाही. गुन्हेगार शोधून काढण्यासाठी होणारी 'ओळख परेड' आणि चित्रांच्या रांगांपुढून सरकणारी ही रांग यात अर्थाअर्थी तफावत नाही. असल्या प्रदर्शनात एकदोन वेळा मी जाऊन आलो. चित्रांच्या अखेरीस दिसणारी 'हेंचि फल काय मम तपाला' म्हणणारी चित्रकाराची केविलवाणी मूर्ती हीच काय ती त्या प्रदर्शनातली माझी पक्की आठवण राहिली. मग मी पुन्हा त्या वाटेस गेलो नाही.

काळाचे एक भले मोठे वारूळ उभे आहे! मुंग्यांच्या रांगेसारखी त्यातून माणसांची रांग बाहेर पडते आहे. कुठे तरी अज्ञाताच्या वाटेला जाऊन ती नष्ट होते आहे. या सातत्याच्या प्रवाहात सामान्य गडप होतात. पण असामान्य असे 'अज्ञात', 'अदर्शित' जाऊ इच्छित नाहीत. कुठेतरी आपल्या नावाची निशाणी उठवून ठेवावी ही एक अनिवार भूक त्यांना असते. त्या भुकेपोटी चिरंतनावर ते खिळे ठोकीत राहातात!

अजिंठ्याचे ते अलौकिक कलाप्रदर्शन असो किंवा एखाद्या धरणाचे, कारखान्याचे, रासायनिक प्रयोगशाळेचे प्रचंड बांधकाम असो, मुद्दाम उठून ते पाहायला गेलो की मला माझी वारेमाप दयाच येऊ लागते. ते पाहात असताना चेहऱ्यावर सारखा जिज्ञासूचा भाव जागता ठेवावा लागतो. आपली चौकस बुद्धी दाखवण्यासाठी सारखे वाटाड्यास प्रश्न विचारावे लागतात आणि पुन्हा ते प्रश्न अगदीच निरागस किंवा अज्ञानजन्य असणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. हे सारे करायचे तर त्या स्थळ-काळाच्या अलौकिकत्वाचे रसग्रहण करण्यासाठी लागणारा निवांतपणा आणि एकाग्रता मिळणे कठीण होऊन बसते. मी अनेक वेळा पाहिले आहे की, एखादा गट असे काही पाहात असताना दुपारच्या वनभोजनासाठी कोणत्या झाडाखाली पथारी पसरावी याकडेच माझे सारे लक्ष लागून राहाते. 'पाहायचे आहे ते अजून का संपत नाही?' हेच मन सारखे विचारीत राहाते. गर्दीबरोबर मी पुढे ढकलला जातो तेव्हा सारे शिल्प मला केवळ हसत असते!

अशा ठिकाणचे वाटाडे किंवा मार्गदर्शक म्हणजे एक अजब 'संस्था' असतात. स्थितप्रज्ञ या शब्दाला पात्र असणारा आजच्या काळातला हा एकमेव पुरुष. खरे सांगायचे तर प्रत्यक्ष शिल्प, चित्रे, कला वगैरे पाहाण्याच्या मोहापेक्षा या अजब प्राण्याला भेटण्याचा मोहच माझ्या असल्या सफरीच्या मुळाशी असतो. काळाचा प्रचंड प्रवाह, माणसाची कलाप्रियता आणि कर्तृत्व वा समाजाची बदलती मूल्ये यांचे एखादे उद्‌बोधक मिश्रण किंवा झलक पाहावी म्हणून जर आपण असली शिल्पे पाहायची ठरवली तर या सगळ्या अचंब्यास पुरून उरलेला एक प्राणी म्हणून हा वाटाड्या तुमच्यासमोर उभा राहील. माहिती सांगताना कर्ता-कर्म-क्रियापदांचा एक बशीभर चिवडा फक्कन तुमच्या पुढ्यात टाकायचा हे त्याचे वैशिष्ट्य.

असामान्य कलेवरती पान खाऊन पिचकारी टाकावी तसा त्याचा तो एकंदरीत भाव असतो. पाठ केलेला एखादा किस्सा हवेत नुसता फेकायचा. 'असामान्या'चे इतक्या निर्लेप अलिप्तपणाने वर्णन करणे हाडाच्या कलावंतालासुद्धा जमणे कठीण आहे. "हा बुद्धाचा पुतळा सातशे वर्षांचा आहे. गोष्ट अशी आहे की, बुद्ध भगवान तपस्येला बसले असताना त्यांना दीन-दुःखी मनुष्य दिसला. त्यांच्या मनाला अगदी फार कष्ट झाले. आता बघा, इकडून लाइट टाकला की बुद्ध भगवान दीनदुःखी दिसतात, इकडून लाइट टाकला की मुद्रेवर आनंद दिसतो आणि इकडून उजेड पाडला तर पुन्हा तपस्या सुरू दिसते. चला पुढं. इथं राजा स्नान करतोय आणि राण्या त्याला आंघोळ घालतात. बायांची वेणी घालण्याची पद्धत सातशे वर्षांपासून कशी आहे बघून घ्या. आता या बाजूला या..." वाटाड्याची वाक्छिन्नी आजही आपल्यासमोर मूर्ती घडवीत असल्यासारखी टाकटाक चालू असते. काळाचा अर्क प्रतिभेने काढून समोर ठेवलेला असतो पण त्यावर आपले प्रज्ञायुक्त भाष्य करताना वाटाड्याच्या मनात इतकाच विचार असतो की, 'ही पंधरा आणि ती दोन सतरा माणसे एकत्र करून एकदाच बरोबर घेतली की तेच तेच पुन्हा बोलायला नको.'

'थोरां'च्या महात्मतेची शेव धरून चालण्यात 'क्षुद्र' नेहमीच कृतकृत्यता अनुभवीत असतो. पण थोर काय आणि क्षुद्र काय, सगळ्यांचे उद्दिष्ट इतकेच असते की, नष्ट होणाऱ्या कालप्रवाहावर आपल्या नावाची निशाणी उठवावी आणि काही काळ तरी ती लोकांच्या स्मरणात राहावी. अजिंठ्याचे शिल्प व चित्रकला पाहाताना किती नकळत 'सामान्य' स्वतःच 'असामान्या'त सामावून घेतो पाहा. एखाद्या प्रसिद्ध चित्रासमोर तुम्ही उभे असता. भूतकाळातील चिरंतन सत्य व मूल्य पार्थिव स्वरूपात तुमच्यासमोर उभे असते. त्यातील कला, काळावर मात करून उरलेले त्यातील चिरंतनत्व, 'गेलेल्यां'ची कमाई आणि 'येणाऱ्यां'ना आव्हान, आणि आपले विस्मरण होऊ नये म्हणून माणूस करीत असलेली अविरत तडफड ही सारी वैशिष्ट्ये मूर्त स्वरूपात तुम्ही समोर पाहाता. इतक्यातच तुमची दृष्टी आजूबाजूच्या भिंतींवर जाते आणि वर्तमानातील 'क्षुद्र' व 'सामान्य' आपल्या अस्तित्वाची त्या भिंतींवर करीत असलेली जाहिरात पाहून तुमची मान खाली जाते.

'अमकातमका या तारखेस येथे भेट देऊन गेला' किंवा 'तमक्या संस्थेची सफर इथे अमक्या तारखेला येऊन गेली' असे आलेख भिंतीभिंतीवर चितारलेले असतात. ते वाचल्यावर पटते की, गतकाळातील चिरंतनत्व आणि वर्तमानातील अदम्य जीवनेच्छा यांचा तो लघुत्तम साधारण विभाज्य आहे.

पण या आलेखांना तरी मी का क्षुद्र समजावे? असला एखादा आलेख आणि श्रवण वेळगोळ्याचे ते भव्य शिल्प या दोहोंनाही सांधणारी एकच भावना आहे. 'आम्हीही आहोत' असे पुढच्यांना सांगत सुटणारी माणसाच्या अस्मितेची ती जाहिरात आहे! जे साधनसंपन्न असतात ते डोंगराएवढे पुतळे उभारतात, जे एकाकी असतात ते फक्त आपली सही तिथे उठवतात. दोहोंत फक्त प्रमाणभेद आहे, प्रकारभेद नाही. अजिंठ्याच्या बाहेरचा डोंगर आकाशाशी बोलताना दोहोंना पाहून सारखाच हसत असतो!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# प्राणिसंग्रहालयात मी

कल्पना विकण्यात किंवा राबवण्यात माणसाने परमोच्च यश मिळवले आहे ते गावोगावी असलेली प्राणिसंग्रहालये पाहिली म्हणजे एकदम पटते. या ना त्या निमित्ताने मी प्राणिसंग्रहालयात अनेक वेळा जातो. कधी लहान मुलाचा हात धरून, तर कधी डोक्यातल्या एखाद्या व्रात्य विचाराची कास धरून. पण काय असेल ते असो, प्राणिसंग्रहालयात मला एकदम मोकळे वाटते, घरच्यासारखे वाटते, अगदी सुस्थळी पडल्यासारखे जाणवते. आपल्या पाठीवरचा बोजा फाटकात ठेऊन मी आत शिरलो की दाही दिशांना विसावलेला तो प्राणिसमूह मला एकदम आपल्यात सामावून घेतो. एका असीम मुक्ततेच्या स्वैर आनंदात माझ्या मनाची कवाडे धाडधाड उघडतात आणि चित्तमयूर पिसारा फुगवून नाचू लागतात, विचारविहंग अवकाशात उत्तुंग भरारी घेतात!

'माणूस हा एक प्राणी आहे' असे म्हणण्यात वास्तविक माणसाचा अभूतपूर्व सन्मान आहे हे थोडा विचार केला तरी पटण्यास हरकत नाही. विज्ञानशाळेत प्रयोग करताना जिच्यावर प्रयोग करायचे ती वस्तू, प्रयोगपूर्व अवस्थेत असते तशीच, राखून ठेवावी लागते. म्हणजे प्रयोगानंतरचे तिच्यातील बदल प्रयोगपूर्व अवस्थेशी ताडून पाहाता येतात व निष्कर्ष काढता येतात. प्रयोगपूर्व वस्तूस 'कंट्रोल' म्हणतात. या प्राणिसंग्रहालयात तऱ्हेतऱ्हेचे प्राणी

'कंट्रोल'च्या स्वरूपात पाहाताना प्रत्येक प्राण्याशी माणसाच्या तथाकथित प्रगतीची तुलना करून बघताना मोठी मौज वाटते. आणि ती तुलना फार उद्‌बोधक ठरते. इतरेजनांचा डोळा चुकवून मी वारंवार प्राणिसंग्रहालयात जातो तो माझा हा अभ्यास पुरा करण्यासाठी.

एखाद्या औरसचौरस जागेत भक्कम कुंपणाआड हरिणशावकांचा तांड असतो. ज्याच्या एका स्वैर उडीत मैलन मैल अंतर सहजपणे ओलांडण्याचे सामर्थ्य आहे असे ते हरिण चार पायांवर एका ठिकाणी उभे पाहून मला स्वतःची शरम वाटते! शरम अशासाठी की आपल्या बुद्धि-प्रज्ञेची धाव कुंपणापलिकडे जात नाही हे समजून येताच वायुवेगाने धावणाऱ्या अशा चपळ प्राण्यांना कुलुपबंद करण्यात आम्ही कृतकृत्यता अनुभवतो म्हणून! कोण म्हणाला होता की, 'माणूस स्वतंत्र म्हणून जन्माला आला आहे पण नंतर तो बंदिवासात पडला आहे'? खरे तर माणसाला स्वातंत्र्याचे प्रेम नाही. शृंखलांचेच वेड त्याला सदोदित असते. जो स्वतः स्वातंत्र्याचा उपासक असतो तो इतरत्र पळभरही बेड्या साहू शकत नाही. पण माणसाला मात्र नेहमी शृंखलांचीच सोबत आवडत आली आहे. जेव्हा आपल्या पायांत त्या नसतील तेव्हा दुसऱ्यांच्या पायांत मोठ्या प्रेमाने तो त्या घालीत आला आहे.

बाजूचे हे व्याघ्रसिंहांचे पिंजरे पाहा. चार पायांवर उभे असलेले हरिण आणि पिंजऱ्यातील सिंह या दोहोंतला एक फरक चटकन ध्यानात येतो. हरिण कुंपणात बंदिस्त केले की गतिशून्य होते. माणसाला आपला विजय झाला असे वाटते. सिंह मात्र त्या छोटेखानी पिंजऱ्यातही आपल्या उपजत राजेशाही रुबाबाची आठवण ठेवून घुमत असतात. अगदी अशक्य झाले तर केवळ मानेलाच गती देऊन आपण जणू मुक्त जंगलात चंक्रमण करीत असल्याचा अभिनय ते बेमालूमपणे करतात. इथे माणसाने सिंहास बनवले की सिंहाने माणसाला चकवले हे ठरवणे फार कठीण असते. वास्तविक बनवा-बनवीच्या या प्रकारात जगाच्या न्यायाप्रमाणे प्रत्येकजण स्वतःलाच बनवीत असतो. अंगच्या अक्कलहुशारीने माणूस एक पाऊल पुढे टाकतो. पिंजऱ्यात बंदिस्त केलेला सिंह-वाघही जेव्हा पिंजऱ्याचे गज जुमानीत नाही तेव्हा माणसाची अस्मिता चवताळून उठते आणि मग वाघावर खडे मारण्याचा प्रयोग सुरू होतो. 'पिंजऱ्यामध्यें व्याघ्र सांपडे, बायकामुलें मारिती खडे'

या उक्तीत खडे मारणारे पुरुष असले तरी वाघ त्यांना बायका, मुले म्हणून स्वतःचा अहंकार शाबूत ठेवतात. सारा पराक्रम शेवटी सापेक्षच असतो !

पण प्राणिसंग्रहालयात माझे खरे शिक्षण होते ते माकडांच्या पिंजऱ्या-समोर. माणसाची सारी चेष्टिते मानवी गांभीर्याने करणारी माकडासारखी दुसरी जमात नाही. उभे प्राणिसंग्रहालय म्हणजे माणसाची एक माकडचेष्टा आहे हे माकडाइतके कोणासच कळलेले नसते. जीवनाविषयी अत्यंत अलिप्त असा भाव फक्त माकडांच्या चेहऱ्यावर दिसतो. काही मिनिटे परवा मी त्यांच्यासमोर उभा राहिलो तर तेवढ्या वेळातही त्या मर्कटकुटुंबियांनी मला कसरतीचा एकही प्रयोग दाखविण्याचे बाकी ठेवले नाही. त्यांचा उत्साह उतू जात होता. एक पोर आपल्या आईची शेपटी दोन्ही हातांनी धरून तिला उचलण्याचा प्रयत्न मोठ्या आत्मविश्वासाने करीत होते. पृथ्वीखाली सुरुंग लावून ती पेटविण्याचा प्रयत्न करीत असलेल्या आजच्या कोणत्याही नरपुंगवाने आपला आदर्श म्हणून ते पोर पुढे ठेवण्यास हरकत नाही. माकडचेष्टा करणाऱ्या त्या पोरांची सर्वांत मोठी गंमत ही की, त्यांच्या चेहऱ्यावर कधी तो 'मर्कटभाव' दिसायचा नाही. दिसेल ते सखोल गांभीर्य. तत्त्वज्ञानाचे पट्टे आणि टिळे फासून माणसाच्या ज्या माकडचेष्टा आज दिनरात चालू आहेत त्या पाहिल्या की आपण आपल्या पूर्वजांचे नाव सार्थ केल्याचा अभिमान माझ्या नसानसांतून वाहू लागतो. मनुष्यजातीचा आज-वरचा इतिहास एकठायी पाहायचा झाला तर तो बंद माकड-पिंजरा पाहावा. याचसाठी प्राणिसंग्रहालयात गेल्यावर माकडे पाहिल्याशिवाय माझा पाय तेथून निघत नाही.

गचाळ तऱ्हेने अंग रेटीत चाललेला अष्टावक्र उंट, केवळ भारदस्त अस्तित्व एवढाच गुण अंगी असलेले केसाळ अस्वल, अत्यंत कळाहीन आणि व्यक्तित्वशून्य मगर किंवा तऱ्हेतऱ्हेचे लहानमोठे पक्षी—प्रत्येकाच्या घरकुलासमोर थोडा वेळ उभे राहूनही मनाची खात्री पटते की, 'परस्परांना बनवण्याचा' हा खेळ मोठा मजेशीर आहे. मात्र माणसाचे हे 'पाशवी' सामर्थ्य पाहात पाहात जेव्हा मी हत्तीच्या घरासमोर येतो तेव्हा मला पहिला धक्का बसतो. समोर उभे असलेले हत्तीचे प्रचंड धूड पाहिल्याबरोबर त्या सगळ्या प्राणिसंग्रहाला अगदी न शोभणारा असा हा प्राणी आहे हे तात्काल

कळून येते. अगदी दया, दया वाटते! कोणाची? आपली नव्हे, त्या हत्तीचीच! जाणिवेचा एवढा प्रचंड अजाण गोळा पाहून संज्ञा बोथटच होते! हत्तीला आपल्या अस्तित्वाचे शल्य सदोदित बोचत असते हे त्याच्या त्या करुण डोळ्यांवाटे सारखे प्रत्ययास येते. अविरत अन्नग्रहण करीत राहून आपल्या देहाचा डोलारा उभा ठेवायचा हेच एक त्याचे जीवितकार्य असते! केवळ अस्तित्व किती कंटाळवाणे असते ते पाहायचे असल्यास हत्तीसमोर क्षणभर उभे राहिले तरी पुरे. पण असे क्षणभर उभे राहिले तरी लगेच दयेचा भाव संतापात विराम पावतो. संताप अशासाठी की, आपल्या प्रभूत सामर्थ्यानिशीही हत्ती अगदी केविलवाण्या भावनेने प्राणिसंग्रहालयात उभा असतो म्हणून! साध्या हरणालासुद्धा पिंजरा लागतो. पण हत्ती मात्र अगदी उघड्यावर राजरोसपणे उभा असतो. त्याला बांधलेले साखळदंड म्हणजे बंधनाचे एक व्यंगचित्रच असते! असल्या नाममात्र बंधनात आपल्या उत्तुंग सामर्थ्याचा डोंगर पेलत उभा राहिलेला हत्ती पाहिला की पराक्रम शरमेने मान खाली घालतो आणि शौर्य या शब्दाला अर्थच उरत नाही!

हरणापासून हत्तीपर्यंत अशा प्रकारे एक फेरी मारली की माणूस स्वतःला बनवण्यासाठी काय काय युक्त्या काढतो ते पाहून अचंबा वाटतो. आपल्या ज्ञानपिपासेचे प्रदर्शन करावे म्हणून प्रत्येक पिंजऱ्यावर तऱ्हेतऱ्हेच्या पाट्या लावलेल्या असतात. आणि त्यांवर अगडबंब नावे आणि माहिती लिहिलेली असते. पण ते सारे खोटे! मुळातला उद्देश इतकाच की, तऱ्हेतऱ्हेचे प्राणी बंदिस्त करून ठेवावेत आणि दिवसमास आपण त्यांच्यापासून किती दूर गेलो (की जवळ येत चाललो?) ते ताडून पाहावे. माणसाची प्रगती तपासून पाहाण्याचे हे 'कंट्रोल' आहेत. ते पाहात पाहात मी जेव्हा परतीच्या फाटकाकडे येतो तेव्हा दृष्टीसमोर दिसतो एक अवाढव्य पिंजरा. आत तऱ्हेतऱ्हेची माणसे कोंबलेला आणि बाहेर भरगच्च माहितीचे कागद लावलेला. या पिंजऱ्यातील 'प्राण्यांची' चेष्टिते पाहून सारे पशुविश्व हसत असते आणि माकडांची पोरे त्याला खडे मारीत असतात!

—फक्त हत्तीचा देहपर्वत मात्र जाणीव जगवीतच उभा असतो!

# मा निषाद

माणूस हा जात्याच फार नाटकप्रिय प्राणी आहे. विधिनिषेधांपैकी कोणत्याही प्रकारच्या 'विधी'पेक्षा 'निषेध' त्याला अधिक मानवतो. कारण त्यात नाट्य अधिक असते. 'विधी' अळणी असतो; 'निषेध' भडक असतो. एखादा दिव्यभव्य आशय घेऊन निषेध माणसाच्या भेटीला येत असतो. नाटक करणारे जसे एका कैफात गुरफटलेले असतात तसेच पाहाणारेही एका स्फुरणात गळ्याइतके बुडालेले असतात. आणि या स्फुरणाच्या कैफात एरव्ही ज्या गोष्टी तो सहसा स्वीकारणार नाही त्या तो सहज स्वीकारतो. निदान त्या स्वीकारार्ह आहेत असे त्याला वाटत राहाते आणि स्वतःच्या डोक्यावरून तो त्या जगात मिरवीत सुटतो.

विधी आणि निषेध यांमध्ये हा जो फरक आहे तसाच एक फरक आज्ञार्थ आणि विध्यर्थ यात आहे. माणसाच्या नाट्यप्रेमाचेच ते लक्षण आहे. त्याला त्याचा इलाज नाही. 'सकाळीं उठोनी देवासी भजावें' म्हटले तर त्याच्या चेहऱ्यावर असा भाव दिसेल की, 'ठाऊक आहे. यात नवीन ते काय सांगितलेस ?' पण तेच जर 'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान्निबोधत' या शब्दांत त्याला दटावले तर ताडकन अंगावरची चादर फेकून देऊन तो उठून बसेल. 'सकाळीं उठोनी' आणि 'उठा, जागे व्हा' यांमधला तो फरक आहे

पहिले शब्द ऐकले तर मानेची नन्ना करणारे आजोबा खोकत खोकत

'कराग्रे वसते लक्ष्मी ' म्हणत असल्याचे चित्र समोर दिसते. दुसऱ्या शब्दांनी, रुबाबदार पोशाखातील, छातीशी हात बांधून उभे असलेले विवेकानंद त्याला समोर दिसतात आणि तो उठून बसतो. विचार कितीही सुविचार असो, स्वपरहिताचा असो, तो जर विध्यर्थांत सांगितला तर तो एकदम पोरका होतो. करुणेची भीक मागत तो रस्तोरस्ती हिंडत जातो. लोकांच्या मनावर त्याचा आग्रही परिणाम होत नाही. लोकांना अशा विचाराबद्दल आदर जरूर वाटेल, पण फक्त आदरच! आणि सगळ्याच आदरणीय गोष्टी माणसापासून जोडलेल्या हातांइतक्या दूर असतात. एखाद्या झुळझुळ वाहाणाऱ्या झऱ्याचे माणसाला जसे कौतुक असते तसे आणि तितकेच या विध्यर्थी विचाराचे असते. क्षणभर मन रिझवण्यासाठी झऱ्याकाठी जाऊन बसावे तसेच क्षण-दोन क्षण या वांझोट्या सुविचाराभोवती घोटाळावे आणि लगेच शेला झटकून मोकळे व्हावे, आपल्या मळलेल्या पाऊलवाटेने चालू लागावे. पण आज्ञार्थी वचने धबधब्यासारखी असतात. धबधबा झऱ्यापेक्षा अधिक सक्रिय असतो. प्रवृत्तिपर असतो. झऱ्याकाठी जाऊन बसणारा माणूस कशाचे तरी अर्घ्य देऊन टाकण्याच्या मनःस्थितीत असतो, तर धबधब्याकडे जाऊन येणारा, हातात सोटा घेऊन, परत येत असतो. ही सारी माणसाच्या नाट्यप्रेमाची लक्षणे आहेत. मुखवटे धारण करून आणि पायघोळ लप्फेबाज पोशाख पेहरून बोललेले शब्द—खोटे असले तरी—जास्त परिणामकारक असतात. नाटकी मातापितरांच्या पोटी येणारे शब्द ऐकणाऱ्यांची मानगुटे पकडतात. एरवी ते कितीही गुणी असोत, ते पोरके वाटतात.

शंभर टक्के शुद्ध धातूचे नाणे नेहमीच बद्द वाजते. व्यवहारात ते चालत नाही. खोटेपणाचे नाट्य त्यात मिसळलेले असल्याशिवाय ते खणकन वाजत नाही. मग तो खोटेपणा माणसाचा आचार, विचार, पोशाख, कशात का असेना! लोकोत्तर समाजसेवकाचे चित्र, त्याचे वैयक्तिक जीवन कितीही उच्च असले तरी, ते जर नाट्यपूर्ण नसेल तर, बेचव असते. त्याने बालपणी आपल्या राहात्या गल्लीबोळात किंवा शाळेत (शाळेच्या कोंडवाड्यात!) पराक्रम केलेला असला पाहिजे. प्रथितयश विद्वान असेल तर त्याने विद्यार्थि-दशेत समईच्या ज्योतीत वाचन केले असले पाहिजे. कितीही कँडल पॉवरचा असो पण विजेचा दिवा या कामी निषिद्ध असतो. त्याचा प्रकाश पडायचा

तर त्याने पणतीच्या ज्योतीपासूनच तो घेतलेला असावा हे रास्त! विजेचा दिवा अपरिहार्यच असेल तर तो घरचा असण्यापेक्षा रस्त्यावरचा असावा! असल्या विद्वत्तेलाच टोक आलेले असते! ती सघन भासते! पट्टीचा नटसम्राट उत्तरायुष्यात अन्नाला महाग असेल तरच त्याच्या पूर्वायुष्यातील अभिनयपटुतेला मोल चढते, एरवी नाही.

माणसाच्या या नाट्यप्रेमाचा उगम अगदी रामायण-महाभारतकाळापासूनचा आहे, आजचा नाही. हाती कमंडलू घेऊन स्नानासाठी नदीवर निघालेल्या वाल्मीकींचे चित्र नजरेसमोर आणा. संसारापासून निवृत्त झालेल्या या ऋषिवर्यांना वास्तविक माणसाच्या तहानभुकेसारख्या प्राथमिक गरजा महत्त्वाच्या का बरे वाटाव्या? पण काय चमत्कार पाहा! त्यांना त्या तशा वाटल्या आणि जी आज्ञार्थी शापवाणी त्यांच्या मुखातून बाहेर पडली ती वाङ्मयात अमर झाली. रस्त्यातून वाल्मीकी चालले असताना एका भिल्लाने बाणाने क्रौंचपक्षी मारल्याचे ऋषींनी पाहिले मात्र. त्यांच्या तोंडून उत्स्फूर्त उद्‌गार निघाले, "मा निषाद् प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः" "अरे निषादा! काय केलेस हे! कामातुर झालेल्या क्रौंचपक्ष्याला ठार केलेस. तूही आता फार दिवस जगणार नाहीस."

केवढा नाट्यपूर्ण प्रसंग! त्यातले नाट्य काढून घ्या म्हणजे खाली काय उरते ते समजेल. वास्तविक आपल्या घरातल्या बाळगोपाळांची दोन घास खाण्याची भूक निषादाला दिसत होती. शिवाय कोणत्याही नितिनियमांची कसोटी लावली तरी पक्ष्याच्या कामपूर्तीपेक्षा माणसाचे क्षुधाशमन अधिक महत्त्वाचे ठरायला पाहिजे. पण हा साधा विचार झाला. त्यात नाट्य ते कसले? म्हणून माणसाची अन्नाची भूक ज्यांना दिसली नाही त्यांना क्रौंचाची कामातुरता मात्र अस्वस्थ करून गेली! खासा न्याय! आणि ती त्यांनी अशा नाट्यपूर्ण आवेशाने सांगितली की त्या सहजोद्‌गारांना शाश्वत काव्याची धार प्राप्त झाली. एका नव्या वृत्ताचा जन्म झाला. 'मा निषाद—' म्हटल्याबरोबर वाल्मीकींचे ते तावातावाने स्नानाला निघणे, त्या निषादाचे 'सुंऽऽई' करून ते बाण सोडणे, पाहाता पाहाता क्रौंचाचा लवेदा धपकन जमिनीवर पडणे आणि इतक्यात ऋषींचे त्याच्या अंगावर काव्यात आणि निषेधात ते खेकसणे—सारे माझ्या नजरेसमोर चित्रासारखे तरळते. कमंडलू

धरलेला हात वर करून 'मा निषाद' म्हणून ओरडणारा तो भव्य ऋषी आणि आपल्या हातून अशी आगळीक तरी कोणती झाली याचा उलगडा न झाल्याने भांबावून उभा असलेला निषाद—साराच प्रसंग किती नाट्यमय. म्हणूनच तो खणकन वाजतो आणि असा चिरायू होऊन बसतो !

बरे, तहानभुकेसारख्या क्षुद्र पार्थिव गरजा कमी समजून दया, क्षमा, शांती इत्यादी उदात्त भाव जपण्याचे तत्त्वज्ञान वरील प्रसंगात आहे म्हणून तो जतन करावा म्हटले तर तशीही सोय नाही. सोईचे असेल तिथे उलटे तत्त्वज्ञानही शिरसावंद्य ठरले आहे असे दिसेल. बारा वर्षे पडलेल्या एका प्रदीर्घ दुष्काळाने विश्वामित्र भुकेने व्याकुळ झाले, तेव्हा ते एका श्वपचाच्या झोपडीत शिरून चोरून कुत्र्याच्या तंगडीवरचे मास भक्षण करू लागले. आता विश्वामित्रासारखा एवढा महान तपस्वी आणि शरीरक्षुधेसाठी चोरी, अभक्ष्य-भक्षण आदी 'इंडियन पिनल कोडा'तले सगळेच गुन्हे एकदम करू लागलेला पाहून बिचारा श्वपच घाबरला. बरे, ते गुन्हेही करण्यासाठी त्यांनी त्याची झोपडी व्यासपीठ म्हणून शोधून काढलेली. त्या मांगाने कळवळून, परोपरीने त्यांना सांगितले की, "देवा, हे खरं नव्हे. तुमची तपश्चर्या अशी मातीमोल करू नका." आता यात गैर काय होते ? क्रौंचपक्ष्याच्या कामपूर्तीसाठी तडफडणारे मानवी मन सगळ्या चिरंतन मूल्यांची घाऊक मुस्कटदाबी करण्यास मात्र उद्युक्त व्हावे अं ? पण वाल्मीकी काव्यात बोलले, निषेधात्मक बोलले, आज्ञार्थी बोलले. श्वपचाला काव्य कोठून कळणार ? आणि आज्ञार्थाचा त्याला अधिकार कसा मिळणार ? वाल्मीकींचे हाताचे बोट वर करून शापदग्ध बोलणे आणि श्वपचाचे हात जोडून विध्यर्थी विनवणे. पहिल्यातले नाट्य दुसऱ्या प्रसंगात कसे बरे येणार ? शहाणा श्वपच वेडा ठरावा हे सरळच आहे. त्याला विश्वामित्रांनी खाडकन प्रत्युत्तर केले, "अरे, कशाला वटवट करतोस ? बेडके ओरडली म्हणून गाई पाणी पिण्याचे सोडीत नाहीत. मला धर्म शिकवण्याचा अधिकार तुझा नव्हे."

**पिबन्त्येवोदकं गावो मंडूकेषु रुवत्स्वपि**
**न तेऽधिकारो धर्मेऽस्ति मा भूरात्मप्रशंसकः।**

भुकेपोटी पक्षी मारणारा निषाद शापित व्हावा आणि भुकेपोटी दहा

गुन्हे करणारा विश्वामित्र मात्र प्रकांड तपस्वी म्हणूनच ठरावा! बरोबरच आहे. वाल्मीकि-विश्वामित्रांचे तेजोवलय निषाद-श्वपचांच्या तोंडांभोवती कोठून असणार? आणि मग त्यांच्या बोलांत नाट्य तरी कोठून येणार?

'मा निषाद' या दोन शब्दांत माणसाच्या या चिरंतन नाट्यप्रेमाचे सार सापडते. माणसाच्या नाट्यप्रीतीचे दर्शन घडवणारा तो ध्वज आहे. 'मा निषाद' ही घोषणा निषेधात्मक आहे हे विसरता येत नाही. आणि निषेधासाठी माणसाने एकदा हात वर केला की तो प्रसंग फार बोलका होतो. असा वर केलेला हात तत्काल स्वतःजवळ जे असते त्याचे संरक्षण करतो. मग ते संरक्षणीय असो वा नसो. "तुम्ही चुकता", "तुमचा धिःकार असो", "नही नही" इत्यादी शब्दसंहिता स्वतःची मूठ झाकली ठेवतातच पण शिवाय तिचा आब राखतात. पोकळ उद्‌गारांवर प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे प्रावरण चढवून त्यांना सरस्वतीच्या शिरपेचात खोवण्याचे सामर्थ्य 'मा निषाद' या निषेधात्मक घोषणेस लाभले आहे. 'मा निषाद'ऐवजी 'रे निषाद', 'भो निषाद' असा पाठभेद करून पाहा. कमंडलू धारण केलेला व आवेशाने वर उंच गेलेला ऋषींचा तो उजवा हात ताडकन खाली येईल आणि त्या निषादापुढे दोन्ही हातांची जुळणी झालेली दिसेल. या प्रसंगात तो निषाद पुन्हा धनुष्याला जेव्हा बाण लावील तेव्हा त्याचे लक्ष्य मुनिवर्यांचे डोकेच असेल!

तुम्ही 'काय म्हणता' हे महत्त्वाचे असेल किंवा नसेल, पण तुम्ही 'कसे म्हणता' हे फार महत्त्वाचे आहे. आणि 'कसे म्हणावे' याचा विचार करताना ते आज्ञार्थात म्हणावे, निषेधात्मक म्हणावे, हा कानमंत्र अत्यंत काळजीपूर्वक ध्यानात ठेवला पाहिजे. निषेधापासून सुरुवात केली की एक लढाई तुम्ही आधीच जिंकून बसता. समाजापासून तुमचा रथ दोन अंगुळे तरी वर उचलला जातो. ऐकणारे तुमच्यासमोर मांड्या घालून निमूटपणे बसलेले असतात. इथून पुढे तुम्ही जे जे सांगाल ते ते ऐकून घेण्यावाचून त्यांची सुटकाच नसते. आणि तुम्ही लोकांना जे सांगाल ते तुम्हांला लागू असण्याचा प्रश्नच उरत नाही.

## माझे पहिले व्याख्यान

माझे पहिले व्याख्यान मी केव्हा दिले आणि कोणत्या विषयावर दिले त्याची आठवण मला नाही. कारण मी सतत व्याख्यान देत असतो अशीच माझी पक्की आठवण आहे. मनाच्या माळावर मी एका झाडाखाली खिस्ताच्या ऐटीने उभा असतो आणि एकएक असा माझा श्रोतृगण माझ्यापुढे येऊन निमूटपणे बसत असतो. एवढा भलामोठा समाज तिथे गोळा झालेला असतो, पण ना गडबड ना गोंधळ, ना आवाज ना हालचाल, असा तो समाज शांत बसलेला असतो! केवळ डोळयांच्या खुणांनी त्यातला कोणी म्हणतो, "तर मग आम्हांला माणसाविषयी काही सांगा" आणि मी सुरू करतो, बोलू लागतो...

"माणूस म्हणजे काय आणि माणूस कोणास म्हणतात ते मला ठाऊक नाही. पण तुम्ही ते सरावाने जाणू शकाल..."

हेच माझे पहिले व्याख्यान असावे! ते केव्हा दिले नि कुठे दिले ते मला आठवत नाही. पण तेव्हापासून मी सतत 'व्याख्यानात' आहे हे मात्र नक्की. माझ्या वीतभर व्यासाच्या कवटीखाली एक श्रोतृगण कायमचा बसलेला असावा. एक विषय संपला आणि दुसरा सुरू झाला की कूस बदलल्यासारखा तो समाज मांड बदलतो आणि पुनश्च माझे भाषण आणि त्याचे श्रवण सुरू होते!

स्वतःजवळ काही असो वा नसो, दुसऱ्याला व्याख्यान ऐकवण्याचा माणसाचा हा षोक त्याच्या रक्तातच भिनलेला असतो. पण दुसऱ्याला ज्ञान सांगण्याच्या ऐटीनेच केवळ तो हे करतो असेच काही नाही. त्याच्या व्याख्यानबाजीत केवळ गुरु-शिष्यसंबंध असतो असे नाही. माणसाच्या भावजीवनाचा तो एक अविभाज्य भाग आहे. या व्याख्यानात त्याच्या दुःखाचा तो आविष्कार करतो, त्याच्या सहनशीलतेची गुटी तो उगाळीत राहातो, त्याच्या विजिगीषू वृत्तीचे तो शांत समर्थन करतो, तर कधी निर्लेप अलिप्तपणाने स्वतःच्या पराजयाची 'गाथा सप्तशती' तो आळवीत राहातो. हे सारे तो करतो असे लिहिले खरे; पण खरे तर ते सारे 'होत राहाते.' त्याचा त्याला इलाज नसतो. कुणी ऐको, न ऐको. त्याला एकट्यानेच बोलले पाहिजे, सशब्द झाले पाहिजे, असे त्याला वाटते!

माझे पहिले व्याख्यान हे असे मूक होते. जणू मी जन्माला आलो तोच जिव्हाव्रत चालवण्याच्या एका सहजात प्रेरणेने. आणि तेव्हापासून आता-पर्यंत मी इतक्या विषयांवर व्याख्याने दिली की सांगता सोय नाही.

प्राध्यापकाचा झगा अंगावर घालून जेव्हा मी प्रथमच माझ्या दीडशे विद्यार्थ्यांसमोर उभा राहिलो तेव्हाचा माझा अनुभव मला सांगितलाच पाहिजे. मी प्राध्यापक म्हणून ज्या दिवशी पक्का ठरलो त्या दिवशी साक्षात सरस्वतीला-सुद्धा मोजण्याचे मी नाकारले. पण हे माझे अननुभूत सौख्य जसजसा मी प्राध्यापकांच्या खोलीतून माझ्या वर्गाकडे पावले टाकू लागलो तसतसे डळमळू लागले. प्रत्येक पावलागणिक माझा आत्मविश्वास खचत होता. जणू ते प्रत्येक पाऊल आत्मविश्वासाच्या छाताडावरच मी रोवत होतो. हा प्रवास बराच लांबत चालला आहे याची सारखी जाणीव होत होती. 'मला वधस्तंभाकडे असे मिरवत नेण्याजोगा माझा गुन्हा तरी कोणता' ते कळवळून इतरांना विचारू लागलो. पण शब्द फुटले नसावेत. मी माझ्या कर्मभूमीत पाऊल टाकले मात्र. आज कित्येक शतके एक शब्दही तोंडावाटे न काढता माझे व्याख्यान ऐकून घेणारा तो अफाट समाज असा काही खवळला आणि त्याच्या सहस्रमुखांतून असा कल्लोळ सुरू झाला की, "युगानुयुगे तुझा 'इंतजार' होता, बरा तावडीत गवसलास आज!" असे त्याला म्हणायचे होते हे मला पक्के समजले.

मी व्यासपीठावर चढण्यापूर्वीच खाड्दिशी दार लागले. (कोणी म्हणतात, मीच दार लावून व्यासपीठावर चढलो. पण हा पाठभेद मान्य होत नाही.) श्रोतृवर्गाला सन्मुख होऊन मी उभा राहिलो. वाटले की अंगावरची काळी वस्त्रे निव्वळ गुन्हेगाराची आहेत. मी विद्यार्थ्यांना उद्देशून 'मित्रहो' म्हणालो की 'मिलॉर्ड' म्हणालो हा आजतागायत माझ्या संशोधनाचा विषय आहे.

तिथून पुढे माझा मी उरलोच नव्हतो. मी एका अज्ञात शक्तीच्या हाती सापडलो होतो. आणि ती शक्ती मला नाकात वेसण घालून खेळवीत होती. डोक्यात एक आकाशवाणी सतत ऐकू येत होती, "राजा, वैऱ्याची रात्र आहे. बोलत राहा." गनिमांना मोर्चे बांधण्याला उसंत मिळण्यापूर्वीच मी तोंडाचा पट्टा अशा वेगाने सोडला की, त्या माऱ्याखाली किंचित काळ तरी एकही डोके वर होऊ शकले नाही. बोलण्याचा वेग थोडाही मंद करणे मला शक्य नव्हते. वाक्य बोलून झाल्यावर क्षणभरही मी जर गप्प राहिलो तर बोललेल्या वाक्यातील शब्द कानावाटे मेंदूत शिरून माझ्या विवेकाला असे जबरदस्त धक्के देत की लगेच वाटे, 'अरे, काय बोलतोस काय? तुझ्या जिभेला काही हाड?' हा घाव वाचवायचा तर शब्दांचा कानावर अविरतपणे मारा करावा लागे आणि मी तो सतत चालू ठेवला होता. माझ्या कानांवर तसाच श्रोत्यांच्या कानांवर. शब्दावरचा अभ्रा टरकावून आत डोकावून पाहायला श्रोत्यांना मी क्षणाचीही फुरसत देऊ धजत नव्हतो.

शब्दांच्या माऱ्याप्रमाणेच मी श्रोत्यांकडे पाठ करून उभे राहायलाही धजत नव्हतो. फळ्यावर काही लिहावे म्हणून जर श्रोत्यांकडे पाठ केली आणि न जाणो, कुणी पाठीत सुरा भोसकला तर? कारण प्रसंगच तसा बाका होता. प्रत्येक उशीखाली विंचू असावेत तसे प्रत्येकाच्या दोन डोळ्यांत पाजळलेले सुरे लखलखत होते. सुऱ्यांच्या त्या तीक्ष्ण धारेवरून माझी कसरत चालू होती.

सुमारे तासभर असा शब्दविक्रम करून घंटेचे टोले पडल्यावर मी जेव्हा पुन्हा प्राध्यापकांच्या खोलीवर धावलो तेव्हा कितीतरी वेळ मी कुणाच्याही दृष्टीला दृष्टी देऊ शकत नव्हतो. आरशातल्या स्वतःच्या प्रतिबिंबातल्या दृष्टीलाही!

पण सवयीने माणूस विष पचवतो. सरावाने तो निर्ढावतो. हळूहळू मी माझ्या श्रोतृवर्गावर ताबा मिळवला आणि वाक्येच्या वाक्ये बोलून झाल्यावर

मी हवा तितका थांबू लागलो. अर्थाची दडस मनावर उरली नाही. आशयाला मी आव्हान देऊ लागलो. शब्दाच्या काठावर आरामात उभा राहून आत आत डोकावून पाहू लागलो. मी आणि माझ्या बरोबर माझे श्रोतेही.

आता व्याख्यान देणे हे फक्त श्रोत्यांच्या संख्येवरच अवलंबून असते. अल्प श्रोते असले तर विषय कोणताही असो त्यावर बोलता येते. वापरून वापरून एखादे पादत्राण किंवा नवा कपडा जसा पुढे आपण आपल्या अंगाबरोबर घेतून घेतो तसे बोलण्याच्या सरावाने शब्द घेतून घेता येतात. तासभर बडबड करून श्रोत्यांना अर्थाची दोन वाक्येही मिळणार नाहीत, पण वेळ फुकट गेला असेही वाटणार नाही, असे व्याख्यान देता येते. 'जर मी चुकत नसेन' असा वाक्यार्थ म्हटला की त्यापुढे हिमालयाएवढ्या चुकीने ओतप्रोत भरलेली वाक्ये सरासर म्हटली तरी शान कायमच राहाते. "अमूकअमूक सोम्याने म्हटलेच आहे की—" असा प्रस्ताव केला म्हणजे पुढे सोम्याऐवजी दस्तुरखुद्दांचे म्हणणे दडपून दिले तरी मिटली मूठ उघडत नाही. कधी शब्दांच्या मुठी भरभरून श्रोत्यांवर उधळायच्या, कधी शब्दांच्या उतरंडी रचून त्याच्या शेंड्यावर आपण जाऊन बसायचे, कधी अचपळ शब्द श्रोत्यांच्या चिकित्सक बुद्धीसमोर असे फेकायचे की केळ्यांच्या सालीवरून घसरणाऱ्यासारखे सपासप घसरून ते पडतील, तर कधी एकेका उग्र शब्दाची ताकमेढ श्रोत्यांसमोर अशी उभी करून ठेवायची की त्यामुळे त्यांच्या जिभाच टाळूला चिकटतील! शब्दांच्या किमयेचा खेळ असा चलाखीने खेळायचा की, स्वतःच्या ठिकाणी कधीच नसलेली विद्या आणि पांडित्य नुसते श्रावणझडीसारखे बरसताना त्यांना दिसेल!

माझे शेवटचे व्याख्यान केव्हा होणार ते मी आज सांगू शकत नाही. पण आजमितीला जे व्याख्यान शेवटचे समजता येईल ते आणि माझे पहिले व्याख्यान यात केवढे तरी अंतर आहे. पहिल्या व्याख्यानाच्या वेळी मी शब्दमोल होतो. केवळ शब्द, आवाज, वेग आणि वटवट यात सदेह बुडालो होतो. नंतर शब्दांच्या लाटा श्रोत्यांवर सोडून मी काठावरून त्यांची गंमत पाहात उभा राहू लागलो. त्यात वाईट इतकेच होते की, पहिल्या काय आणि शेवटच्या काय, सर्व व्याख्यानांत मी कोरडाठणठणीतच उरलो.

' देश तसा वेष ' आणि ' व्यासपीठ तसे व्याख्यान '. व्याख्यानाचा संबंध विषयाशी असण्यापेक्षा व्यासपीठाशी जास्त असतो. सार्वजनिक उत्सवाचे व्यासपीठ असेल तर खुद्द श्रोत्यांनाच उत्सवमूर्ती समजून बेलगाम मौज करावी लागते. राजकीय पक्षाचे व्यासपीठ असेल तेव्हा घरापासून मिरवणुकीनेच मैदानापर्यंत पोचावे हे उत्तम. एक तर सबंध रस्ताभर शरीरसंरक्षण अनायासे लाभते, पण मुख्य म्हणजे हळद-पिंजर फासून मिरवणुकीने बळी द्यावयास नेल्या जाणाऱ्या बकऱ्याच्या परंपरेचे जतन सहजपणाने होते. शोकसभेचे व्यासपीठ असेल तर आपला आवाज खुद्द आपल्यालाही ऐकू येणार नाही इतका मोठा असावा. सत्कारसमारंभ असेल तर सर्वच घटनांशी आपला असा घनिष्ठ संबंध राखावा की क्षणभर सत्कार कुणाचा आहे तेच श्रोत्यांना समजू नये.

व्याख्यानातही गनिमी कावा असतो. कधीकधी सहास्त्रावधी श्रोत्यांची समोर झुंबड असली तरी काहीच बिघडत नाही. पण चारदोन ' शेलके ' जाणकार जर व्यासपीठावर उजवी-डावी संभाळून असतील तर प्रसंग बाका ठरतो. समोरच्या श्रोत्यांची संख्या कितीही असो, त्यांच्या पातळीपेक्षा दोन फूट तरी आपली पातळी उंच असते आणि म्हणून त्यात धोका नसतो. पण व्यासपीठावर आपल्याच पातळीवर बसलेले जाणते पंडित अस्तनीतल्या निखाऱ्यासारखे असतात. त्यांच्या अस्तित्वाची दखल विसरून बोलता येत नाही. अशा वेळी गनिमी कावा हितकर ठरतो. सुरवातीलाच स्वतंत्रपणे अध्यक्षानंतर त्यांपैकी प्रत्येकाचे नाव घ्यावे. पहिल्या झटक्यालाच मग गनीम गाफील होतो. तरीही नंतर डुलक्या न घेता एखादा विद्वान आपल्या व्याख्यानाची रखवाली करीत राहील तर ऐन संभ्रमाच्या क्षणी आपण मोठ्या खुषीने श्रोत्यांना सांगावे की, " वास्तविक या विषयावर बोलण्याचा एकमेव अधिकार इथे बसलेल्या अमक्यातमक्यांचा असताना आपण बोलतो आहो ते केवळ ' जिथे शहाणे डोकावू धजत नाहीत तिथे मूर्ख मुसंडी मारतात ' या न्यायाने ! " जोपर्यंत ठाणठाण बोलण्याचे काम आपल्याकडे असते तोपर्यंत स्वतःला मूर्ख, अडाणी, अपक्व, मंदबुद्धी अशी शेलकी विशेषणे खुशाल लावून घ्यावी. सुंदर चेहऱ्यावर काळी तीट शोभावी तशी ती विशेषणे आपली शोभा वाढवतात. कारण श्रोत्यांचे कान नेहमी वक्त्याच्या हातात असतात. आणि माणूस इतका

स्वत्वशील प्राणी आहे की स्वतःचा कान दुसऱ्याच्या हातातून त्याला सोडवून घेता आला नाही म्हणजे कान पकडणाऱ्याला तो नेहमीच महात्मा, पंडित, नेताजी, विद्वद्रत्न अशी बिरुदे आपखुषीने बहाल करतो.

व्यासपीठावरचे व्याख्यान संपले म्हणजे खऱ्या अर्थाने व्याख्यान संपले असे नाही. स्वतःचे व्याख्यान सहसा लेखनिविष्ट करू नये. प्रत्यक्ष श्रोत्यां-समोर वेळप्रसंग पाहून मन मानेल तसे बोलावे. दुसऱ्या दिवशी पत्रकारांनी काही घोटाळा केला (खरा घोटाळा आपणच आदल्या दिवशी केलेला असतो.) तर 'आम्ही तसे म्हणालोच नव्हतो' अशी पुरवणी सदोदित तयार ठेवावी.

माझे पहिले व्याख्यान झाले आणि मग मीच शिकायला लागलो. दर व्याख्यानानंतर माझी प्रगती जास्तजास्त होत गेली. आता व्याख्यानाचे हे 'टेक्निक' मी पुरे आत्मसात केले आहे.

...पण एक 'अंदरकी बात' तुम्हाला सांगू? माझ्या स्मृतिकक्षेपलिकडे असलेले ते पहिले व्याख्यान, तो मनाचा माळ, त्यावरचे ते जीर्णशीर्ण झाड, त्याच्या निवाऱ्याला उभा असलेला मी, क्षितिज भेदून जाणारी माझी ती आर्त नजर, दोन्ही बाजूंस उंच आकाशात उभे धरलेले ते माझे दोन बाहू आणि ओठातून बाहेर पडणारी साक्षात तळमळ...

त्या पहिल्या व्याख्यानाची ती अपूर्वाई आता साफ नाहीशी झाली आहे! त्या वेळची ती धुंदी पार उतरली आहे! शब्दांनी माझ्या टाळूवरून हात फिरवला आहे! अर्थाने अनर्थ केला आहे!

सगळ्यात तीव्रतेने काही डाचत असेल तर ते हे की, त्या वेळचा माझ्या-समोरचा तो अफाट अवाक समाज आता केव्हाच नाहीसा झाला आहे! जसा निमूटपणे एक-एक असा तो गोळा झाला होता तसाच पाय न वाजवता एक-एक असा तो निघून गेला आहे. आता डोळ्यांसमोर उरला आहे तो फक्त शुष्क, रेताड, माळ...

—आणि म्हणूनच मग अष्टौप्रहर हा असा स्वतःचा स्वतःशीच संवाद चालू आहे! 'जे मौनाचेहि निपटणें पिकून गेले'.

## सद्‌गुणांचे व्यसन करणारा चारुदत्त

" अरे, अरे! मैत्रेया, चोर माझ्या घरी आला पण त्याला काहीच लाभ झाला नाही!" असे दुःखी चेहऱ्याने म्हणणारा चारुदत्त मी जेव्हा समोर पाहातो तेव्हा मंद स्मिताने माझ्या ओठांच्या कडा रुंदावतात. मनातील एक अटकळ खरी होण्याच्या वेतात असते आणि माझे अंदाज पडताळून पाहाण्याच्या प्रयत्नात मी असतो. इतक्यात हर्षातिशयाने वेडा झालेला 'श्रेष्ठ' चारुदत्त उड्या मारीतच स्टेजवर पुन्हा पदार्पण करतो...

"मित्रा, अरे आनंदाची बातमी. फारफार आनंदाची बातमी..."

"काय? आहेत ना दागिने सहीसलामत?"

"नाही रे. दागिने तर गेलेच. पण आनंदाची बातमी अशी की, माझ्या घरात शिरलेला चोर कृतार्थ होऊन परत गेला. त्याला रिकाम्या हातानं जावं लागलं नाही!"

चारुदत्ताचे हे भाषण ऐकून मैत्रेय वेड्यासारखा त्याच्या चेहऱ्याकडे पाहातच राहातो. मी कपाळाला हात लावून मान खाली घालतो आणि तिकडे चारुदत्ताने एक नवी 'चीज' गायला सुरवात केलेली असते!

'श्रेष्ठ' चारुदत्त हा एका अर्थाने माणसाच्या अहंकारपूजेचे अत्युच्च शिखर समजायला पाहिजे. स्वतःच्या दृष्टिकोणातून तो मुळी विचार करू शकतच नाही. आधी आपले सारे धन लोकांना देतदेत त्याने ते संपवले.

मग लोकांना देण्यास आता जवळ काही उरले नाही म्हणून दुःख करणे सुरू केले. निष्कांचन अवस्थेत तिसऱ्याचे दागिने संभाळण्याचे दिव्य पत्करले. ते संभाळायला चवथ्याकडे दिले. तेवढ्यात घरी चोर शिरल्याचे ऐकताच पठ्याची पहिली प्रतिक्रिया त्याचे घर चुकले, आता तो निराश होऊन परत गेला असेल, ही. मग चोराने धन नेल्याचे (दुसऱ्याचा ठेवा!) समजल्यावर तो सधन परत गेला हा आनंद. त्या आनंदसमाधीतून जागा झाल्यावर पुन्हा पहिला विचार मनात आला तो असा की, 'धनाच्या मालकाला वाटेल, मीच ते दागिने चोरून खाल्ले.' मैत्रेय म्हणतो, "अरे, दुसऱ्याचा ठेवा तिसऱ्यानं नेला. तू हात झाडून हो मोकळा." तर याचे उत्तर : "काय सांगतोस तू हे असं? दारोदार भिक्षा मागून मालकाचं धन मी परत करीन."

आता या विकतच्या श्राद्धाला काही अर्थ आहे का? सरळ नाकासमोर चालणे माणसाला इतके कंटाळवाणे का वाटावे ते समजत नाही. आणि बहुसंख्य समाजाचीही गंमत पाहा. तथाकथित चिरंतन मूल्यांचे भरणपोषण होण्यासाठी दुसरे खर्ची पडत असलेले पाहून तो मोठ्या खुषीने टाळ्या पिटीत असतो. समाजाचा सुप्त अहंकार कदाचित त्यामुळे सुखावतो असे वाटते. सारांश काय, तर दुसऱ्यांना दडपून स्वतःची अस्मिता जिवंत ठेवण्याची सारी धडपड. आणि अनेक व्यक्ती इतक्या तुटपुंज्या असतात, की स्वतःचा 'अहं' त्यांना थोडासाही संतुष्ट करता येत नाही. तेव्हा एखाद्याला सामुदायिक रीत्या बळी देऊन त्याची ती अजस्र 'अहंपूजा' डोळ्यांसमोर पाहातपाहात ते आपापले इवलेइवले 'अहंकार' धुगधुगत ठेवण्याचा केविलवाणा खटाटोप करीत असतात! जन्माला आला त्याला जगले हे पाहिजेच! शरीर बेटे शक्य तो जगत असतेच. पण ते तसे जगताना, जगायला खरी सबब काही नसल्याने, मनाला फार यातना होतात. मग तो 'अहं' जगवायला अशा खऱ्याखोट्या सबबी शोधून काढाव्या लागतात. जिथे तेही जमत नाही तिथे मग थोर हुतात्म्यांच्या 'अहंकारपूजा' सद्गदित अंतःकरणाने आळवीत, आठवीत राहावे लागते. म्हटलेच आहे :

"अज्ञानाच्या गळफासांतच
जरा जगा अन् जरा जगू द्या"

श्रेष्ठ चारुदत्ताचा 'श्रेष्ठपणा' मला कधीच पटलेला नाही. (माझ्या इतर मित्रांच्या दृष्टीने मला तो 'समजलेला' नाही !) बिचाऱ्याला अन्याय करण्याचे थोडेही मनात न आणता मला ठामपणाने असे वाटते की, कर्तृत्वशून्यता, आत्मदया आणि तरीही लोकांच्या डोळ्यांसमोर सतत राहिले पाहिजे ही सुप्त मनातील भूक या रसायनातून त्याचे व्यक्तित्व आकारलेले आहे आणि ते व्यक्तित्व सफल होण्यासाठी जे जे मार्ग अनुसरते त्यांपैकी एकही खऱ्या अर्थाने सरळ, सहज व साधा नाही. तिढे, तिढे आणि तिढे !

स्वतःचा संपूर्ण विनाश झाला तरी चालेल, पण विनाशाच्या मार्गाने पुन्हा जिवंत राहावे हीच मनातील इच्छा असते. या घटनेत नाट्य असते म्हणून सरळ मार्गाने जिवंत राहाण्याऐवजी हा मार्ग मरणाऱ्याला आणि प्रेक्षकांनाही सुरस वाटतो. कोणी एक पुढारी एका सामाजिक ध्येयपूर्तीसाठी प्राणांतिक उपोषण करणार आहेत अशी आवई उठवली गेली. मशारनिल्हे पुढारी प्राणांतिक तर राहोच पण दोन दिवसांच्या लाक्षणिक उपवासाचेही नाव घेईनात. आता आली पंचाईत! दिवस अगदी आळणी वाटू लागले. शेवटी वृत्तपत्रांना दम निघेना. त्यांनी जाहीर करून टाकले. 'परिस्थिती बिघडत चालली आहे. अमक्यातमक्याचे प्राणांतिक उपोषण जवळ येत चालले आहे!'

कुणी तरी दानाला गेले तरी चालेल पण हौतात्म्याची होळी पेटविल्याशिवाय समाजाला चैन पडत नाही. विजिगीषू वृत्तीपेक्षा हौतात्म्याची भूक प्रखर असते. कदाचित हौतात्म्याचा मार्ग सोपाही असावा. सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करून गडगंज धनसंचय करावा आणि मग परोपकाराचे सत्र सुरू ठेवावे असे काही चारुदत्ताला वाटले नाही. हातचे धन संपल्यावर कोनाकोपऱ्यात असलेले किडूकमिडूक गोळा करून तेही वाटून टाकावे, चोराला माझ्या घरातून विन्मुख परतावे लागले म्हणून चारचौघांत खेद करावा, दुसऱ्याने आपल्याकडे ठेवलेली ठेव का होईना, पण चोराच्या हातात काही गेले म्हणून आनंद मानावा आणि मग दारोदार भिक्षा मागून मालकाची ठेव परत करण्याची प्रतिज्ञा जाहीर करावी—हे सारेच कठोर वास्तववादापेक्षा विलक्षण मोहमयी वाटते. आपल्या नावाचा डंका वाजावा ही सुप्त इच्छा. ती राजमार्गाने सफल झाली नाही तर अशा आडमार्गाने तरी सफल व्हावी असा यत्न माणूस करीत असतो इतकेच !

या दृष्टीने पाहिले तर माणसाला सद्गुणांची कदर असते असे म्हणण्यापेक्षा सारे सद्गुण आपल्याला चिकटावेत अशी महत्त्वाकांक्षा असते असे म्हणणेच अधिक योग्य ठरते. नैतिकतेचे व्यसन ज्या व्यक्तींत पराकोटीला पोचले आहे त्यांनासुद्धा दुसऱ्यांच्या नैतिकतेविषयी प्रेमादर वाटण्याऐवजी ती सारी नीतिमत्ता आपल्याच मंदिलात खोवलेली असावी अशी हाव असते आणि अशी हाव असणे व म्हणून त्यासाठी प्रयत्न करणे हेच मुळात नीतिमत्तेस विघातक आहे याची जाणही त्यांना उरत नाही. दुसऱ्यावर खराखुरा परोपकार केला तर त्याने लगेच त्याची जाणीव आपल्याला दाखवली पाहिजे असे मन म्हणू लागते. त्याने जाणीव दाखवल्यावर 'कसले काय?' 'छेः छेः' वगैरे म्हणून—कधीकधी मनापासूनही—आपण स्वतःकडे कमीपणा घेतो. पण तसा तो घेण्याची संधी हुकता कामा नये, ही हाव शिल्लक उरतेच. दुसऱ्या अनेक वस्तूंसारखा शेवटी नैतिक गुणांचाही बाजारच असतो, मूल्यांचा व्यापार असतो. हवी ती किंमत घ्या पण आमचा माल चोखपणे आमच्या पदरात टाका हीच वृत्ती.

चांगुलपणाचा विजय व्हावा असे वाटण्यापेक्षा त्या विजयाचे साधन 'मी' असावे असे वाटणे हा मनाचा सनातन धर्म आहे. 'मला' सुचत नाही ती कल्पना चांगली कशी असेल? 'मी' मांडला नाही तो ठराव पास कसा होईल? 'मी' आभार मानले नाहीत तर ते भाषण चांगले कसे ठरेल? तमाम सृष्टिव्यापाराचे वाहन 'मी' असावे ही दुर्दम्य इच्छा. त्या इच्छेला तडा गेला की मूलभूत सद्गुण आणि मूल्ये मातीमोल झाली तरी त्याची पर्वा नाही.

स्टेजवर समोरासमोर उभे असलेले मैत्रेय आणि चारुदत्त या दृष्टीने या दोन प्रवृत्तींचे प्रतिनिधी वाटतात. साधा, सरळ व्यवहार मैत्रेय बोलतो, कारण त्याची दृष्टी संपूर्णपणे वस्तुनिष्ठ आहे, आत्मनिरपेक्ष आहे. उलट आत्यंतिक आत्मसापेक्षता आणि अहंकार यांच्या नादाने चारुदत्ताने आपले चित्र मनस्वी कृत्रिम, गुंतागुंतीचे आणि अवास्तव करून टाकले आहे. नाट्य अधिक आकर्षक भासते म्हणून ते चित्र अधिक भडक आणि मोहक दिसतेही. पण खोलात शिरून विचार केला तर त्या चित्रामागे कोणतीही उच्च नैतिक मूल्ये आहेत असे वाटत नाही. नैतिक मूल्यांचे संरक्षण करायला

सरसावलेल्या 'श्रेष्ठ' पुरुषाने 'चोराला लाभ झाला नाही' म्हणून नक्राश्रू ढाळावेत यातील विसंगती अन्यथा कशी स्पष्ट करायची ?

मला नेहमी वाटते की, सद्गुण, नैतिकता, सद्विचार यांच्या व्यसनांची परमावधी ज्या समाजात—ज्या समाजातील एकदोन व्यक्तींत—दृष्टीस पडते त्या समाजातील बहुसंख्य जनता प्रकर्षाने दुर्गुणीच असायची. ती तशी असल्याशिवाय पराकोटीच्या सद्विचारास काही वाव राहाणारच नाही. आणि अनवधानाने म्हणा किंवा अजाणतेपणाने म्हणा ही अनैतिकता असल्या सुविचाराभोवती गोळा झाल्यावाचून राहात नाही. निःस्पृहतेची परिसीमा होणे म्हणजेच चोराला कंठरवाने आव्हान देणे आणि तो आल्यावर कृतार्थ होऊन परत गेल्याचा आनंद भोगणे किंवा चारचौघांत तो मिरवणे. वास्तविक, आपल्या असल्या सद्गुणव्यसनापायी समाजात आपण विषवल्ली पोसतो हे त्यांना प्रथम कळायला पाहिजे. पण ते त्यांना कळत नाही. त्यांना कळते ते इतकेच की, माझ्या अहंकारवेदीवर प्रत्येकाची आहुती पडायला पाहिजे. 'कामा'सारखाच अहंकारसुद्धा जो जो पोसला जातो तो तो त्याची भूक वाढते, कमी होत नाही.

आणि त्याहीपेक्षा जास्त चमत्कार वाटतो तो या गोष्टीचा की स्वतःचा अहंकार पोसण्यासाठी नैतिकतेचे आत्यंतिक व्यसन करणाऱ्या या साऱ्या 'श्रेष्ठ' पुरुषांच्या आत्मपूजेत खरा बळी पडला आहे तो तिसऱ्याचाच. कधी ते त्याचे कुटुंबीय असतील तर कधी ते त्याचे मित्र असतील. खरे बोलण्याचे व्यसन करण्यापायी धर्मराजाने अनीतीचे एकही दालन पालथे घातल्यावाचून सोडले नाही. त्याचे बंधू नाराज झाले ते तर सोडाच, पण प्रत्यक्ष पत्नीची अब्रूही शाबूत राहिली नाही. रामाने जी नैतिक मूल्ये त्रिकालाबाधित राखली ती सारी सीतामाईच्या अग्निदिव्यात उजळून निघाली होती. अहंकार पायी तुडवून स्वत्व राखणारा एखादा कर्ण आणि एखादा कृष्ण तसा विरळाच! बाकी सारेच अहंकाराची पूजा बांधणारे!

—आणि म्हणून मैत्रेय व चारुदत्त यांच्या सवालजबाबात जेव्हा "मित्रा, दारिद्र्य आणि मरण यांतून तू काय रे पसंत करशील ?" असे मैत्रेय चारुदत्ताला विचारतो आणि लगेच "मरण बरें वाटतें" असे म्हणून तो गायनाला आरंभ करतो तेव्हा मी सरळ उठून चहा पिण्यासाठी नाट्यगृहाबाहेर

पडतो. चोराच्या प्रयत्नाला यश यावे म्हणून तळमळणारा सात्त्विक चारुदत्त 'मरण बरें वाटतें' म्हणणारच. सात्त्विकतेची परिसीमा झाली म्हणजे ती हौतात्म्याचाच रस्ता पकडणार. 'मी दारिद्र्य झिंजाडून टाकीन' असे म्हणण्याची विजिगीषू वृत्ती तिला कधी भावणारच नाही!

# मृत्यूचा गोल

परवा मी एक सर्कस पाहायला गेलो. बरोबर माझी दहा वर्षांची मुलगी होती. तीन-साडेतीन तास तमाम जनावरांना माणसाच्या रांगेत आणून बसवायचा तो अवाढव्य खटाटोप पाहून मला जनावरांची दया आली, माणसाबद्दल घृणा वाटली, चालकांच्या मूर्ख श्रमाचा वीट आला आणि खुद्द स्वतःबद्दल एकसारखे काही विनोदी वाटत राहिले. तीन तासांचा तो जनावर-खेळ पाहून घरी आल्यावर काहीतरी लिहावे असे एकसारखे वाटू लागले. लिहायला घेणारही होतो, तितक्यात माझी मुलगी म्हणाली, "भाऊ, पाहिलेल्या सर्कसवर बाईंनी एक निबंध लिहून आणायला सांगितलाय." आता माझे लिखाण थोडे लांबणीवर टाकणे शहाणपणाचे होते. अनुभवाच्या कोणत्या पातळ्या माझी दशवर्षीय कन्या आविष्कृत करते त्याची आधी चाहूल घ्यावी आणि मगच आपण आपले लिखाण सुरू करावे, असा एक पोक्त विचार माझ्या मनात आला. लिहायला संकोच वाटू लागला. दोन हातांनी सिंहाचा जबडा उघडून, त्यात स्वतःची मान कोंबणारी सर्कशीतील ती शूर भरतपुत्री माझ्या लेकीच्या लिखाणातील प्रमुख नायिका असताना, माझ्यासारख्या 'प्रथितयश साहित्यिकाने' एका विदूषकाला नायक करून लिखाण करावे, याचा मला फार संकोच वाटू लागला. कारण, मला त्या तीन तासांच्या जनावरखेळात फक्त तो विदूषकच आवडला होता, एकदम पसंत पडला होता.

पण माझ्या लेकीने माझी अब्रू संभाळली. (अखेर ती माझीच कन्या नव्हे का ?) तिच्या साध्या लिखाणाला कुठेही 'टोक' आले नव्हते ! (बहुधा तिच्या कलमाचे टोकच बोजड असावे !) अनुभूतीच्या विविध पातळ्यांवर जाऊन काही आगळे भावविश्व तिने दाखवले नव्हते. (ती मुलाच्या एकनिष्ठेने त्या 'थिय्या' रिंगणांतच फेरे मारीत होती.) 'शिकवलेले सारे निमूटपणाने जसे जनावरे शिकतात, तसे आम्ही वर्गातील बालगोपाळांनी आपापले धडे मुकाट्याने घटवले तर भारतमातेची उन्नती होण्यास कितीसा विलंब लागेल ?' असा एक भव्य प्रश्न वातावरणात फेकून देऊन तिने आपला निबंध पुरा केला होता.

तिचा निबंध वाचून मी बाजूला सारला आणि माझ्या लिखाणाकडे वळलो. वर वर्णन केलेला साहित्याचा विशाल प्रांत लेकीने तुडवला नसल्याने मला आता अवघे रानच मोकळे सापडले. ज्या चपळतेने ती चलाख घोडी रिंगणात घिरट्या घालीत होती, त्याच चपळतेने अनेक अवखळ विचार माझ्या डोक्यात धुमाकूळ घालू लागले. मी लिहायला सुरुवात केली.

पण गंमत अशी की, सिंह, वाघ, चित्ते असले क्रूर प्राणी, हत्ती, घोडा, बोकड असले निव्वळ निरुपद्रवी पाणी आणि असंख्य मुली, जवान व तसलेच इतर चिल्लर प्राणी माझ्या मनात ठरेनाच झाले. मला तो एक विदूषक सारखा समोर दिसू लागला. त्याने माझ्या मनाचा कबजा घेतला. माझ्या मनातल्या 'नंदनवनातला तो प्रिन्स चार्मिंग'च झाला. युगानुयुगातला आपला मित्र भेटल्याची जाणीव झाली. तीन तासांच्या सर्कशीचा लघुत्तम साधारण विभाज्य मला त्या विदूषकाच्या वामनमूर्तीत चक्क दिसू लागला. कुणी काहीही म्हणो, मी निश्चय केला की आपण साहित्याशी एकनिष्ठ राहायचे आणि या विदूषकालाच आपल्या लिखाणात नायक करायचे. प्रेरणेशी प्रतारणा करणे मला जमण्यासारखे नव्हते !

सर्कस पाहाणे वाटते तितके सोपे नसते. प्रयोगशाळेत प्राण्यावर प्रयोग करताना एक प्राणी तसाच ठेवतात आणि दुसऱ्यावर नाना प्रयोग करून, दोहोंत हळूहळू काय फरक पडतो ते पाहातात. पहिल्या प्राण्याला 'कंट्रोल' म्हणतात. माणसाने आपली प्रगती किती केली ते वेळोवेळी अजमावून पाहाण्यासाठी सर्कस पाहाणे फायद्याचे ठरते. सर्कशीतील जनावरे 'कंट्रोल'सारखी

असतात. अवाढव्य देहाच्या हत्तीचे ते अजस्र धूड त्याच्या मानाने मुठी-एवढ्या असणाऱ्या टिपावर माणसाने बसवलेले पाहिले की, माझे मन हत्तीविषयी अपार करुणेने द्रवते आणि ओठावर शब्द येतात, 'वॉट मॅन हॅज मेड ऑफ एलिफंट!' गजराजाची मूर्ती त्या टिपावर बसलेली असते, पुढचे दोन पाय हवेत अधांतरी धरून तो आणखी 'स्मार्ट' दिसण्याचा प्रयत्न करतो आणि एकंदर बैठकीला सुबक घाट यावा म्हणून आपली शुंडा चकलीसारखी गुंडाळून आपल्या दातावर ठेवून देतो! पण या सगळ्या रुबाबापेक्षा मला असह्यतेने त्या वेळी काय टोचत असेल, तर त्याच्या चेहऱ्यावरचे ते कृतकृत्यतेचे समाधान. तसले समाधान आणि तसला रुबाब मला इतरत्र फक्त 'ऑनररी डॉक्टरेट' स्वीकारताना एखाद्या राजकीय महापुरुषाच्या चेहऱ्यावरच आढळतो! अत्यंत ओसाड आणि रौद्र अशा अरण्यात मन मानेल तसे हिंडणारा हा केवढा प्रचंड प्राणी! कालिदासानेही त्याला पाहिला तो कसा? 'त्याजितैः फलमुत्खातैर्भग्नैश्च पादपैरिव दन्तिनः।' त्याच्या त्या बेभान धुमाकुळात अरण्याचा पार चुरा झाला होता आणि आता तोच इथे कसा केविलवाणेपणाने बसला आहे! माणसाच्या सहवासा-मुळे, खुर्चीवर आरामशीरपणे बसून राहाता येणे हा संस्कृतीचा परमोच्च बिंदू आहे असे हत्तीलाही वाटू लागावे, हे त्याचे केवढे दुर्दैव आहे!

जे हत्तीच्या बाबतीत खरे तेच दुसऱ्या सगळ्या प्राण्यांच्या बाबतीत खरे आहे. फटफटीवर बसलेले गचाळ अस्वल, देहाचे गाठोडे सारखे हवेत फेकणारा तो अष्टावक्र उंट, चोचीत बोथाटी धरून फिरवणारा पोपट, आणि चित्त्याची गाडी ओढणारा बोकड—प्रत्येक प्राण्याने स्वधर्म अव्हेरून भयावह परधर्म स्वीकारण्याची पराकाष्ठा चालवलेली असते. लोकरीचा ऐटबाज सूट घालून व हातात फेल्ट घेऊन जेव्हा गंभीरपणे माकड रिंगणात उतरते, तेव्हा मला माझ्या दर्जाबद्दल आदर तर वाटतोच, पण कमरेस पंचा आणि अंगावर उपरणे असला वेष करण्याचे माझ्या मनात येऊन जाते. तारेवर कसरत करताना त्या मुलीची जी तिरपीट उडते, ती पाहिल्यावर तमाम राजकीय नेत्यांच्या दैनंदिन कर्तबगारीबद्दल केवढा तरी आदर वाटू लागतो! सायकलीशी जिचा नावापुरताही संबंध नाही असे काही वाहन घेऊन, त्यावर बसून, अनेक प्रकारांनी ते चालवण्याचा प्रयत्न करणारा माणूस पाहाताना,

जगात फक्त सरळ चालणेच तेवढे किती बिकट आहे ते लगेच उमगून येते!

तमाम जनावरांना आपल्या रांगेत आणून बसवण्याचा हा खटाटोप पाहून, ती जनावरेच माणसाला 'आपणासारखे करिती तात्काळ' याची खात्री पटते आणि माणूस व पशू यांच्यातला हा सारा प्रेमळ व्यवहार एका बाजूला उभा राहून निर्लेप अलिप्तपणाने पाहाणारा तो विदूषक तेवढा खरा वाटतो. आपले स्वतःचे छायाचित्र पाहून बर्नार्ड शॉने उद्‌गार काढले होते, "मोअर लाइक मी, दॅन आय लाइक मायसेल्फ!" (मी जितका माझ्यासारखा आहे, त्याहून जास्त हे चित्र माझ्यासारखे आहे!) सर्कशीतला विदूषक हा एकाच ठायी, एकाच आकृतीत, शतकानुशतकात माणसाने जी प्रगती केली आहे ती, त्यातल्या माणसांसह, प्रातिनिधिकपणे दाखवीत असतो. प्रगत मानवाचा अंतरात्मा चित्रित करायचा झाला, तर सर्कशीतल्या विदूषकाचे मॉडेल घेतल्यावाचून गत्यंतर नाही. वास्तविक त्याचा एकही अवयव माणसाच्या अवयवासारखा दिसत नाही. त्याच्या नाकाच्या ठिकाणी लिंबू असते, डोळ्यांची बुबुळे गारगोट्यांसारखी बाहेर आलेली असतात, पावलांची लांबी दोन फूट असते आणि पोटाच्या जागी नगारा असतो. वासुदेवासारखी त्याची उंच टोपी आणि बँडवाल्यासारखा लफ्फेदार पोशाख! पण या सगळ्या पेहेरावातही त्या रिंगणात असलेल्या सगळ्या प्राण्यांत निव्वळशंख माणसा-सारखा दिसणारा हाच काय तो एक प्राणी असतो!

आणि त्याच्या चेहऱ्यावरचा तो भाव! जेव्हा माणूस पशू बनतो आणि पशू माणसाची 'संस्कृती' अंगी बाणवतात, तेव्हा खऱ्या माणसाला 'विदूषक' बनण्यावाचून गत्यंतर उरत नाही. केवढी स्थितप्रज्ञता त्याच्या चेहऱ्यावर असते! गलेलठ्ठ 'सँडो'ला तो जेव्हा भीती दाखवतो, तेव्हा मी मनोमन दचकतो. 'सँडो' हत्तीच्या अवस्थेप्रत पोचलेला असल्याने, त्याला माणूस दिसतच नाही. पण विदूषक हा खरा माणूस असल्याने त्याच्या दटावण्यातले भय मला उमगते! जशी स्थितप्रज्ञता तशीच त्याची ती अखंड आनंदी वृत्ती. प्रत्येक माणूस आत खऱ्या अर्थाने जे 'असतो' पण बाहेर मात्र जे दाखवू इच्छित नाही ते अगदी सहजतेने विदूषक दाखवीत असल्याने तो एक प्रकारे मुक्तात्मा असतो. इतरेजनांच्या प्रत्येक कृतीवर तो अवाक टीका करीत असतो आणि ती फार मार्मिक असते. ट्रॅपीझवर जेव्हा

असतात. अवाढव्य देहाच्या हत्तीचे ते अजस्र धूड त्याच्या मानाने मुठी-एवढ्या असणाऱ्या टिपावर माणसाने बसवलेले पाहिले की, माझे मन हत्तीविषयी अपार करुणेने द्रवते आणि ओठावर शब्द येतात, 'वॉट मॅन हॅज मेड ऑफ एलिफंट!' गजराजाची मूर्ती त्या टिपावर बसलेली असते, पुढचे दोन पाय हवेत अधांतरी धरून तो आणखी 'स्मार्ट' दिसण्याचा प्रयत्न करतो आणि एकंदर बैठकीला सुबक घाट यावा म्हणून आपली शुंडा चकलीसारखी गुंडाळून आपल्या दातावर ठेवून देतो! पण या सगळ्या रुबाबापेक्षा मला असह्यतेने त्या वेळी काय टोचत असेल, तर त्याच्या चेहऱ्यावरचे ते कृतकृत्यतेचे समाधान. तसले समाधान आणि तसला रुबाब मला इतरत्र फक्त 'ऑनररी डॉक्टरेट' स्वीकारताना एखाद्या राजकीय महापुरुषाच्या चेहऱ्यावरच आढळतो! अत्यंत ओसाड आणि रौद्र अशा अरण्यात मन मानेल तसे हिंडणारा हा केवढा प्रचंड प्राणी! कालिदासानेही त्याला पाहिला तो कसा? 'त्याजितैः फलमुत्खातैर्भग्नैश्च पादपैरिव दन्तिनः।' त्याच्या त्या बेभान धुमाकुळात अरण्याचा पार चुरा झाला होता आणि आता तोच इथे कसा केविलवाणेपणाने बसला आहे! माणसाच्या सहवासा-मुळे, खुर्चीवर आरामशीरपणे बसून राहाता येणे हा संस्कृतीचा परमोच्च बिंदू आहे असे हत्तीलाही वाटू लागावे, हे त्याचे केवढे दुर्दैव आहे!

जे हत्तीच्या बाबतीत खरे तेच दुसऱ्या सगळ्या प्राण्यांच्या बाबतीत खरे आहे. फटफटीवर बसलेले गचाळ अस्वल, देहाचे गाठोडे सारखे हवेत फेकणारा तो अष्टावक्र उंट, चोचीत बोथाटी धरून फिरवणारा पोपट, आणि चित्त्याची गाडी ओढणारा बोकड—प्रत्येक प्राण्याने स्वधर्म अव्हेरून भयावह परधर्म स्वीकारण्याची पराकाष्ठा चालवलेली असते. लोकरीचा ऐटबाज सूट घालून व हातात फेल्ट घेऊन जेव्हा गंभीरपणे माकड रिंगणात उतरते, तेव्हा मला माझ्या दर्जीबद्दल आदर तर वाटतोच, पण कमरेस पंचा आणि अंगावर उपरणे असला वेष करण्याचे माझ्या मनात येऊन जाते. तारेवर कसरत करताना त्या मुलीची जी तिरपीट उडते, ती पाहिल्यावर तमाम राजकीय नेत्यांच्या दैनंदिन कर्तबगारीबद्दल केवढा तरी आदर वाटू लागतो! सायकलीशी जिचा नावापुरताही संबंध नाही असे काही वाहन घेऊन, त्यावर बसून, अनेक प्रकारांनी ते चालवण्याचा प्रयत्न करणारा माणूस पाहाताना,

जगात फक्त सरळ चालणेच तेवढे किती बिकट आहे ते लगेच उमगून येते!

तमाम जनावरांना आपल्या रांगेत आणून बसवण्याचा हा खटाटोप पाहून, ती जनावरेच माणसाला 'आपणासारखे करिती तात्काळ' याची खात्री पटते आणि माणूस व पशू यांच्यातला हा सारा प्रेमळ व्यवहार एका बाजूला उभा राहून निर्लेप अलिप्तपणाने पाहाणारा तो विदूषक तेवढा खरा वाटतो. आपले स्वतःचे छायाचित्र पाहून बर्नार्ड शॉने उद्‌गार काढले होते, "मोअर लाइक मी, दॅन आय लाइक मायसेल्फ!" (मी जितका माझ्यासारखा आहे, त्याहून जास्त हे चित्र माझ्यासारखे आहे!) सर्कशीतला विदूषक हा एकाच ठायी, एकाच आकृतीत, शतकानुशतकात माणसाने जी प्रगती केली आहे ती, त्यातल्या माणसांसह, प्रातिनिधिकपणे दाखवीत असतो. प्रगत मानवाचा अंतरात्मा चित्रित करायचा झाला, तर सर्कशीतल्या विदूषकाचे मॉडेल घेतल्यावाचून गत्यंतर नाही. वास्तविक त्याचा एकही अवयव माणसाच्या अवयवासारखा दिसत नाही. त्याच्या नाकाच्या ठिकाणी लिंबू असते, डोळ्यांची बुबुळे गारगोट्यांसारखी बाहेर आलेली असतात, पावलांची लांबी दोन फूट असते आणि पोटाच्या जागी नगारा असतो. वासुदेवासारखी त्याची उंच टोपी आणि बँडवाल्यासारखा लफ्फेदार पोशाख! पण या सगळ्या पेहेरावातही त्या रिंगणात असलेल्या सगळ्या प्राण्यांत निव्वळशंख माणसा-सारखा दिसणारा हाच काय तो एक प्राणी असतो!

आणि त्याच्या चेहऱ्यावरचा तो भाव! जेव्हा माणूस पशू बनतो आणि पशू माणसाची 'संस्कृती' अंगी बाणवतात, तेव्हा खऱ्या माणसाला 'विदूषक' बनण्यावाचून गत्यंतर उरत नाही. केवढी स्थितप्रज्ञता त्याच्या चेहऱ्यावर असते! गलेलठ्ठ 'सँडो'ला तो जेव्हा भीती दाखवतो, तेव्हा मी मनोमन दचकतो. 'सँडो' हत्तीच्या अवस्थेप्रत पोचलेला असल्याने, त्याला माणूस दिसतच नाही. पण विदूषक हा खरा माणूस असल्याने त्याच्या दटावण्यातले भय मला उमगते! जशी स्थितप्रज्ञता तशीच त्याची ती अखंड आनंदी वृत्ती. प्रत्येक माणूस आत खऱ्या अर्थाने जे 'असतो' पण बाहेर मात्र जे दाखवू इच्छित नाही ते अगदी सहजतेने विदूषक दाखवीत असल्याने तो एक प्रकारे मुक्तात्मा असतो. इतरेजनांच्या प्रत्येक कृतीवर तो अवाक टीका करीत असतो आणि ती फार मार्मिक असते. ट्रॅपीझवर जेव्हा

दुसरे आडव्यातिडव्या उड्या मारतात, तेव्हा तोही मधूनच एखादी उडी इतक्या सहजतेने मारतो की, त्या दुसऱ्यांचा सारा अभ्यास आणि तपश्चर्या मातीमोल वाटावी. व्यवहारातल्या प्रत्येक घटनेस वर दिसते त्याहून निराळी अशी एक झालर आतून असते. माणसाच्या प्रत्येक कृतीची विनोदी बाजू विदूषक आपल्या सराईत सहजतेने उलटी करून दाखवीत असतो आणि काय गंमत आहे पाहा! रिंगमास्टरचा चाबूक किंवा अंकुश, वाघ-सिंहांचे विक्राळ जबडे किंवा हत्तीचे खांबासारखे पाय भयानक वाटत नाहीत, इतका भयानक आणि अस्वस्थ करणारा चेहरा विदूषकाच्या ठायी मला जाणवतो! त्या आनंदी व निर्मळ मनाच्या दर्पणात मला आपला गढूळ चेहरा दिसतो आणि मग मी अस्वस्थ होतो.

माझ्या मनात ही अस्वस्थता जागी झाली आणि ती मला टोचू लागली की, समोरचे रिंगण किंवा वाघसिंहांचे बंदिस्त पिंजरे माझ्या डोळ्यांपुढून नाहीसे होतात आणि उजव्या बाजूचा तो मृत्यूचा गोल अधिकाधिक मोठा होतहोत सबंध तंबूएवढा मोठा होतो. तंबूतील प्रत्येक प्रेक्षक आणि सर्कशीतील सारे प्राणी त्या मृत्युगोलात सैरावैरा धावत असतात. एकच हलकल्लोळ उडून जातो. उभे, आडवे, तिरके, सगळे एकामागोमाग एक धावत असतात. अक्षांश-रेखांशांच्या लोखंडी पट्ट्या या गोलावर करकचून आवळलेल्या असतात आणि केव्हातरी एकदा आतल्या प्रत्येक प्राण्यास चकरा मारण्यासाठी जो वेग दिलेला असतो, तो काही केल्या संपत नाही, कमी होत नाही. सर्कशीच्या तंबूतून तीन तासांनंतर बाहेर पडताना माझ्या मनात फक्त हीच एक आठवण जागी असते; एक अखंड, अभंग, काळाकभिन्न मृत्युगोल! मात्र त्या मृत्यु-गोलाला हर्क्युलसप्रमाणे आपल्या डोक्यावर दोन्ही हातांनी गच्च आवळून धरणारा व त्याच्या भाराखाली वाकलेला तो 'विदूषक' माझ्या दृष्टीसमोरून नाहीसा होत नाही. त्या भाराखाली दडपलेला त्याचा चेहरा अजूनही शांत असतो. आपल्या वासुदेवी टोपीवर आणि दोन फूट लांबीच्या पावलावर भक्कम-पणे उभा राहून त्याने हा मृत्युगोल कैक युगे सावरला आहे!

# पंचतंत्राचा नायक

मोरासारखा पिसारा उभारून इतरेजनांचे आराधन करावे अशी प्रतिभेला हौस असते, तर शिंगे उगारून प्रतिपक्षाला अंगावर घ्यावे अशी विद्वत्तेला रग असते! मग जुनी थडगी उकरून काढली जातात, उगीच विदूषकी टोप्या घालून गल्लोगल्ली खेळ करणाऱ्या लोकरंजकांना टपला मारून गप्प केले जाते आणि ज्ञात्याची शालजोडी पांघरून विद्वत्ता ओटीवर बसून कागदपत्रे चाळीत राहाते! 'ज्ञानवृद्धी जीवितातील काव्याची हानी करते काय?' असा प्रश्न विचारणारी विद्वत्ता स्वतःची ज्ञानवृद्धी जमेला धरूनच चालते. वस्तुतः ज्ञान-वृद्धी प्राश्निकाच्या ठिकाणी आहे किंवा नाही हाच मूळ प्रश्न असतो. पण असे मखलाशीचे प्रश्न उभे करून मुद्दे चिवडीत राहाणे विद्वत्तेला फार आवडते. कारण असल्या सर्व प्रश्नांचा निकाल कसाही लागला तरी त्यातील पूर्वार्धामुळे प्रश्ननिर्मात्याची महात्मता जमेस धरलेलीच असते. स्वतःचे श्रेष्ठत्व जमेस धरून—किमानपक्षी ते गुलदस्तात ठेवून—अन्यांच्या शक्तिबुद्धीला धारेवर धरणे हेच विद्वत्तेचे व्यवच्छेदक लक्षण असावे!

'रामायणाचा नायक राम की रावण?', 'ज्ञानेश्वर एक की दोन?', 'वेणीसंहाराचा नायक भीम की दुर्योधन?', 'शिवाजीचा जन्म या साली झाला की त्या?'—असले प्रश्न उकरून काढणे हा विद्वत्तेचा मोठा आवडता खेळ असतो.

सारे रामायण सविस्तर ऐकून विद्वत्तेचा एक गट एखादे वेळी ‘ रामाची सीता कोण ?’ हा प्रश्न विचारणे अडाणीपणाचे समजणार नाही. पण ‘ रामायणाचा नायक राम ’ म्हटले की त्याचा सात्त्विक संताप आणि सत्यप्रीती उफाळून वर आल्याशिवाय राहाणार नाही. यशापयशापेक्षा लढत हीच खऱ्या खेळाडूस महत्त्वाची वाटते ना ? तसेच सत्यज्ञानापेक्षा वाक्पाटव हेच विद्वत्तेस अधिक मोलाचे वाटत असते आणि माणूस हा एक वेळ स्वतःचे अस्तित्व अमान्य करेल, पण स्वतःची विद्वत्ता अमान्य करणे त्याला कधीच शक्य होणार नाही.

‘ पंचतंत्राचा नायक कोण ?’ हा अशापैकीच एक प्रश्न आहे.

राजाने आपल्या अनंतशक्ती, विपुलशक्ती आणि देवशक्ती या तीन मुलांना शहाणपण शिकवण्यासाठी विष्णुशर्म्याची नियुक्ती केली आणि मग त्याने दुनियेतील साऱ्या शहाणपणाची साय काढून ती पंचतंत्राच्या स्वरूपात त्यांना सांगितली. या साऱ्या कथांचा किंवा कथामालिकांचा नायक कोण असा प्रश्न मनात येतो. वरील तीन राजकुमार किंवा त्यांतील ज्येष्ठ पुत्र हा नायक होऊ शकत नाही. कारण ग्रंथाचे प्रयोजनच मुळी त्यांच्या अज्ञपणामुळे निर्माण झाले आहे. विष्णुशर्म्याला नायक समजणे म्हणजे महाभारताचा नायक व्यास होता असे म्हणण्यासारखेच होय. तेव्हा तोही पर्याय शिल्लक राहात नाही. माझ्या मते पंचतंत्राचा नायक फक्त एकच ‘ प्राणी ’ होऊ शकतो आणि तो म्हणजे ‘ कोल्हा ’.

कविकुलगुरूंनी ‘ शाकुंतला ’त ‘ कमळ ’ जसे प्रतीकात्मक वापरले आहे तसेच सगळ्या पंचतंत्रावर कोल्हा आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाया धरून उभा आहे. ज्या ज्या कथांत त्याचा प्रत्यक्ष उल्लेख आहे त्या तर सोडाच, पण ज्या कथांत त्याचा उल्लेख नाही तिथेही त्याचा चाणाक्षपणा, चतुराई, राजकारण, धूर्तपणा आणि बुद्धिचापल्य प्रत्ययास आल्यावाचून राहात नाही. पंचतंत्र तुम्ही पुन्हा एकदा वाचून पाहा आणि सांगा कोल्ह्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप तुमच्यावर पडते किंवा नाही ते !

आपल्याला जे हवे वाटते पण मिळत नाही, ते आपण स्वप्नात प्राप्त करून घेतो. जे गुण आपल्याला पूजनीय वाटतात आणि आपण आपल्या अंगी बाणवण्याचा प्रयत्न करतो पण फसतो, ते सारे दुसऱ्या कोणाच्यातरी व्यक्तित्वास चिकटवून देऊन त्याला आपण आदर्श बनवतो. जातीच्या मत्सरग्रस्ततेमुळे

दुसऱ्या एखाद्या समानधर्मी माणसाला असा आदर्श बनवणे अवघड असल्यामुळे एखाद्या प्राण्यावर ती गुणसंपदा लादणे अधिक सोयीचे असते. म्हणूनच की काय, माणसाने कोल्हा हा प्राणी संपन्न व्यक्तिमत्त्वाचा करून ठेवला आहे.

पंचतंत्राचा हा नायक कधीही चढाईखोर नसतो हा त्याचा विशेष. सिंह गर्जना करीत जंगलातून हिंडताना दिसेल; उंट, माकड आणि हरीण 'आकाश कोसळले' म्हणून सुसाट धावताना (कुणीकडून कुणीकडे!) दिसतील; फार काय, एखाद्या सुप्रभाती अचानक जाग आल्यावर, जातीच्या मठ्ठपणामुळे, एखादा क्षुल्लक खेकडा किंवा उंदीर प्राणिजगताचा 'राजा' म्हणून आपल्या नावाची द्वाही फिरवण्यासाठी उद्युक्त होईल आणि स्वतःचे हसे करून घेईल. कोल्हा मात्र असे कधीच करणार नाही. तो तसा सर्व ठिकाणी नसूनही असतोच. कुठे काही घटना घडल्या की मग तिथे त्याचा वावर सुरू होतो आणि क्षणार्धात परिस्थितीचे सम्यक आकलन करून तो शहाणपणाची पावले टाकतो किंवा दुसऱ्यास टाकायला लावतो. त्या वेळचा त्याचा चेहरा अगदी निर्विकार असतो, डोळ्यांत संपूर्णपणे निसुगपणाची छटा असते आणि आतुरता किंवा अस्वस्थता त्याच्या ठिकाणी तिळभरही प्रत्ययास येत नाही. पण असे जरी असले तरी आपल्या सर्वांगाचे शहाणपण एकवटून तो चालू प्रसंगावर लक्ष केंद्रित करतो आणि स्वार्थैक दृष्टीने तो प्रसंग राबवतो. बहुधा प्रत्येक वेळी त्याला यश तर मिळतेच; पण त्याबरोबरच दुसऱ्या चारदोन प्राण्यांचे मुडदे पडतात आणि यशाबरोबरच त्याच्या उदरंभरणाचा प्रश्नही सुलभतेने सुटतो.

सिंह-व्याघ्रादी वन्य पशूंच्या संहारशक्तीलाही पुरून उरणारी त्याची युक्ती आणि कोणत्याही प्रकारच्या राजकीय डावपेचात दिसून येणारी त्याच्या अंगची पारंगतता यांमुळे तो त्या प्राणिजगतात एकदम उठून दिसतो. प्रत्यक्ष व्यवहारी जगातही माणसाला याच गुणांचा विजय व्हावा अशी भूक असते. साहजिकच ते गुण (किंवा अवगुण) त्याने कोल्ह्यावर लादले आणि मनुष्यजातीचा एक प्रतिनिधी म्हणून पंचतंत्रातील कोल्ह्याला नायकत्व बहाल केले. तेथे कोल्हा जे जे करतो आणि जे जे साधतो ते ते सारे माणसाचे ईप्सित आहे (आणि अजूनही ते त्याला असाध्यच आहे).

पंचतंत्रातील कथाविश्वात कोल्हा येतो तो तीन अलग प्रकारच्या संदर्भात. एकदा कोल्हा आणि तदितर प्राणी असा मुकाबला असतो, एकदा तो आपल्याच

समाजात वावरतो आणि कित्येकदा तो इतर प्राण्यांबरोबर माणसाच्याही सहवासात येतो. प्रत्येक प्रसंगात तो करतो ते राजकारण भिन्न प्रकारचे असते.

कोल्हा आणि तदितर प्राणी असले की तो सुईच्या नेढ्यातून जाण्याइतका नम्र असतो. (प्रत्यक्षात मात्र उंटासुद्धा सर्वांना त्या नेढ्यातून घुसवून, त्यांच्या शरीराची दामटी वळवून हा बाहेर कृतकृत्यता अनुभवीत उभा असतो.) तो जेव्हा आपल्याच समाजात असतो तेव्हा बाकीचे सारे आपले वारसे जेवले आहेत हे जाणून असल्याने बुद्धिचापल्यापेक्षा (त्याचा प्राकृत अर्थ दुसऱ्यास बनवणे, इतकाच) निःस्पृहतेचा, निरिच्छतेचा आव तो आणतो. "मला राज्याचा लोभ नाही. हा सारा उपद्व्याप करून तुला एकदा राज्यावर बसवला की मक्केकडे कूच करायला मी मोकळा झालो बाबा!" असे दाराला म्हणणारा तो दाढीधूर्त औरंगजेब आणि कोल्ह्याच्या कळपातला नायक कोल्हा यात फक्त देहभेद आहे, नीतिभेद नाही. ही त्याची निरिच्छता शंभर टक्के यशस्वी होतेच असे मात्र नाही. 'शेपूट तुटलेला कोल्हा' हे कोल्ह्याच्या जातीला लागलेले कायमचे दूषण आहे. 'आपणासारखे करिती तात्काळ' या तत्त्वाचा प्रयोग तो कोल्हेतर प्राणिमात्रावर जितक्या यशस्वीपणे करू शकतो तितक्या यशस्वीपणे स्वजातीवर करू शकलेला नाही. आणि तिसऱ्या प्रकारात—म्हणजे माणसाच्या सहवासातला कोल्हा—तर त्याचा अभिमान इतका पराकोटीचा असतो की, तो संकटातून माणसालाही वाचवतो खरा. पण तसे करताना त्याला माणसाची अतोनात कीव आलेली असते. एकदा पिंजऱ्यात सापडलेला एक वाघ, त्याच्या गोड बोलण्याला फसून, माणसाने सोडवला. (हे अगदी असेच आजही घडत आहे!) सुटलेला वाघ व्याघ्रपणास लगेच जागला. (सरळच आहे.) माणूस त्याच्या तावडीत सापडलेला असताना त्या पूर्वोक्त उदार आश्वासनांची वाघास आठवण करून देऊ लागला, त्याच्या धर्मप्रीतीस आवाहन करू लागला. (माणूस दुसरे काय करणार?) आणि मग सहजपणे त्या कोल्ह्याने वाघास पुन्हा पिंजऱ्यात अडकवले आणि माणसाकडे एक तुच्छतादर्शक कटाक्ष टाकून तो सरळ चालता झाला. कोल्ह्याने आपणास कसे सोडवले ते मिटक्या मारीत सालोसाल माणूस सांगतो आहे, पण अजूनही त्याला कोल्ह्याचे शहाणपण अगम्य ते अगम्यच आहे.

आणि म्हणून कोल्हा जेव्हा निहायत कोल्ह्यासारखा वागतो तेव्हाच तो यशस्वी होतो आणि नायक ठरतो. एक वेडा कोल्हा लहानपणापासून वाघाच्या पिलांत वाढला. कोल्हेपण विसरून तो व्याघ्रपणाची नक्कल करू लागला. साहजिकच ज्या वेळी त्याच्या वयाचे इतर कोल्हे खऱ्याखुऱ्या हत्तीची वाट लावीत होते, त्या वेळी हा आपल्या व्याघ्रबंधूसारख्या नुसत्या शौर्यांच्या गप्पा आईजवळ (मानलेल्या) येऊन मारू लागला. आईने सरळ सांगितले की, "बाबा रे, वटवट बंद कर. यस्मिन् कुले समुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते!" आणि हा कोल्हा ते ऐकून निमूटपणे बसून राहिला. तो जर वाघाच्या पिलांत वाढला नसता, तर ताडकन उत्तरता, "बाई ग, कोल्ह्याच्या कुळात जन्मलेलाच हत्तीला मारू शकतो. दुसरा कुणी नाही." संगत नडते म्हणतात ती अशी.

म्हणून म्हणतो की पंचतंत्राचा नायक कोल्हाच! रामायणादी महाकाव्यांचा नायक 'हा' की 'तो' असा संदेह विद्वज्जनांत निर्माण होऊ शकेल, पण पंचतंत्राचा नायक कोल्हा याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. सर्वसाधारण आकाराचा देह, खालमुंडी आणि पाताळधुंडी नजर, करूनसवरून नामानिराळे राहाण्याची निर्लेप अलिप्तता आणि कृष्णशल्यादी महान राजकारणपटू व्यक्तींना लाजवील अशी मुत्सद्देगिरी या गुणसमुच्चयाने महाभारतात 'जंबूकपर्व' म्हणून एखादे स्वतंत्र पर्व टाकता यावे इतकी कामगिरी या प्राण्याने केलेली आहे. पंचतंत्र हा कोल्ह्याच्या या कर्तुकीचा माणसाने कृतज्ञपणे लिहिलेला जिवंत इतिहास आहे.

आणि म्हणून कर्माकर्माचा संदेह मला पडला (आणि जो घडीघडी पडतो) की, लोकलज्जेस्तव मी गीतेचे पुस्तक जवळ करतो हे खरे. पण त्या पुस्तकाच्या आत पंचतंत्र उघडे करून धरलेले असते हे मात्र फक्त मलाच माहीत असते. वाघाचे कातडे पांघरून जर गाढवाला वेळ मारून नेता आली, तर गीतेचे आवरण घालून पंचतंत्र वाचायला भीती कुणाची? अवेळी जातीवर जाऊन शंख केल्याने गाढवाचे सोंग उघडे पडले. मला कोल्ह्याने शिकवले आहे की, पंचतंत्राची पारायणे चालू असली तरी ओरडा मात्र करावा गीतार्थाचाच! आणि मी तेच करीत असतो.

# मी आणि माझे व्यक्तिमत्त्व

हातात 'खलिल जिब्रान' होता आणि समोर तो मित्र होता. स्वतःला टीकाकार म्हणवून घेणे त्याला फार आवडायचे.

"तुम्ही आपल्या मुलांना आपले प्रेम द्या. पण आपले विचार मात्र देऊ नका." मी वाचले.

त्याने मान डोलवली.

"बालकरूपी चैतन्यमय बाण सोडण्याची तुम्ही धनुष्ये आहात."

"वाः वाः!" तो उद्गारला.

"त्यांच्या शरीरासाठी तुम्ही त्यांना घरे बांधून द्या. पण त्यांच्या आत्म्याकरता मात्र ती देऊ नका."

"ओऽ होऽऽ होऽऽऽ" त्याने चीत्कार केला. लेख संपला होता. मी गप्प बसलो.

"वाच, आणखी काही वाच." त्याने फर्माईश केली.

"मी आलो, पण तुझे दार बंद होते!" मी वाचले.

त्याची नजर शून्यात गेली. चेहरा उजळून आला. "केवढा अर्थ भरलाय नाही?" तो म्हणाला.

"कशात?"

"जिब्रानच्या शब्दाशब्दात?"

"कोणते शब्द ?"

"मी आलो होतो, पण तुझे दार बंद होते."

"भल्या माणसा, हे वाक्य जिब्रानच्या कोणत्याही पुस्तकात नाही. गंमत केली मी."

त्याचा चेहरा पडला. किंचित रोषाने तो उभ्याचा बसला झाला. क्षणभरात स्वतःला त्याने सावरले आणि म्हणाला, "हा पोरकटपणा एकदा करून झालाय. याला काही फार अक्कल लागत नाही." त्याच्यातला टीकाकार हल्ला होता.

"तेच म्हणतो मी. फार अक्कल नाहीच लागत त्याला."

"कशाला ?"

"प्रॉफेट, प्रवासी अशासारखी पुस्तकं लिहायला !"

"असं ?"

"ज्यात सकृद्दर्शनी काही अर्थ नाही किंवा ज्या वाक्यार्थांचा परस्परसंबंध नाही अशी छोटीछोटी वाक्ये घडवली की वावदूकांना त्यात अर्थाचे सखोल डोह दिसू लागतात."

"अरे वा !"

"बोल, बसल्या बैठकीला अशी किती वाक्यं पाहू ?"

"बरोबरच आहे. दिडकीची भांग घेतली की हव्या तितक्या कल्पना सुचू लागतात."

"चेष्टा नको. खरंच सांग."

"चेष्टा कोण करतंय ? तू का मी ?"

"अरे, पण एवढं रागवायचं कारण ?"

"कारण हेच की, तुम्हांला गांभीर्य नाही, समज नाही. सारा थिल्लरपणा. जिब्रानच्या प्रत्येक शब्दामागं त्याचं आकाशाएवढं व्यक्तित्व आहे हे तुम्हांला दिसायचं नाही. तुम्ही केवळ शब्दजुळारी—"

"तू पाहिलंस त्याचं व्यक्तिमत्त्व ? अनुभव घेतलास ?"

"ते त्याच्या शब्दांतूनच प्रतीत होतंय. प्रत्यक्ष त्याला कशाला पाहायला हवं ?"

"आणि वरच्या माझ्या शब्दांतून ?"

"शून्य दिसतं!"

"कारण?"

"ते शब्द 'तुझे' आहेत आणि तुला व्यक्तित्व आहे पण ते खुजं आहे!"

"म्हणजे तू मला ओळखतोस आणि क्षुद्र समजतोस म्हणून माझे शब्द कवडीमोल. पण जिब्रान किती दूर! केवढा मोठा—"

"नाही. असं पाहा—"

"तेव्हा समज की, माझ्या पुस्तकाची दहा हजार रुपये खर्चून सोनेरी बांधणीची 'डी लक्स' आवृत्ती काढली आणि लेबॉननला धाडली तर माझं व्यक्तिमत्त्व केवढं उंचावेल, माझे शब्द केवढे अर्थगंभीर होतील—"

"काहीतरी बोलू नकोस."

"अशी पुस्तकं तिकडे गेली की हातोहात ती खपतील आणि लोक म्हणतील—"

"काय म्हणतील?"

"वाईज मेन कम फ्रॉम ईस्ट."

तो उठून खिडकीपाशी गेला आणि त्याने सिगरेट पेटीवर ठोकून पेटवली!

माझ्या या टीकाकार मित्राने नुकतेच माझ्या लघुनिबंधांचे परीक्षण केले होते. त्या संग्रहात त्याला पानोपानी 'लघुत्व' दिसले होते, पण खऱ्या लघुनिबंधाच्या जवळपासही माझा निबंध फिरकू शकेल असे त्याला वाटत नव्हते. कारण, खऱ्या लघुनिबंधाला अत्यावश्यक असे जे प्रगाढ व्यक्तिमत्त्व लागते त्याचाच माझ्या ठिकाणी (त्याच्या दृष्टीने) अभाव होता. मग मी उत्कृष्ट लघुनिबंध कसा प्रसवू शकणार? अखेर लघुनिबंध म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसाच नाही का?

आरसा खराच. पण म्हणूनच असे म्हणायचे की, आरशात माणसाचे 'जे' आणि 'जसे' रूप दिसेल तेच त्याचे खरेखुरे रूप नव्हे का? डोक्याला पुणेरी पगडी घातली नाही आणि डोळ्यांवर सोनेरी काड्यांचे उपनेत्र ठेवले नाहीत तर आरशात स्वतःचे रूपच दिसत नाही की काय? माझ्या लघुनिबंधांतून माझे जे व्यक्तिमत्त्व प्रगटेल तेच माझे व्यक्तिमत्त्व आणि तो निबंध हाच त्याचा आविष्कार. आरसा धुरकटला आहे आणि स्पष्ट प्रतिबिंब तो

दाखवू शकत नाही असे फार तर म्हणा. पण जे स्पष्टपणे दिसते ते माझे व्यक्तित्व नाहीच आणि आरशात ते उमटायला मला अजून तपश्चर्या करीत राहायला पाहिजे हा कोणत्या गावचा युक्तिवाद ?

आश्चर्याची गोष्ट अशी की, लघुनिबंधकाराला भव्य व्यक्तित्व असले पाहिजे असा प्रौढ दावा करणारे टीकाकार खुद्द त्यांना किंवा वाचकांना व्यक्तित्वाची आवश्यकता आहे असे मात्र मुळींच समजत नाहीत! म्हणजे शब्द उमटायचा तर तो व्यक्तित्वाच्या गूढ गाभाऱ्यातून यायला पाहिजे असा आग्रह; पण तो वाचणाऱ्याने किंवा त्यावर भाष्य करणाऱ्याने मात्र लोकलमध्ये फुटाणे खात ते केले तरी चालते आणि ते करणाऱ्याची लांबी, रुंदी नि उंची कितीही असली तरी हरकत नसते.

खरी गोष्ट अशी असावी की महान 'अक्षरे' आत्म्याच्या आविष्कारातून उठतात तशीच त्यांना दाद मिळते तीही तेवढ्याच उंचीच्या एखाद्या गगनचुंबी व्यक्तित्वातून! एरव्ही लेखकाला व्यक्तित्व नसल्याची हाकाटी टीकाकार करू लागले म्हणजे समजावे की त्यांचे डोळे दिपवून टाकून त्यांना संभ्रांत करणारा काही झगझगाट त्यांना लेखकाकडून हवा असतो. बरोबरच आहे. जे त्यांच्या डोक्यात शिरते ते कसले लिखाण ? जे त्यांच्या डोक्यावरून पसार होते ते नक्कीच 'उंच' व्यक्तित्वातून आले असले पाहिजे!

महाकवी गडकऱ्यांची गोष्ट सांगतातच ना? 'पुण्यप्रभाव' आणि 'एकच प्याल्या'तील त्यांच्या प्रतिभेचा उत्तुंग विलास पाहून थक्क झालेले कोणी श्रेष्ठ संस्थानिक त्यांचे गुणगान करू लागताच दरबारी मिजासखोरांच्या कपाळावर आठी उमटली. त्या महाकवीचा पाणउतारा करण्याची त्यांच्यात अहमहमिका लागली.

"खाविंद, कसूर माफ असावी. पण तो माणूस म्हणजे काही फार मोठा नव्हे." एकजण म्हणाला.

"सरकार, हे लिखाण म्हणजे निव्वळ भाषांतर हो." दुसरा.

"प्रभो, ते कसले हो लिखाण ? वाचायचे आणि लिहायचे." तिसरा.

"आणि ते चारित्र्य?" चौथ्याची जीभ जणू रेटेनाच.

"मालक, अहोरात्र दारूत पोहत असतो हो तो!" पाचव्याने कष्टाने भरतवाक्य म्हटले.

"शून्य दिसतं!"

"कारण?"

"ते शब्द 'तुझे' आहेत आणि तुला व्यक्तित्व आहे पण ते खुजं आहे!"

"म्हणजे तू मला ओळखतोस आणि क्षुद्र समजतोस म्हणून माझे शब्द कवडीमोल. पण जिब्रान किती दूर! केवढा मोठा—"

"नाही. असं पाहा—"

"तेव्हा समज की, माझ्या पुस्तकाची दहा हजार रुपये खर्चून सोनेरी बांधणीची 'डी लक्स' आवृत्ती काढली आणि लेबॉननला धाडली तर माझं व्यक्तिमत्त्व केवढं उंचावेल, माझे शब्द केवढे अर्थगंभीर होतील—"

"काहीतरी बोलू नकोस."

"अशी पुस्तकं तिकडे गेली की हातोहात ती खपतील आणि लोक म्हणतील—"

"काय म्हणतील?"

"वाईज मेन कम फ्रॉम ईस्ट."

तो उठून खिडकीपाशी गेला आणि त्याने सिगरेट पेटीवर ठोकून पेटवली!

माझ्या या टीकाकार मित्राने नुकतेच माझ्या लघुनिबंधांचे परीक्षण केले होते. त्या संग्रहात त्याला पानोपानी 'लघुत्व' दिसले होते, पण खऱ्या लघुनिबंधाच्या जवळपासही माझा निबंध फिरकू शकेल असे त्याला वाटत नव्हते. कारण, खऱ्या लघुनिबंधाला अत्यावश्यक असे जे प्रगाढ व्यक्तिमत्त्व लागते त्याचाच माझ्या ठिकाणी (त्याच्या दृष्टीने) अभाव होता. मग मी उत्कृष्ट लघुनिबंध कसा प्रसवू शकणार? अखेर लघुनिबंध म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसाच नाही का?

आरसा खराच. पण म्हणूनच असे म्हणायचे की, आरशात माणसाचे 'जे' आणि 'जसे' रूप दिसेल तेच त्याचे खरेखुरे रूप नव्हे का? डोक्याला पुणेरी पगडी घातली नाही आणि डोळ्यांवर सोनेरी काड्यांचे उपनेत्र ठेवले नाहीत तर आरशात स्वतःचे रूपच दिसत नाही की काय? माझ्या लघुनिबंधांतून माझे जे व्यक्तिमत्त्व प्रगटेल तेच माझे व्यक्तिमत्त्व आणि तो निबंध हाच त्याचा आविष्कार. आरसा धुरकटला आहे आणि स्पष्ट प्रतिबिंब तो

दाखवू शकत नाही असे फार तर म्हणा. पण जे स्पष्टपणे दिसते ते माझे व्यक्तित्व नाहीच आणि आरशात ते उमटायला मला अजून तपश्चर्या करीत राहायला पाहिजे हा कोणत्या गावचा युक्तिवाद ?

आश्चर्याची गोष्ट अशी की, लघुनिबंधकाराला भव्य व्यक्तित्व असले पाहिजे असा प्रौढ दावा करणारे टीकाकार खुद्द त्यांना किंवा वाचकांना व्यक्तित्वाची आवश्यकता आहे असे मात्र मुळीच समजत नाहीत! म्हणजे शब्द उमटायचा तर तो व्यक्तित्वाच्या गूढ गाभाऱ्यातून यायला पाहिजे असा आग्रह; पण तो वाचणाऱ्याने किंवा त्यावर भाष्य करणाऱ्याने मात्र लोकलमध्ये फुटाणे खात ते केले तरी चालते आणि ते करणाऱ्याची लांबी, रुंदी नि उंची कितीही असली तरी हरकत नसते.

खरी गोष्ट अशी असावी की महान 'अक्षरे' आत्म्याच्या आविष्कारातून उठतात तशीच त्यांना दाद मिळते तीही तेवढ्याच उंचीच्या एखाद्या गगन-चुंबी व्यक्तित्वातून! एरव्ही लेखकाला व्यक्तित्व नसल्याची हाकाटी टीकाकार करू लागले म्हणजे समजावे की त्यांचे डोळे दिपवून टाकून त्यांना संभ्रांत करणारा काही झगझगाट त्यांना लेखकाकडून हवा असतो. बरोबरच आहे. जे त्यांच्या डोक्यात शिरते ते कसले लिखाण ? जे त्यांच्या डोक्यावरून पसार होते ते नक्कीच 'उंच' व्यक्तित्वातून आले असले पाहिजे!

महाकवी गडकऱ्यांची गोष्ट सांगतातच ना ? 'पुण्यप्रभाव' आणि 'एकच प्याला'तील त्यांच्या प्रतिभेचा उत्तुंग विलास पाहून थक्क झालेले कोणी श्रेष्ठ संस्थानिक त्यांचे गुणगान करू लागताच दरबारी मिजासखोरांच्या कपाळावर आठी उमटली. त्या महाकवीचा पाणउतारा करण्याची त्यांच्यात अहमहमिका लागली.

"खाविंद, कसूर माफ असावी. पण तो माणूस म्हणजे काही फार मोठा नव्हे." एकजण म्हणाला.

"सरकार, हे लिखाण म्हणजे निव्वळ भाषांतर हो." दुसरा.

"प्रभो, ते कसले हो लिखाण ? वाचायचे आणि लिहायचे." तिसरा.

"आणि ते चारित्र्य ?" चौथ्याची जीभ जणू रेटेनाच.

"मालक, अहोरात्र दारूत पोहत असतो हो तो!" पाचव्याने कष्टाने भरतवाक्य म्हटले.

बराच वेळ ही बटवट ऐकून राजेसाहेब मिष्कील हसले आणि एकदम उत्तरले,

"अरे चिलटांनो, तो कोणती दारू पितो ते शोधून आणा म्हणजे दोनदोन घोट रोज तुमच्याही नरड्यात ओतून पाहीन!"

सवयीने पाठ झालेले ओशाळवाणे हसू चेहऱ्यावर सारवीत खुषमस्करे चालते झाले.

खंडप्राय देशाला प्रदक्षिणा करीत राहिलेल्या विनोबांची चाल आणि पहिली पावले टाकता आल्याच्या असीम आनंदात माजघरातून ओसरीवर पदयात्रा काढणाऱ्या एखाद्या बाळाची चाल यात लहानमोठे कसे ठरवायचे? विनोबांचे व्यक्तित्व बाळाच्या पाठीशी नसेलही. पण म्हणून बाळाच्या डगमगत्या पावलांसारखीच विनोबांची पावलेही डगमगत नाहीत काय? आणि डगमगली म्हणून बिघडले तरी कुठे? शेवटी चार पायांवरची भक्कम चालच न डगमगता होऊ शकते. दोन पायांवर सतत थडथडणारे मस्तक सावरणे कठीणच असते. पण त्या काठिण्यातच माणसाची शान असते.

तेव्हा बाळाची चाल बाळापाशी आणि बाळाचे व्यक्तित्व बाळाजवळ. ते जितके खरे तितकेच थोरांचे व्यक्तित्वही खरे. त्याचा प्रामाणिक आविष्कार करणारा त्याचा लेख हाच त्याच्या व्यक्तित्वाचा आरसा. व्यक्तित्वाची दुसरी उंची गाठेपर्यंत एखाद्याने लिहू नये आणि लघुनिबंधाला तर मुळीच हात घालू नये या म्हणण्यात काही अर्थ नाही.

शेवटी लिहिणाऱ्याने लिहीत जावे आणि वाचणाऱ्याने वाचीत जावे. त्यांना त्यात जे काही दिसेल तेच खरे.

छापणाऱ्यांनी मात्र ते न कंटाळता छापत राहिले पाहिजे.

# कोश करून राहिलेले शब्द !

आकाश भरून आले होते, पण बरसत नव्हते ! आशय डोळ्यांसमोर तरळताना दिसत होता, पण नेमका लेखणीतून उतरत नव्हता. आणि काही तरी प्रसवल्याशिवाय चैन तर पडत नव्हते. अनेक वेळा असे होते. सुप्त मनातील संग्रहितात 'अश्वत्थाची सळसळ' ऐकू येत होती. पण सुप्त मनातून प्रगट मनात पदार्पण करण्यासाठी आशयाला अजून वाट सापडत नव्हती. या धडपडीत आतून भरून येत होते. पण हातातून बाहेर पडत नव्हते. आणि याचाच फार त्रास होत होता. याच जर प्रसववेदना असतील तर त्यांचा आता असह्य अतिरेक झाला होता. काही तरी बरसल्याशिवाय, सांगितल्याशिवाय, लिहिल्याशिवाय स्वस्थता वाटणार नव्हती. सुटका होणार नव्हती.

आणि अशा अवस्थेतच 'तो' टेबलावर पडलेला डोळ्यांना दिसला !

कसा साळसूदपणे थंडगार झालेल्या निखाऱ्यासारखा तो टेबलावर पडून राहिला होता !

तो ! एक मुठीएवढ्या आकाराचा शब्दकोश. रंगहीन, गंधहीन अशा शब्दांच्या तुकड्यांनी भरलेली ती एक निर्जीव टोपली. स्फोटक गंधकाने खचून भरलेली ती एक 'निःशब्द' शब्दमंजूषा. दिसायला जेवढी निरागस तेवढीच प्रत्यक्षात भयानक.

‘आधी शब्द की आधी अर्थ’ या न संपणाऱ्या प्रश्नापेक्षाही जास्त महत्त्वाचा प्रश्न ‘आधी शब्द की आधी शब्दकोश’ हा आहे. व्याकरणातून जन्मणारा प्रत्येक शब्द प्रथम कोश करून राहातो. फुलपाखरू होण्यापूर्वी सुरवंट कसा कोश करून राहातो त्याप्रमाणेच. त्या कोशातून शब्द बाहेर पडतो तेव्हा त्याचे सुंदर फुलपाखरू झालेले असते. पण नेहमी फुलपाखरूच होते असे नाही. कधीकधी या कोशातून बाहेर पडणाऱ्या शब्दांचे सुरवंटही होतात. कधीकधी ते जळते अंगार असतात आणि अनेकदा आपल्या डोक्यावर विदुषकी टोप्या चढवून त्यांची पलटण पोरखेळ करीत राजरस्त्याने मिरवत जाते.

ज्या रसायनाने कोश करून राहिलेल्या निर्जीव शब्दांना सौरभ लाभतो किंवा ज्यांच्या संयोगाने सुगंधित शब्दांचीही लक्तरे लोंबू लागतात त्या रसायनालाच ‘जीवन’ म्हणत असावेत. शब्दांचा अर्थ जीवनाच्या धक्काधक्कीतच पक्का होतो किंवा शब्दाला अर्थ लाभतो. शब्दकोशातील शब्द पाण्यासारखे पातळ, प्रवाही आणि रस-गंधहीन असतात. मनगटातील ताकदीवरच ‘नरा’चा ‘नारायण’ होतो. प्रत्यक्षात, तसेच शब्दकोशातही.

समोरच्या टेबलावर शांतपणे पडून राहिलेला तो मुठीएवढा शब्दकोश पाहून माझ्या ओठाच्या कडा रुंदावल्या. त्या साळसूद शब्दभांडाराच्या अथांगतेची मला चांगलीच कल्पना होती म्हणून ठीक. नाहीतर तो दिसत होता तितकाच तो निरागस आहे असे समजून मी व्यवहारात चांगलाच फसलो असतो. किंवा तसे तरी काय म्हणून? आजवर मी तसा फसत आलोच नव्हतो काय? शब्दावर निर्धास्तपणे विसंबत चालल्यानेच जागोजागी आणि क्षणोक्षणी मी आपटी खात होतो. केळ्याच्या सालीवरून पाय घसरावा त्याचप्रमाणे माझा पाय ठिकठिकाणी घसरत होता. कधी शब्द मला हुलकावण्या देऊन गिरगीर हिंडवत होते, तर कधी शब्दांच्या उतरंडी छाताडावर घेऊन मला नक्षत्रे मोजावी लागत होती. कधीकधी शब्दांचे कांचनमृग स्वीकृतापासून दूरदूर घेऊन जात होते तर कधीकधी वठलेला शब्दवृक्ष केव्हा पालवेल ते पाहात—त्याची केविलवाणी प्रतीक्षा करीत—दिवसामागून रात्री पसार होत होत्या. अखेर शब्दांचे फास गळ्याभोवती गच्च बसलेले होते ते तोडणे शक्तीबाहेरचे होते.

सगळ्या शब्दांना एका सूत्रात ओवून त्यांच्या माळांनी शब्दकोश भरून टाकणारा पहिला 'शब्दज्ञानी' आपल्या कर्तृत्वावर खूष होऊन कार्यपूर्तीचा आनंद उपभोगत असतानाच एकीकडे शब्दांच्या त्या पलटणी त्याच्याकडे पाहून फिदीफिदी हसल्या असतील. कारण शेवटचा शब्द कोशात बंद करून हात झटकत असतानाच त्याला आढळून आले असावे की, शब्दांची फक्त कलेवरेच त्याच्या हाती लागली होती, शब्दांचा प्राण त्याच्या हाती लागणेच शक्य नव्हते. तळहातावरच्या पाऱ्यासारखे शब्दांचे अर्थ मुठीत केव्हाच सापडत नाहीत. पाहाता पाहाता ते नाहीसे होतात. एखादा मुडदेफरास आणि एखादा कोशकार यांच्यात जातिभेद संभवतच नाही.

कॅलेंडरमधील सगळे दिवस जसे सारखे तसे कोशातील सगळे शब्द आणि त्यांचे अर्थ एकसारखे. सोमवार, मंगळवार म्हटले तरी दिवसांना व्यक्तिमत्त्व असल्याचा भास होतो. पण एक ते तीस तारखांत महिन्याचे दिवस मोजण्याची दुष्ट कल्पना काढणारा नीरस कालगणक मात्र धन्य होय. माणसाने इथे खरोखरच निसर्गावर विजय मिळवला असे म्हणावे लागते. कारण ऋतुचक्राच्या रंगीबेरंगी फेऱ्यांनी दिवसादिवसांचा आणि महिन्यामहिन्यांचा निरनिराळा रंग आणि मनोवेधक व्यक्तित्व माणसाच्या मनावर ठसावे म्हणून निसर्गाची एवढी खटपट चाललेली पाहूनही माणसाने आपल्या सुपीक डोक्यातून दिवसांच्या कपाळावर एकाच आकाराचे आणि एकाच रंगाचे नंबर ठोकले आणि त्यांना कॅलेंडरमध्ये बंदिस्त करून टाकले. सगळे दिवस सारखेच व्यक्तित्वहीन. आणि असल्या नीरस कालगणनाकाराचा आदर्श समोर ठेवूनच कोशकाराने आपले कमालीचे निर्बुद्ध काम पार पाडले असावे. 'सगळे शब्द माझ्या मुठीत आहेत' अशा भ्रमात असणारा हा शब्दवीर इतकेही समजू शकला नाही की, संपूर्ण वाक्यावाचून शब्दांना अर्थ नाही आणि वाक्य तयार व्हायचे तर त्याला 'कर्ता' लागतो, स्वतःचे कर्म लागते. कोशकाराने शब्द जमा केल्याचे कर्तृत्व भलेही स्वतःकडे घ्यावे, पण शब्दांच्या अर्थांचे कर्तृत्व मात्र काही महामानवांच्याच पदरी जाते.

म्हणूनच शब्दकोश पदरी बाळगूनही सगळ्यांना अर्थज्ञानासाठी एखाद्या व्यास-वाल्मीकीवर किंवा शेक्सपिअरवर विसंबावे लागते. 'हॅम्लेट'मधला कोणता शब्द शब्दकोशात नव्हता ते सांगा आणि असला शब्दकोश कोणाच्या

पदरी नव्हता तेही ऐकवा. पण कोशातील शब्दभांडारातून 'हॅम्लेट'चा उत्तुंग हिमालय उभा करणारा शेक्सपिअर मात्र एखादाच. फूटपट्ट्या लावून आणि चेहरेपट्टीचा सारखेपणा चाचपून शब्दांचे ढीग जमा करता आले तरी त्या हडेलहप्पीचे मोल नाही. त्या पोरक्या शब्दांच्या रांगा लावून आणि कर्ता-कर्म-क्रियापदांना वेठीला धरून त्यातून जीवनभाष्य निर्मिणारे शब्द-सृष्टीचे परमेश्वर कुणी दुसरेच असतात.

म्हणून माझ्यासमोर टेबलावर निमूट पडलेला तो शब्दकोश माझी फसवणूक करू शकणार नव्हता. त्याच्या निरागसतेचा बुरखा फाडून त्याच्या पोटातील किल्मिष आणि चेहऱ्यावरील मिस्किलता मी केव्हाच ओळखली होती. वाटत होते की, हे शब्द कोश करून असे राहिले आहेत तेच ठीक आहे. त्यांना विनाकारण पिसाळवण्यात किंवा जागे करण्यात अर्थ नाही. क्रांतीच्या घंटानादाबरोबर त्यांच्यातील सुप्त विखार जागे होतील तेव्हा होवोत. नैतिक मूल्यांच्या उलटापलटीमुळे कित्येकांचे अर्थ फजीत झाले आहेत ते ठीकच आहे. शब्द समोर ठेऊन त्याबरहुकूम जीवन जगणारे पढीक आणि जीवनसमरात अपूर्व पराक्रम गाजवल्यामुळे तोंडे फिरवून बसलेले शब्द यांचा परस्परछेद गेला आहे हे चांगले झाले. आता कोशातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द इतिहासपुस्तकात सापडेल किंवा विज्ञानग्रंथात आढळेल. शब्दकोश खरा तर अक्षरकोश म्हणूनच उरेल.

'शब्दकोश' या शब्दाचा समास मी 'कोश करून राहिलेले शब्द' असा सोडवतो तो याच अर्थाने. या कोशातून शब्द बाहेर पडतील तेव्हाच त्यांची रंगीन फुलपाखरे काव्य-कादंबरीत विहार करतील आणि त्यांचे सुरुंग इतिहासात स्फोट करतील किंवा विज्ञानात भरारी मारतील. ही किमया व्हायची तर कोशगत शब्दांना प्रतिभेचा परीस भेटला पाहिजे. कोशकार आपला जन्मदाता असला तरी कवी आपला पालक आहे हे त्यांनी ओळखायला पाहिजे. ढोबळपणाने कवाईत करण्यापेक्षा आणि उंचीप्रमाणे रांगा लावण्यापेक्षा त्यांनी मुक्तपणाने स्वतःला फेकून देण्यास तयार व्हायला पाहिजे. कोश ही शब्दांची जन्मभूमी असली तरी कथा-काव्य ही त्यांची कर्मभूमी आहे हे त्यांनी ओळखले पाहिजे.

केवळ शब्द हे आशयाचे वाहक होऊ शकत नाहीत. म्हणूनच शब्दकोश

हा साहित्यिकांचा संदर्भग्रंथ असत नाही. कोशातील शब्दांना भावनेची ऊब घालून बोलके करावे लागते. तरीही शब्द पाहिजे ते बोलतीलच असे नाही. केव्हा केव्हा तर शब्दांशिवाय बोलावे असे वाटू लागते. जे सांगावेसे वाटते त्याच्या मार्गातील शब्द अडचण बनतात. अशा वेळीं शब्दांना पुनरपि कोशात कोंबून आपण शब्दांवाचूनच बोलावे हे बरे. याच अर्थाने मर्ढेकर म्हणाले होते :

**शब्द टराटर फाडुनि टाकी**
**सांगायाचें म्हणजे ओठीं**
**तसेंच राहिल माझ्या अगदी—**
**पूर्ण नागडें, पूर्ण नागडें !**

## क्षितिजे दूर गवाक्षाची...

भिंतीवरल्या कॅलेंडरात पुनः पुनः डोकावूनही मला आज सर्वपित्री अमावास्या असल्याची खूण सापडत नाही. डायरी तपासून पाहिली तरी कोणतीही लक्षवेधी नोंद तिथे आढळत नाही. मग आज हा असा तिथिक्षय का बरे? मनावर हे धूसर सावट का? चित्ताचा आवेश इतका फुसका का? उत्साहावर हे असे विरजण का? शरीर थकले म्हणावे तर नेहमीच्या रामबाण औषधांनी आज त्याचा थकवा दूर होत नाही. कपभर गरमागरम चहा आणि कॅप्स्टनचा तीव्र झुरका घेतला की कितीही मरगळलेले शरीर तात्काळ ताजेतवाने झालेच म्हणून समजा. आज हा उपाय एकदम कुचकामी ठरला. खरे पुसाल तर चहाचा गरम घोट घ्यावा किंवा धूम्रपानास ईर्ष्येने हात घालावा इतकाही तकवा आज मनाला वाटत नाही आणि या अवस्थेच्या दारुण यातना सहन होत नाहीत. आज हे असे का बरे? कंबरडे मोडून जावे असा पराजय एक वेळ पत्करतो. पुनः कंबर कसून दिशांना साद घालावी असे आव्हान तसल्या पराजयातच असते! पण मनाच्या पाकळ्या पार कोमेजून जाऊन सूर्यफुलासारख्या मिटल्या की आत्म्यासमोर अंधारी येते. तो पराजय नसतोच. ते वांझ पळपुटेपण असते. कशापासून पलायन? अस्तित्वाच्या व्यासपीठापासून पलायन. स्वतःपासून पलायन. स्वतःतच स्वतःचे संपूर्ण संमीलन.

आज हे असे का व्हावे? आजची ही तडफड काही प्रसवू शकत नाही. तिच्या पोटी काही सृजन नाहीच. भिंतीबरोबर उभी असलेली ग्रंथांची कपाटे रोज धगधगते अंगार भासतात. मनाच्या त्या पर्युत्सुक अवस्थेत त्यांना घेण्यासाठी हात पुढे करावा तर चटका बसेल असे भय वाटते. इतकी त्यांची आच दूरवर पोचते! पण आज? आज त्यांच्याकडे हात झेपावत नाही, पण ते अंगार आहेत म्हणून नव्हे तर ते राखेचे ढीग भासतात म्हणून! त्या साऱ्या जीवनगाथा अखेर शेदोनशे पानांत मृतप्राय अवस्थेत बंदिस्त आहेत ना? असे वाटते की, मृतांची कलेवरे उकरून काढण्याची मुडदेफराशी किती काळ करायची? आज ग्रंथ इष्टमित्र वाटत नाहीत, सुतकी सोयरे वाटतात. प्रत्येकाच्या डोक्याला बांधलेली टापशी आज डोळ्याला लख्ख दिसते!

खिडकीतून दिसणारा पश्चिमेचा डोंगर रोजच्यासारखा आजही पाहिला. सकाळी पाहिला, दुपारी पाहिला, संध्याकाळी पाहिला. आज त्याच्या पोटातला धगधगता वैश्वानर विझून गेलासा वाटला. आज त्याचे प्रचंडपण केवळ धेंद अवजडपण भासले. आज तो पृथ्वीचा प्रियकर नव्हताच. आज तो आकाशातील आशयही नव्हता. आज त्याला जणू स्वतःचे फोलपण समजले होते. मी त्याच्याकडे अनेक वेळा पाहिले. कळवळून पाहिले. तडफडून पाहिले. फार फार पाहिले. पण त्याचा तृतीयनेत्र आज उघडलाच नाही. त्याचे "ऊर्ध्व बाहू, अधः शाखा" शरीर आज कणाहीन भासले. चिरंतन स्फूर्तीचा तो अश्वत्थ आज माझ्या कामी आला नाही!

आज ही मरगळ का? प्रतिभेची भरारी पोटीं बाण घेऊन पायाशी लवेदा होऊन पडली आहे. प्रज्ञेची झेप कुंपणापलिकडे जात नाही. विचार विकारांची संगत सोडण्यास तयार नाहीत. आज सृजनशीलता व्रतस्थ होऊन बसली आहे.

मनाच्या या अवस्थेस नाव तरी कोणते द्यावे? ही केवळ मनाची मरगळ नाही, हा केवळ शरीराचा थकवा नाही. हे सामान्याला झालेले शून्यदर्शन आहे. हे जाणिवेला आलेले वैय्यर्थाचे फूल आहे. गंधहीन, रंगहीन, कळाहीन.

बहुतकाळ मन झगड्यात रमते. झगडा जितका तीव्र तितके ते अधिकाधिक लढाऊ बनते. मग झगड्याचे फोलपणही कधीकधी त्याला उमगून येते आणि मग मात्र त्याच्या ठायीची प्रवृत्तीच संपते!

'दैवी नैराश्य' (डिव्हाइन डिस्पेअर) हा शब्दप्रयोग मला फार अन्वर्थक वाटतो. असीम नैराश्य हेच अखेर दैवी असते. प्रभूत आशावाद मात्र लौकिक ठरतो. 'नेऽति, नेऽति' हीच मानवी जीवनाची खरी कहाणी आहे. कारण 'नेऽती'ची झेप क्षितिजे कवटाळण्याइतकी व्यापक असते. अस्तिपक्षी विधान करण्यापेक्षा असे नास्तिपक्षी विधान करून जीवनभाष्य करणारा तत्त्वज्ञ खरोखरच प्रज्ञावंत असला पाहिजे. कितीही व्यापक मर्यादा सांगा, शेवटी ती मर्यादाच ठरते. मर्यादांचे गज फोडण्याची ताकद 'नेऽति' या मुलायम शब्दात आहे.

आज प्रज्ञेला भावणारा जीवनार्थ अशा 'नेऽति'मय शब्दांतच सांगितला पाहिजे. माझ्या मर्यादित अस्तित्वाने असीम जाण कशी बरे टिपावी? माझी हाक दोन घरे पलिकडे जाणेसुद्धा मुष्कील, तर आज दिशांना हाकारे कसे बरे घालवे! म्हणून आज विजनवास टाळणेच बरे. आता या कॉटवर पडून खिडकीतून दिसणारी रूक्ष घरे आणि माणसे पाहावी हे उत्तम. उशाला आपल्या असमाधानाची उशी असो द्यावी.

असे पाहात राहिले की मला माझा मीच दिसत राहातो. अनंत रूपे, अनंत शब्दे, अस्मिता आत्मकथा आळवीत राहाते. दिशांच्या चौकटीत नजर फेकली की 'मी' हरवून जातो, पण घरात पाय घट्ट रोवून खिडकी-बाहेर पाहिले की शेजाऱ्यांच्या प्रत्येक हालचालीत उभे असते ते स्वतःचेच साडेतीन हात शरीर आणि मूठभर मन! अनंत अवकाशात मला स्थान नाही हे ठीक! पण केवळ खिडकीबाहेरच्या विश्वाने मला विसरून कसे चालेल? क्षितिज मला लांब आहे पण गवाक्षाच्या चौकटीत तर मी ठळक दिसतो ना!

—तसा मी गवाक्षवादी नाही, क्षितिजवादीच आहे. आपल्या सामर्थ्यांची शंका वाटू लागली की दृष्टी क्षितिजापर्यंत झेपावत नेणे फायद्याचे ठरते. आसमंतात तरळणारी सारी स्वप्ने आपल्याच मालकीची होऊन बसतात. घाउकाची पूजा भावनेची भूक शांत करू शकत नाही हे खरे. पण घाउकाच्या पोटात कुठेतरी चुळकाभर पाणी पिऊन आत्मा तुष्ट करण्याची सोय असते ती विशिष्टात असत नाही. म्हणून मी गवाक्षाचा वास टाकतो आणि क्षितिजाचा हव्यास धरतो. अनेकदा. पुनःपुनः! तसा मी क्षितिजवादीच आहे.

पण कधीकधी असा क्षण येतो की क्षितिज कःपदार्थ वाटू लागते. 'न लाभणारे क्षितिज दुर्घट' असे द्राक्ष-कोल्हा न्यायाने नव्हे. अगदी खऱ्या अर्थाने. ते नकोच वाटते. आपल्याला बाहण्याची त्याची ताकद संपुष्टात आली आहे हे चक्क जाणवते. त्याच्या विशाल पोकळीत काही हेतू नाही आणि असलाच तर तो गतार्थ झाला आहे हे प्रत्ययास येते. आपण काय म्हणून त्याचे स्तोम माजवीत होतो ते स्वतःचे स्वतःलाच कळेनासे होते आणि मिटल्या सूर्यफुलासारख्या दृष्टीच्या पाकळ्या क्षितिजाला पाहून मिटतात आणि गवाक्षावर स्थिर होतात.

आणि अशा त्या स्थिर झाल्या की जे क्षितिजापर्यंत दृष्टी फेकून कधी दिसले नव्हते ते अगदी समोर—हाकेच्या अंतरावर—स्पष्टपणे दिसू लागते. पिंजऱ्याच्या गजावर चोच घासणाऱ्या राघूसारखा परवा कॉटवर पडल्या-पडल्या गवाक्षाच्या गजांवर धडका घेत होतो. भिंतींचा पिंजरा दिशांच्या पिंजऱ्यापेक्षा अशा वेळी अधिक सह्य वाटतो. दिशांच्या पिंजऱ्याबाहेर अक्राळ-विक्राळ नियती घास घेण्यासाठी सज्ज आहे, आणि सरपटत जवळ येत आहे असे भासते. मग वरून टपकन पिंपळपान पडले तरी आकाश कोसळले असे वाटते आणि धीर खचतो. पण खिडकीच्या गजांबाहेर फार तर एक पहारेकरी असतो आणि बहुंशी तो डुलक्या घेत असतो. त्याची दडस मनावर उतरत नाही. उलट तो मनाला खेळवून जातो. अनामिकाची भीती मात्र आत्म्याला अस्वस्थ करते.

गवाक्षातून उत्तरेस नजर टाकली की सहा मजली इमारत दिसते. क्षितिजापर्यंत पोचणारी नजर ती निर्घृणपणे मध्येच कापून टाकते. स्वप्नभंगाचे ते दारुण दुःख मनात जळत ठेवल्याने आजवर त्या इमल्याच्या सहा मजल्यांवरचे वास्तव कधी नीटपणे दिसलेच नव्हते. पण परवा क्षितिज अव्हेरले आणि मजले नीट न्याहाळले. जे क्षितिजापर्यंत दिसले नव्हते ते तिथे ठळकपणे दिसले. आणि त्यामुळेच असे अस्वस्थ वाटू लागले. मजल्यावरील जनलोक मला विसरले आहेत असा धसका बसला. एक प्रतिभासंपन्न लेखक म्हणून आज ते एकमेकांत माझ्यासंबंधी कुजबुजत का नाहीत? कठड्यावर रेलून उभ्या असताना त्या गौरकाय अंगना माझ्याकडे पाहून एकमेकांना सुकुमार अंगुलिनिर्देश का करीत नाहीत? आज कोणीही वृत्तपत्रकार माझा

उंबरठा का चढत नाही? साऱ्या 'साहित्य-कला अकाडमी' आज मृतप्राय झाल्या की काय? तमाम टीकाकारांची प्रतिभा थंड गोळा होऊन पडली की काय? अरे, माझ्या गवाक्षाच्या गजांआड मला असे बंदिस्त करून टाकण्यात तुम्हांला कसला पुरुषार्थ वाटतो? शिव्यांचा शेणखळा उधळलात तरी पर्वा नाही, पण माझ्याएकी असे निष्ठूर होऊ नका. मरण परवडेल पण ते हौतात्म्याचे तरी द्या. कोण म्हणाला होता की माझे लेखन 'स्वान्तः-सुखाय' असते म्हणून? तसे ते कधीच नसते. 'मरावे परी कीर्तिरूपें उरावें' हेच खरे. यात बदल होणे शक्य नाही. झालाच तर 'मरावें परी उरावें' इतकाच होईल. कसले 'स्वान्तःसुख' नि कसला 'उदंड काल आणि विपुल पृथ्वी'? मी उरेन कसा हीच एक अहर्निश चिंता! आणि काही मरणेच अशी असतात की ती 'मरणे' म्हणजेच 'उरणे'!

...निदान ते मरण तरी द्या!

...आणि इथेच आजच्या मरगळीचे खरे कारण सापडले. माणसाच्या पराभवाची पराकाष्ठा म्हणजे त्याला मरणाची भीक मागत दारोदार हिंडावे लागणे ही होय. माझ्या जिवंतपणात मी रंग भरू शकलो नाही तर माझे मरण तरी तुम्ही उभारा ही आजची खरी भूक आहे. 'माझ्या मरणाने मला मरू देणे' हाच जगाने माझा जास्तीत जास्त सूड उगवणे होय! म्हणून ही तडफड आहे, पंखांचा हा फडफडाट आहे. क्षितिजाच्या परिघात कुठेतरी समाधी लागून शरीर पडत नाही म्हणून गवाक्षाआडून तुम्हाकडे केविलवाणे पाहातो आहे की, तुम्ही तरी जड हाताने घाव घालून हे शरीर संपवा. पण कुणालाही सवड नाही, कुणालाही आच नाही. आणि त्यांच्या केवळ भौतिक सुखवादाने मला मरगळ वाटते आहे.

एखाद्याला उदात्त मरण देण्याइतका स्वार्थत्याग तरी त्यांनी करू नये काय?

# शतपावली

पृथ्वीचा गोल आपल्या आसाभोवती फिरतो आहे...पृथ्वी सूर्याभोवती फिरते आहे...चंद्र पृथ्वीभोवती फिरतो आहे...आणि हे परिभ्रमण आज शतकानुशतके चालले आहे...

पृथ्वीच्या गोलावर अक्षांशरेखांशाचे पट्टे करकचून आवळले आहेत. तिच्या पोटातील ज्वालामुखी धगधगत आहेत. सागराच्या पोटातील वडवानल रसरसत आहेत. आपल्या मर्यादा ओलांडून धावण्याची कुवत कुणातच नाही. प्रत्येकाचे मन खदखदत आहे!

...पृथ्वीच्या गोलावर माणूस हात मागे बांधून आणि मान खाली घालून शतपावली करतो आहे. धगधगत्या ज्वालामुखींचा शेक घेऊन आणि उसळत्या वडवानलाच्या ज्वाला पिऊन त्याचे चंक्रमण अखंड चाललेले आहे! पाऊस पडून गेल्यावर खळखळाट शांत झाले म्हणजे एखादा दरिद्री खेडूत 'काही गावते का' ते कसे एकाग्रतेने पाहात हिंडतो, तसाच माणूस कित्येक शतके पृथ्वीगोलावर मूकपणे 'काही सापडते का' ते पाहात आहे. त्याचे श्रेय हरपले आहे...ईप्सिताशी झपूर्झा चालला आहे...क्षितिजाचा वेध घेण्याची धडपड सुरू आहे...अक्षांशांत पाय अडखळत आहेत... रेखांशांचे विळखे शरीराभोवती पडत आहेत...अधिकाधिक आवळले जात आहेत! पण तोंडातून शब्द फुटत नाही की नाकातून निःश्वास निघत

नाही. माणूस मूकपणाने शतपावली करीत आहे.

स्फिंक्समधले पिरॅमिडस शांत आहेत...'छळघरां'तील प्रेतांचे खच विकट हसत आहेत...धर्मवेडांची चेष्टिते नवे नवे क्रूस ठोकीत आहेत...भूमी जिंकायला निघालेल्या सेना माणसांची यंत्रे बनवून सहप्रवाशांच्या छाताडावर संगिनी रोखून उभ्या आहेत. मूठभर मारणारे नव्या अस्त्रांच्या फिकिरीत आहेत आणि असंख्य मरणारे पुनःपुनः मरण्यासाठी नव्या भ्रमाकडे डोळे लावून आहेत. धन्याच्या सुरक्षिततेसाठी खिंड लढवणे आता शक्य नाही. दलितांच्या सौख्यासाठी देश बेचिराख करायला सांगत असाल तर गोष्ट वेगळी!

विषुववृत्त तापत आहे. ध्रुवावर जीव गोठत आहे. सागर उधाणले आहेत आणि नद्या खळखळाट करीत वाहात आहेत. सहाऱ्यापासून सागरापर्यंत आणि जंगलापासून डोंगरापर्यंत माणूस मूकपणाने शतपावली करीत आहे!

झोपडीझोपडीतून वीण वाढत आहे. प्रत्येक 'राज'वाड्यातून अणू फुटत आहे. अन्न पैदा करायला सवड नाही. प्रेम आदा करायची निकड नाही. आपण जिवंत राहावे म्हणून इतरांना नष्ट करायचा ध्यास आहे. इतरांचेही तेच म्हणणे आहे. पहिला घाव कोण घालतो पाहायचे आहे. मात्र 'पहिला दगड कुणी मारायचा?' ही विवंचना नाही. सगळेच निष्पाप आहेत मग ती असेलच कशी?

...तो म्हणत होता की, "शेजाऱ्यावर प्रेम करा..." हा म्हणाला होता की, "माझी आठवण करा आणि लढा..." तिकडे तो म्हणाला होता की, "आमच्या कळपात या, नाहीतर मरा." या म्हणण्यांच्या पताका फडफडवून त्यांनी कैक वर्षे व्यापार केला. व्यापार किफायतीत चालला आणि चालतो आहे. मग पुनः एक नवी पेढी उघडली गेली. "आमच्या म्हणण्याप्रमाणेच झाले पाहिजे" अशी आरोळी उठली. आता ज्या पेढीवर अधिक विध्वंसक व नवी शस्त्रे असतील ती इतरांना बाजारपेठेतून उठवील. त्यांचा माल किती काळ खपतो हा पुढचा प्रश्न!

...पृथ्वी गरगरत आहे...चंद्र वेढे काढतो आहे...सूर्य तळपतो आहे ...माणूस फरफटतो आहे...हात मागे बांधून आणि मान खाली घालून

तो शतपावली करतो आहे...'काही गावते का' ते एकाग्रपणे पाहातो आहे...

मंदिरातील घंटा ठणठणत होत्या. मशिदीत 'चिल्ला' गरजत होता. चर्चमधल्या प्रार्थना आक्रोशत होत्या. पण या आवाजीने कान कुठवर बंद होणार? पुनः त्याचा मेंदू डिवचला गेला आणि मंदिर-मसजिद बेचिराख झाली. पुनः त्याची ती एकाकी शतपावली सुरू झाली. ती अजून तशीच चाललेली आहे!

तो जन्मापासून तसा चालतो आहे आणि त्याचे ते चंक्रमण कधी संपणार ते ठाऊक नाही. याचा अर्थ असा नव्हे की, चाल थांबवून त्याने कधी स्थैर्य स्वीकारलेच नाही. प्रथम तो स्थिरच होता. इतका स्थिर की त्याच्या शरीराभोवती मुंग्यांनी प्रचंड वारुळे उभारली होती आणि वारुळातला त्याचा तो निवास त्याला शोभणाराही होता.

वारूळ म्हणजे आत्म्याच्या अंतर्मुखतेची परिसीमा. खोल काळ्याशार डोहात गंभीर चेहऱ्याने डोकावून पाहावे तसे वारुळात पाहाता येते. आपण आपल्यातच पुनःपुनः डोकावणे म्हणजे वारुळवासी होणे. तसा तो प्रथम वारुळस्थच होता. तेव्हा काळ हाही वारुळस्थ होता. काळाची झेप पुढे जात नव्हती. काळडोह खोल खोल होता. पण नंतर काळाला पंख फुटले आणि वारुळातून बाहेर पडलेला तो नद्यांचे तीर पायी तुडवू लागला. नदीतीरावर त्याने सामगायने गाइली. संस्कृतींचे मळे त्या सुपीक मातीत पिकवले. मग वाहात्या नद्या त्याचे सत्त्व ओरबाडून घेऊ लागल्या, तेव्हा त्याच्या पायाला चाक लागले. तो उठला आणि चालू लागला. त्याची ती एकाकी शतपावली सुरू झाली.

तेव्हापासून तो चालतोच आहे. पलिकडच्या रिंगणात राजेरजवाडे धावले, सेनापती लढले आणि सेनानी शेकड्यांनी गारद झाले. प्रथम धर्मग्रंथ काखेत घेऊन तो चालला. नंतर तलवारीच्या धारेवर चालण्याची कसरत त्याने करून पाहिली. आता शास्त्रग्रंथ शिरी मिरवत तो चालतो आहे. पण चालतोच आहे आणि तसाच एकाकी!

...पृथ्वी आपल्या आसाभोवती फिरते आहे...आणि तो आपल्या आशेभोवती गिरमिटतो आहे...पृथ्वीच्या पाठीवरील अक्षांशरेखांशांचे

वेढे आता त्याच्या शरीरावरही उठले आहेत...त्याचे पाय जमिनीवर घट्ट रोवलेले आहेत आणि ते सुटता सुटत नाहीत. आजवर कैक वेळा त्याने वाटेतले डोंगर ठोकरले आहेत. पण डोंगर तसेच उभे आहेत आणि अवखळ ओहळ तसाच खळखळाट करीत आहेत. एक पाय घट्ट रोवून दुसऱ्या पावलाने तो आपल्या कर्तृत्वाइतकी त्रिज्या धरून वर्तुळ काढीत आहे. हीच त्याच्या कर्तुकीची लांबी, रुंदी आणि खोली.

स्वतःला फसवण्याचा खटाटोप त्याने किती करावा? किती तऱ्हेतऱ्हेचे पोशाख त्याने बदलून पाहिले! किती टोप्या, किती वाटा, किती ध्येयवाद आणि किती माकडचेष्टा! अनेकांच्या सुखासाठी एकाने कफनी पत्करून पाहिली तशीच एकाच्या लहरीसाठी अनेकांचे शिरकाण करून पाहिले. पण शेवटी उरलेला आहे फक्त एक तोच. जन्मापासून त्याचा नाद काय तो एकच. दुसऱ्यांचे खिसे रिकामे करून स्वतःचे भरायचे. खिसे भरल्यावर तिजोऱ्या भरायच्या. तिजोऱ्या भरल्यावर कोठ्या भरायच्या. पण भरत राहायचे. कधी पैशाने, कधी कीर्तीने, कधी उगीचच बड्याबड्या तत्त्वज्ञानाने. ही त्याची वेडी वाटमारी अशीच चालू आहे. एकीकडे तो शतपावली करतो आहे; एकीकडे शतकाच्या मापाने काळ येरझारा मोजतो आहे. दुसरीकडे तो एकाकी हात मागे बांधून चालतोच आहे!

हा आटापिटा कशासाठी? कधी त्याला म्हणे नवे तत्त्वज्ञान निर्माण करायचे असते तर कधी तो नवीन महाकाव्याच्या गाथा लिहू लागतो. लोकांचा संसार सुखाचा व्हावा म्हणून आपला प्रपंच रस्त्यावर मांडून तो बसतो तर कधीकधी तो स्वतःच एकाकी निर्जन गुहेत स्वतःचे नाक मुठीत धरून तासतास बसतो. उकळत्या तेलात पाहून वरच्या फिरत्या माशाचा डोळा फोडणे एकवेळ सोपे असेल, पण आपल्याच भ्रांत चित्तात डोकावून जनसामान्यांच्या सुखसमृद्धीवर अचूक बोट ठेवणे त्याला अवघड झाले आहे. आणि म्हणून पुनः त्याची ती एकाकी शतपावली चालू आहे!

खरी गोष्ट अशी असावी की तो चालतो खरा पण त्याला स्वतःपासून दूर अजून चालता आलेले नाही. त्याची शतपावली त्याच्या भोवतीच चक्रावते आहे. घाण्याच्या बैलाप्रमाणे. अस्मितेच्या केंद्रात एक पाय रोवून दुसऱ्या पायाने अंतिमतेचे टिपण साधायला मारलेली 'भरारी' फक्त त्याच्या अंगणा-

रा. क्र. १७२९७

पुरतीच मर्यादित झाली असल्यास नवल नाही. मग डोळ्यांवर झापडे बांधून रिंगणातील मळलेली पाऊलवाट दृष्टिआड करण्याचा खटाटोप त्याने भलाही करावा !

त्याची चाल सुधारेल अशी आशा करण्यात अर्थ राहिलेला नाही. त्याच्या चंक्रमणास दिशा लाभेल म्हणून कोठवर वाट पाहावी ? जागोजाग रोवलेल्या पहाडपर्वतांच्या खुणा आता हलल्या तर बरे. त्याने चालण्याचा वेग वाढविणे वृथा आहे. वेगाने वाहिले म्हणून ईप्सिताजवळ त्वरेने जाता येते असे नाही. चुकीच्या दिशेने वाटचाल चालू असताना तो कितीही अपरिग्रही झाला म्हणून काय झाले ? शुभ्र दाढीजटा आणि निःसंग कफन-कफन्या या वेशातील नाटक आता जनमनाची पकड घेईनासे झाले आहे. पण म्हणून काय सफेद टोप्यांना धारदार कोन काढून बघाल की काय ? आपल्यातील वासना मेली की नाही याचा पडताळा घेण्यासाठी नग्न लालसेला कवटाळून काय होते ते तपासणे म्हणजेच वासनेला खुराक चारणे ! तिथे ती मरणार तरी कशी ? या साऱ्या शतपावलीत डोक्यावर भरगच भार आहे तो 'मी'चा ! सावलीसारखाच 'मी'चा समंध डोक्यावर मिठी आवळून घट्ट बसला आहे, तिथे त्याला झिंजाडून दूर जाणे कसे जमणार ?

...उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत जरी शतपावली केली तरी ती फोल आहे. माझ्या दहा-बाय-दहाच्या मकाणापासून ऑफिसपर्यंतच्या शतपावलीतच मला 'ते' गवसायला हवे ! आणि प्रत्येकाला 'ते' त्याच्यापुरते मिळायला हवे. मग म्हणाल की, 'ते' आज मिळतेच आहे. एका अर्थाने खरे आहे. पण आज त्याला जे मिळाले आहे ती फक्त डोळ्यावर बांधायची झापड आहे. आणि प्रत्येकाने झापड घट्ट आवळावी असा हट्ट धरतानाच तो आपली झापड किलकिली करून पाहातो आहे. परिणामतः सगळ्यांच्याच टक्क नजरा एकमेकांना सामोऱ्या जाताहेत आणि त्या डोळ्यांतील भावल्या लज्जित होत आहेत. एकदा लाज सोडली की नरडीचा घोट घेणे सोपे असते...

...पृथ्वी सूर्याभोवती फिरते आहे आणि 'तो' आपल्या आसाभोवती चक्रावतो आहे...डाव्या पावलामागोमाग उजवे पाऊल पुढे पडते म्हणून काही ती पुरोगामी शतपावली ठरत नाही ! 'त्या'च्यातील ससा धावतपळत पुढे जातो आणि मग निवांत जागी झोपतो. 'त्यां'च्यातील कासव त्याला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
नवुक्रम ........ दि. ........
वर्ग ........ नों. दि. ........

गाठून पुढे जाते आणि मग मिस्कील हसते ! ‘त्यां’च्यापासून फार पुढे अंतर तोडल्याचा आनंदही ‘त्या’ला लाभत नाही. मग पुनः पाट्या पुसून नवीन अक्षरे, नवीन अध्याय !

...परवा झोपेत तो बरळला की, “कसेही असो ! माझी शतपावली चालूच राहाणार.” उशाशी बसलेला काळ मला एकीकडे म्हणाला की, “खरे तर ‘तो’ स्थिर उभाच आहे. मी मात्र त्याच्या सभोवती वेढे काढून आता थकलो आहे !”

# शब्द बोलतात...

'शब्द बोलतात' असे म्हटले तर वाचकांना आश्चर्य वाटेल. शब्द बोलण्यासाठीच असतात असे ते म्हणतील. पण आपल्याला वाटते त्यापेक्षा कितीतरी अधिक तीव्रतेने, उत्कटतेने शब्द बोलतात. कधीकधी ते कुजबुजतात, तर कधीकधी तारस्वराने ओरडतात. कधी मंजुळ स्वरावली ते हवेत सोडतात तर कधी त्यांचा आवाज अजिबात ऐकवत नाही.

शब्दकळा ही माणसाची विशिष्ट अवस्था असते. शब्द तेच. प्रत्येकजण त्याच त्या शब्दाला स्वतःचा आकार देतो आणि अर्थ बहाल करतो. हे करताना माणसाची उभी उमर त्या शब्दाद्वारे प्रगट होते. एक शब्द, एखादा शब्दसमुच्चय वा शब्दसंहिता म्हणजे अत्यंत आटोपाने सशब्द झालेले माणसाचे व्यक्तिमत्त्व.

तान्ह्या मुलाला एक शब्द उच्चारण्यास इतका प्रयास पडतो व विलंब लागतो त्याचे कारण हेच असावे. निव्वळ कच्च्या मातीतून तिथे एक संपूर्ण व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. तिथे शब्द बोलतो तेव्हा त्याचा अर्थ पक्का असतो. राउळातून घंटानाद यावा तसा चिमण्या देवदेहातून शब्द फुटतो. साहजिकच अस्तित्वाची सारी पुण्याई तिथे पणास लागलेली असते. एकेक दात जसा प्रयासाने बाहेर पडावा तसा बाळाच्या जाणिवेतून एकक शब्द उमलतो. त्याचा सारा सत्यसौरभ हवेत दरवळत असतो. तो शब्द बोलतो

पण त्यापेक्षा जास्त त्याचा सुगंध अवकाशात रेंगाळतो.

जगाच्या वाटा तुडवलेल्या असल्या की शब्दभांडार पाठीवर जमा होते. मग शब्द तोलून वापरावा लागत नाही. त्याचा अमूकच एक अर्थ आहे असा दावा राहात नाही. ते शब्द बोलतात. पण मासळीबाजारातल्या किंवा सट्टाबाजारातल्या कलकलाटाप्रमाणे त्यांचा फक्त आवाजच गलगा करतो. त्याला अर्थ नसतो; त्याला सौरभ असत नाही. ते केवळ ओठातून वमनाप्रमाणे भडाभड बाहेर पडतात. हातात खुळखुळावून कवड्यांचे दान टाकावे तसे मुखामुखातून ओंजळीने शब्द बाहेर फेकले जातात. भांड्यावर भांडे आपटून नाद यावा तसा त्यांचा फक्त नाद येतो, निनाद येतो.

केवळ शब्द ऐकून माणसाचे उभे व्यक्तित्व डोळ्यांसमोर साकार करता येते. 'सुस्वागतम', 'अलभ्य लाभ, अलभ्य लाभ' असे स्वागतशब्द कानावर आले की, प्रशस्त हाताच्या घवघवीत नमस्कारामागे असणारे मुखमंडल गोरेपान असणार, झुपकेदार सफेत मिशांचे जंजाळ वरच्या ओठावर असणार, बंद गळ्याचा परीटघडी शर्ट अंगात असणार आणि गंधाची टिकली वा निशाणी कपाळपट्टीवर चमकत असणार, हे सांगावे लागत नाही. लोडतक्क्यांच्या पेशवाई बैठकीवर तुम्ही विराजमान व्हाल तेव्हा समोर कळीदार पानांचे पानदान असेल व पिंक टाकण्यासाठी कोपऱ्यात तस्त असेल हे नक्कीच. मग जी बैठक रंगेल तीत 'यंदा', 'सालगुदस्त', 'सांगतो ना पाहा', 'एवंच काय तर' असे शब्द येतील व ते त्या दोन व्यक्तींहून कितीतरी जास्त बोलून जातील.

'आधी शब्द की आधी विचार' हा एक 'आधी कोंबडी की आधी अंडे' असाच वांझोटा सवाल आहे. प्रसूतीच्या वेणा व त्या वेणा सशब्द करणारा उसासा, हुंकार, निःश्वास यात प्रमाणभेद आहे. प्रकारभेद नाही. म्हणूनच डोळे बोलतात तितके शब्द बोलत नाहीत; भाव जसे सांगतात तसे भाववाचक शब्द बोलत नाहीत. डोक्यावर केसांचा पांढरा कापूस घेऊन व मानेची 'नन्ना' अव्याहत हलवत ठेवून पणजोबा ओसरीवर तासन तास बसून राहात. ते सगळे पाहात राहात व सगळेच त्यांना हूल देऊन त्यांच्या डोक्यावरून पसार होई. पण अधूनमधून उमटणारा त्यांचा उसासा व 'श्रीहरी, श्रीहरी' हा शब्द धुक्यासारखा वातावरणात गच्च बसून राही. सगळेच तो ऐकून जागच्या जागी सावरून बसत.

माणसांची परस्परांना ओळख पटेनाशी झाली तेव्हाच ते एकमेकांना 'शब्द देऊ' लागले. असे 'दिलेले शब्द' काहीच बोलत नाहीत. ते 'दिलेले' असतात एवढ्यामुळेच त्यांना महत्त्व येते. व म्हणूनच तो शब्द काही सांगो वा न सांगो, 'मी शब्द दिलेला आहे' याचाच माणसाला पुन्हा-पुन्हा उच्चार करावा लागतो.

वपन केलेल्या डोक्यावरून अलवणाचा पदर घेतलेली आजी उणीपुरी तीसपस्तीस वर्षे स्वयंपाकघर, माजघर, देवघर यांतून हिंडत काम करत असायची व मुखाने सारखी हलक्या आवाजात 'रघुपति राघव राजाराम' म्हणत असायची. पुढे तिचे शरीर खारकेसारखे वाळले. तरीपण आपल्या चुणीदार मुखाने ओठ मुलुमुलू हालवत ती 'रघुपति राघव राजाराम' म्हणत होती. तिचे सारे वैधव्य, नाउमेद, कळवळा या तीन शब्दांत सामावले होते. अजूनही माजघरातील जात्यापाशी वा देवघरातील समयीजवळ हाडे नसलेल्या लिबलिबीत मुखातील ती रामधून ऐकू येते. आजी गेली, पार पसार झाली. पण जाताना आम्हांला 'शब्द देऊन' गेली आहे!

वस्त्रप्रावरणांची माणसाला जशी हौस असते तशीच काहीजणांना शब्दांची हौस असते. ते सारखे शब्द गोळा करीत राहातात. समुद्रावर शिंपले गोळा करावेत तसे. आणि आपण प्रयासाने गोळा केलेल्या साऱ्या शब्दांचा आपल्याला उपयोग करता येत नाही याची त्यांना खंत वाटते. अशा माणसांचा विचार शब्दांपलिकडे जातच नाही. या शब्दधनाची उधळपट्टी करण्यात ते कंजुषी करीत नाहीत. शब्दांची रास रचून ते स्वतःच्या आत्म्याला त्याच्याखाली गाडून टाकतात. विचार अर्धाकच्चा असला म्हणजे शब्द उगीचच धुमाकूळ घालतात. एक रिकामटेकडे वादपटू आहेत. अगदीच कच्चे मडके आहे ते. पण त्यांना एकसारखे दिसणारे शब्द गोळा करून ते वापरायचा मोठा षोक आहे. त्यांचा बोलण्याचा झोक असा असतो :

"आजकाल कुटुंबसंस्था मोडकळीस आली आहे. घर म्हणून काही उरलंच नाही." एकजण म्हणाले.

"घर म्हणजे काय ? कशाला घर म्हणता तुम्ही ?" ते गृहस्थ उत्तरले.

"आमची घराची कल्पना सापेक्ष आहे."

"सापेक्ष, आपेक्ष आणि निरापेक्ष असे ते तीन प्रकार आहेत."

आता या शेवटच्या वाक्याला काही अर्थ आहे काय? पण ते गृहस्थ याच उद्योगात असायचे नेहमी. काहीतरी सारखे दिसणारे, सारखे वाजणारे शब्द गोळा करीत असायचे. मग ते अर्थहीन असले तरी त्यांना त्याची पर्वा नसे.

कॅलेंडरातील दिवस आणि डिक्शनरीतले शब्द सारखेच कोरडे असतात! अगदी एकासारखे दुसरे. त्यांना व्यक्तिमत्त्व कसे ते नसतेच. शब्दकोश उघडून शब्दांचा अर्थ पाहाणाऱ्यांना शब्दही कळलेला नसतो आणि अर्थही गवसलेला नसतो. त्यांच्या धडपडीची मला फार दया येते. शब्दकोशात डोकावून शब्दाचा अर्थ कळता तर माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला रंगरूपच आले नसते. माणसाच्या जीवनात डोकावल्याशिवाय शब्दांना अर्थ चिकटत नाही. कारण शब्द—खरे शब्द—ओठातून येत नाहीत; पोटातून येतात. डिक्शन-रीतल्या शब्दांची ओली माती चाकावर रचायची आणि काळाच्या फिरत्या गतीने त्यांना घाट देत राहायचे हा प्रत्येकाचा एक आवडता उद्योग असतो. कुणी काव्याच्या पंक्ती त्यातून कोरून घेतात तर कुणी नाट्य, कथा असल्या स्वरूपाचे शिल्प त्यातून आकारतात. ज्याच्या त्याच्या चाकाचा आकार आणि ते फिरण्याचा वेग, काळाची गती, यावर तो बांधतो त्या शिल्पाचा आकार आणि मनोहारित्व अवलंबून असते. म्हणूनच काहींच्या प्रयत्नातून, मिण-मिणत्या का होईनात, पण पणत्या तयार होतात तर पुष्कळांच्या नशिबी रिकामे घटच येतात. शब्द तेच. माती तीच. तिला आकारणारे जीवन केवळ शब्दमोल असते, म्हणून हा फरक.

शब्द बोलतात. आलिशान कार्यालयातील गुळगुळीत मेजाभोवती टाय आणि टायपिन घालून जेव्हा शब्द गोळा होतात तेव्हा त्यांच्या मुलायम आवाजीची काबुली द्राक्षे ओठावर नाजूक नृत्य करतात. पण अजंठ्याच्या गुहागुहांतून किंवा सह्याद्रीच्या कडेकपारींतून शतशः घुमणारा शब्द प्रतिध्वनीने तुमच्याच कानावर परत येतो तेव्हा तुमच्या अस्तित्वाबद्दल तुम्हांलाच कीव वाटू लागते. काळा फत्तर आणि उभा डोंगर तुमचा शब्द कधीच झेलत नाही. दुप्पट वेगाने, आवाजाने तो परत तुमच्या तोंडावर मारला जातो. माणसाला तुम्ही निरुत्तर करू शकाल; निसर्गाला निरुत्तर करणे 'येरागबाळ्याचे' काम नव्हे. निसर्गाकडे फेकलेला शब्द उफाळून परत आल्यावाचून राहात नाही.

'अक्षरे' आणि 'विचार' यांना सांधणारा दुवा म्हणजे शब्द. किंवा शब्दांचे चारित्र्य ध्यानात ठेवून बोलायचे तर 'अक्षरां'चा कच्चा माल गोळा करायचा आणि 'विचारां'चा पक्का माल साहित्यबाजारी खपवायचा हा धंदा करणारे मधले दलाल म्हणजे 'शब्द'. आणि सगळ्याच दलालांप्रमाणे खोटेपणा, फसवणूक, जाहिरातबाजी इत्यादी विक्रीवैशिष्ट्यांनी 'शब्द' महशूर असतात. अक्षरे पाण्यासारखी असतात; सप्तसुरांसारखी असतात. ती अंगची चांगली नव्हत आणि वाईटही नव्हत. जो रंग पाण्याला द्याल तो ते घेईल; जी रागिणी सुरावर चढवाल ती ते गातील. तसेच अक्षरांचे. पण अशी निष्पाप अक्षरे वेठीला धरून शब्द आपला कार्यभाग साधतात आणि मग त्यातले पाप तेवढे विचारांच्या माथी मारतात. मला वाटते, म्हणूनच ज्ञानदेवांनी 'अमृतातेहि पैजा जिंके' अशी 'अक्षरे' मिळवीन अशी ईर्षा धरली व ती पार पाडली. 'शब्द' मिळवीन असे ते म्हणाले नाहीत. शब्दांच्या इभ्रतीवर त्यांचा विश्वास नसावा. आणि ते रास्तच होय.

शब्दांना राजकारणाचे फार वेड असते. राजकारणी पुरुषांच्या जिव्हेवर ते नुसते थैमान घालीत असतात. शब्दांच्या सुरावर लोकशाही पोसलेली असते. 'शब्दांचीच कढी, शब्दांचाच भात' अशीच या लोकशाहीवादी पुढाऱ्यांची धारणा असते. असल्या बेछूट राजवटीत 'शब्द' हाच 'परवलीचा शब्द' असतो. एकच शब्द, पण मतदारासमोर त्याचा अर्थ निराळा; राजकीय प्रतिस्पर्ध्यासमोर निराळा आणि पक्षाच्या वरिष्ठांसमोर निराळा. 'क्रांती' हा एकच शब्द घ्या. निवडून येण्यापूर्वी पुढाऱ्याच्या तोंडी त्याचा एक अर्थ असतो. निवडून आल्यानंतर त्याच तोंडी त्याचा अर्थ दुसरा असतो. प्रस्थापित सामाजिक रचना उस्कटून टाकावी म्हणणारी 'क्रांती' निवडून आल्यावर 'आता आम्हांला थोडे राज्य करू द्या' म्हणते. एकच शब्द, पण तो तात्काल टोपी बदलतो.

शब्द बोलतात. नको ते बोलतात. नको तिथे बोलतात. शब्दकळा ही माणसाची एक करुण अवस्था असते. शब्दांना टांग मारून अक्षरापासून विचारापर्यंत जर प्रवास करता आला तर माणसाची मोठी फसगत वाचेल. म्हणूनच शब्दासमोर मी शब्दशः पराभूत आहे.

## शब्दवेध

शेजारच्या सहा महिन्यांच्या मंजुषेने त्या दिवशी मला प्रथमच एक प्रश्न केला, "का ?"

मंजुषा म्हणजे एक मानवी मधमाशी. गोरागोरा रंग, जाईच्या फुला-इतकेसे वजन, काळेभोर डोळ्यांचे दोन मणी आणि मुठीएवढा तो निरागस चेहरा. 'निरागस' हा शब्द मी वापरला खरा पण मला तो टाळायचा होता. केवळ शब्दज्ञान मला होऊ लागले तेव्हापासून मी तो शब्द योजीत आहे. पण मंजुषेचा चेहरा मी पाहिला आणि मला जे दिसले ते 'निरागस' होते. (त्यापूर्वी तसले जे चेहरे मी पाहिले होते त्या साऱ्यांत मी माझ्याच चेहऱ्याचे प्रतिबिंब पाहात होतो.) ही मंजुषा अलिकडे माझ्याकडे वरचेवर येते. अगदी प्रथम जेव्हा ती आली तेव्हा तिने माझ्याकडे फक्त 'परमकारुणिक' नजरेने पाहिले. तिच्या त्या दृष्टीने मी आत हादरलो होतो. पण परवा मात्र थोडे माकडी चाळे करून आणि खुळे शब्द राबवून मी तिला खेळवण्याचा आव आणला होता. त्या दिवशी मला जरा वेळ खेळवून ती निघून गेली. नंतर पुन्हा ती आली तेव्हा तिला घेण्यासाठी मी प्रेमाने हात पसरून पुढे धावलो; पण ती एकदम मान वळवून आपल्या वडिलांच्या खांद्यावर विसावली.

आणि आज जेव्हा तिला पादाक्रांत करून मी घेऊनच आलो तेव्हा तिने माझ्याकडे पाहून फक्त एकच शब्द उच्चारला, "का ?"

'एकः शब्दः सम्यक् ज्ञातः स्वर्गे लोके कामधुक् भवति' असे एक आप्तवचन आहे. प्रथमप्रथम मला ते भंपक वाटत असे. कारण, असली सकृद्दर्शनी भंपक वाटणारी वचने वेद आणि उपनिषदे यात इतस्ततः पसरलेली आहेत, त्यांतलेच हे एक आहे असे मला वाटे. एकही शब्द नीटपणे समजला तर म्हणे माणसाला मोक्ष मिळतो. शब्दाला इतके महत्त्व असते काय? आणि नीटपणे तो समजायचा म्हणजे तरी काय? मला ते समजत नव्हते. अनेक दिवस माझ्या मनात धुमाकूळ चालू होता आणि म्हणून त्या आप्तवाक्याची मी मनोमन टर उडवीत होतो.

पण एक दिवस अचानक शब्द 'उमलला' आणि मला अर्थाचा परिमल आला. त्या शब्दसौरभाने मी भांबावून गेलो. सारखे वाटू लागले की, आजवर इतके शब्द मी ऐकत असताना आजच हे असे काय होत आहे? मन चक्रावून गेले होते ते ठिकाणावर म्हणून येईना. मंजुषेने 'का' हा शब्द चांगल्या तऱ्हेने जाणला असावा. मतमतांतरांच्या गलबल्यात ताज्या फुलासारखा तिचा मेंदू अजून लडबडला नसल्याने तिने एक अगदी साधाच प्रश्न केला : "का?"

पण त्या शब्दाची धार, त्याचे प्रयोजन आणि त्याचा सहजाविष्कार पाहून मी फार फार गडबडलो. अगदी चीत झालो. मान खाली घालून तसाच बसून राहिलो. आणि लगेच आपल्या मुठीचे घणाघात मंजुषेने माझ्या मस्तकावर करण्यास सुरवात केली.

भांड्यावर भांडे आपटून त्याचा दुप्पट निनाद येतो. तसा बनेलांना बनेलांनी केलेल्या प्रश्नांचा निनाद येतो. दोघेही काय समजायचे ते नीट समजतात. किंबहुना ऐकू येणाऱ्या प्रश्नांच्या शब्दाला आतल्या बाजूने जी एक नाजूक झालर असते तिचे टोक पकडून, ध्वनित झालेल्या प्रश्नाला बगल देऊन, उत्तर देणारा पुष्कळच काही समजू शकतो. खालील संवाद तपासून पाहा.

"काय हो, शंकरराव? अहो, आहात कुठं? हल्ली किती दिवसांत भेटच नाही की हो!" असा प्रश्न माना मुरडून पायघोळ तळमळीने रामराव जेव्हा करतात तेव्हा त्यांना "कशाला ही ब्याद आडवी आली?" इतकेच म्हणायचे असते. आणि शंकरराव ते ओळखतातही. म्हणूनच ते जेव्हा त्यांना उत्तर देतात की, "अहो, तुम्ही कामाची माणसं. तुमची भेट होणं

सोपं आहे कुठं?" तेव्हा खरे उत्तर फक्त "अरे चोरा!" इतकेच असते.

प्रौढांचा हा वाग्विलास सवयीने एकमेकांना सहज समजतो. कारण सगळे एकाच माळेचे मणी असतात. आणि म्हणून त्यांची परस्परांना भीतीही वाटत नाही. 'ते तो प्रचीतीचे बोलणे'! पण सहा महिन्यांची एखादी मधमाशी जेव्हा तुम्हांला विचारते, "का?" तेव्हा तिथे सारे प्रौढ शहाणपण फोल ठरते.

परवा तिचा तो प्रश्न ऐकल्याबरोबर पुरातन शब्दवेध्यांची आठवण माझ्या मनात उफाळून आली. ओळखीचा स्वर कानी आला की त्या दिशेला बाण सोडून अचूक लक्ष्य वेधण्याची कला, शब्दांचा चिमूटभर अर्थही ज्यांना समजलेला नसतो ते प्रौढ नावाजतात. वास्तविक नावाजण्यासारखे त्या कलेत काही नाही. तुम्हांला 'शब्द' नीटपणे समजला तर तुम्ही सहजपणे त्याचा वेध घेऊ शकता. 'शब्द' कळायला मात्र हवा. अतीव यशप्राप्तीबद्दल जेव्हा तुम्ही दुसऱ्याचे घवघवीत अभिनंदन करायला धावता तेव्हा तुमचे 'शब्द' तुम्हांला नीट कळलेले असतात असे म्हणणे धाष्टर्याचे होईल. सत्तेच्या प्रांगणात तर शब्द आणि शब्दवेधी यांची एकच धमाल चाललेली असते. राज्याचे पंतप्रधान अचानक आजारी झाले तर सभोवतालच्या माणसांच्या शब्दांना, त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेप्रमाणे, निरनिराळा अर्थ येतो. तो समजायला मनाला राजकीय डोळे असावे लागतात. कानावर त्यातला ओळखीचा शब्द आला रे आला की, लगेच शब्दवेध करून ईप्सिताचे फळ टपकन पदरात पाडून घ्यावे लागते आणि सुज्ञ ते घेतातही.

'शहाण्याला शब्दांचा मार' म्हटलेले आहे. पण हे म्हणणे अपुरे आहे. खरे शहाणे शब्दवेध घेऊन मूर्खांना निकालात काढू शकतात. शब्द मात्र सम्यकतेने समजायला हवेत. दोन दिवसांमागे गोपाळराव माझ्याकडे आले. त्यांचा पुतण्या परीक्षा चांगल्या तऱ्हेने पास झाला होता आणि ज्या विद्यापीठात माझे वजन होते तिथे एखादी बऱ्यापैकी नोकरी त्याला माझ्यातर्फे मिळणे शक्य होते.

"नमस्कार मंगेशजी! अहो, अजून सात वाजले नाहीत तोच कामाला सुरवात अं? कमाल आहे बुवा!" गोपाळराव म्हणाले.

"छे हो, कसलं, कसलं?" मी उत्तरलो. (मनातून मी खुललेला असतोच. गोपाळराव तसे न म्हणते तर मी रुष्टही झालो असतो.)

"रमेश बी० एस्सी० झाला, पहिला आला—" ते.

"हो का? अरे मग पेढेबिढे?" मी. ('हल्ली काय, जो तो पहिला वर्ग अन पहिला नंबर यातच येतो. आमच्या वेळी असं नव्हतं' हे मनात.)

"पुढं काय सुचवता तुम्ही?"

"विचार करायला पाहिजे."

"त्याचा विचार तुमच्या विद्यापीठात काम करावं असा आहे. मला म्हणाला की, मी तुम्हांला सांगून पाहावं. मी साफ सांगितलं, बाबा रे, मंगेशजी म्हणजे अगदी सरळ गृहस्थ. तिथं वशिलेबाजी आणि लाडीगोडी मुळीच चालणार नाही. भलत्या माणसाजवळ भलताच विषय काढू नकोस." ते म्हणाले.

"तेही खरंच. हल्ली जिकडेतिकडे हेच चाललंय. मी मात्र त्यापासून अगदी दूर आहे."

"तेच म्हटलं मी त्याला."

"तसा पाहीन मी प्रयत्न करून. पण हल्ली ते फार बिकट होऊन बसलंय बघा..." मी समारोप केला.

रेसच्या मैदानात बाहेरच्या वर्तुळातून जेव्हा घोडे चौखूर धावत असतात तेव्हा आतल्या वर्तुळातून एक मोटार त्यांवर लक्ष केंद्रित करून धावत असते. त्याचप्रमाणे दोन व्यक्तींच्या संभाषणाबरोबरच त्यातील प्रत्येक शब्दावर नजर रोवून एकमेकांची मने समांतर धावत असतात. शब्द नीटपणे समजले, त्यांचे सम्यग्ज्ञान झाले की अशा वेळी स्वर्गसुख आपाततःच त्यांना गवसते आणि मोक्ष मिळतो.

व्यवहाराच्या मळलेल्या पाऊलवाटेने तुम्ही आयुष्य राबवीत निघाला की शब्द पटापट समजू शकतात. चार पावसाळे जास्त पाहिलेले असतील तर शब्द भिजून दमट झाल्यासारखे वाटतात. पण तरीही ते समजून यायला वेळ लागत नाही. चाणाक्षपणाने शब्दवेध करीत त्या मार्गावर पावले टाकीत निघालात तर यश दूर नसते!

पण पट्टीच्या शब्दवेध्यालाही गोंधळात पाडणारा शब्द मंजुषेसारख्या मधमाशीलाच बोलता येतो. तिथे शब्दावाचूनच शब्दांच्या पलिकडले कितीतरी कळते. मग तुम्ही भांबावून जाता. बेरकी शब्दज्ञानाला तोंड देणे सोपे असते.

सोपं आहे कुठं ?" तेव्हा खरे उत्तर फक्त "अरे चोरा!" इतकेच असते.

प्रौढांचा हा वाग्विलास सवयीने एकमेकांना सहज समजतो. कारण सगळे एकाच माळेचे मणी असतात. आणि म्हणून त्यांची परस्परांना भीतीही वाटत नाही. 'ते तो प्रचीतीचे बोलणे'! पण सहा महिन्यांची एखादी मधमाशी जेव्हा तुम्हांला विचारते, "का?" तेव्हा तिथे सारे प्रौढ शहाणपण फोल ठरते.

परवा तिचा तो प्रश्न ऐकल्याबरोबर पुरातन शब्दवेध्यांची आठवण माझ्या मनात उफाळून आली. ओळखीचा स्वर कानी आला की त्या दिशेला बाण सोडून अचूक लक्ष्य वेधण्याची कला, शब्दांचा चिमूटभर अर्थही ज्यांना समजलेला नसतो ते प्रौढ नावाजतात. वास्तविक नावाजण्यासारखे त्या कलेत काही नाही. तुम्हांला 'शब्द' नीटपणे समजला तर तुम्ही सहजपणे त्याचा वेध घेऊ शकता. 'शब्द' कळायला मात्र हवा. अतीव यशप्राप्तीबद्दल जेव्हा तुम्ही दुसऱ्याचे ववघवीत अभिनंदन करायला धावता तेव्हा तुमचे 'शब्द' तुम्हांला नीट कळलेले असतात असे म्हणणे धाष्ट्याचे होईल. सत्तेच्या प्रांगणात तर शब्द आणि शब्दवेधी यांची एकच धमाल चाललेली असते. राज्याचे पंतप्रधान अचानक आजारी झाले तर सभोवतालच्या माणसांच्या शब्दांना, त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेप्रमाणे, निरनिराळा अर्थ येतो. तो समजायला मनाला राजकीय डोळे असावे लागतात. कानावर त्यातला ओळखीचा शब्द आला रे आला की, लगेच शब्दवेध करून ईप्सिताचे फळ टपकन पदरात पाडून घ्यावे लागते आणि सुज्ञ ते घेतातही.

'शहाण्याला शब्दांचा मार' म्हटलेले आहे. पण हे म्हणणे अपुरे आहे. खरे शहाणे शब्दवेध घेऊन मूर्खांना निकालात काढू शकतात. शब्द मात्र सम्यकतेने समजायला हवेत. दोन दिवसांमागे गोपाळराव माझ्याकडे आले. त्यांचा पुतण्या परीक्षा चांगल्या तऱ्हेने पास झाला होता आणि ज्या विद्यापीठात माझे वजन होते तिथे एखादी बऱ्यापैकी नोकरी त्याला माझ्यातर्फे मिळणे शक्य होते.

"नमस्कार मंगेशजी! अहो, अजून सात वाजले नाहीत तोच कामाला सुरवात अं? कमाल आहे बुवा!" गोपाळराव म्हणाले.

"छे हो, कसलं, कसलं!" मी उत्तरलो. (मनातून मी खुललेला असतोच. गोपाळराव तसे न म्हणते तर मी रुष्टही झालो असतो.)

"रमेश बी० एस्सी० झाला, पहिला आला—" ते.

"हो का? अरे मग पेढेबिढे?" मी. ('हल्ली काय, जो तो पहिला वर्ग अन पहिला नंबर यातच येतो. आमच्या वेळी असं नव्हतं' हे मनात.)

"पुढं काय सुचवता तुम्ही?"

"विचार करायला पाहिजे."

"त्याचा विचार तुमच्या विद्यापीठात काम करावं असा आहे. मला म्हणाला की, मी तुम्हांला सांगून पाहावं. मी साफ सांगितलं, बाबा रे, मंगेशजी म्हणजे अगदी सरळ गृहस्थ. तिथं वशिलेबाजी आणि लाडीगोडी मुळीच चालणार नाही. भलत्या माणसाजवळ भलताच विषय काढू नकोस." ते म्हणाले.

"तेही खरंच. हल्ली जिकडेतिकडे हेच चाललंय. मी मात्र त्यापासून अगदी दूर आहे."

"तेच म्हटलं मी त्याला."

"तसा पाहीन मी प्रयत्न करून. पण हल्ली ते फार बिकट होऊन बसलंय बघा..." मी समारोप केला.

रेसच्या मैदानात बाहेरच्या वर्तुळातून जेव्हा घोडे चौखूर धावत असतात तेव्हा आतल्या वर्तुळातून एक मोटार त्यांवर लक्ष केंद्रित करून धावत असते. त्याचप्रमाणे दोन व्यक्तींच्या संभाषणाबरोबरच त्यातील प्रत्येक शब्दावर नजर रोवून एकमेकांची मने समांतर धावत असतात. शब्द नीटपणे समजले, त्यांचे सम्यग्ज्ञान झाले की अशा वेळी स्वर्गसुख आपाततःच त्यांना गवसते आणि मोक्ष मिळतो.

व्यवहाराच्या मळलेल्या पाऊलवाटेने तुम्ही आयुष्य रावबीत निघाला की शब्द पटापट समजू शकतात. चार पावसाळे जास्त पाहिलेले असतील तर शब्द भिजून दमट झाल्यासारखे वाटतात. पण तरीही ते समजून यायला वेळ लागत नाही. चाणाक्षपणाने शब्दवेध करीत त्या मार्गावर पावले टाकीत निघालात तर यश दूर नसते!

पण पट्टीच्या शब्दवेध्यालाही गोंधळात पाडणारा शब्द मंजुषेसारख्या मधमाशीलाच बोलता येतो. तिथे शब्दावाचूनच शब्दांच्या पलिकडले कितीतरी कळते. मग तुम्ही भांबावून जाता. बेरकी शब्दज्ञानाला तोंड देणे सोपे असते.

पण मंजुषेच्या दृष्टीला दृष्टी देता येत नाही. तिच्या नेत्रमध्यातून निघणारे सरळ बाण उरी घुसतात आणि मग ज्ञात शब्दांची लक्तरे लोंबू लागतात. तिने हे जाणले आहे. म्हणूनच व्यावहारिक शहाणपणाचे अघळपघळ शब्दभांडार तुमच्यावर न उधळता ती शब्दांच्या गाभ्यालाच हात घालते आणि फक्त विचारते, "का?" एकच अक्षर, एकच शब्द; पण त्याचा वेध घेता येत नाही. तिच्या त्या प्रणवोच्चारात माझे शब्दज्ञान गटंगळ्या खाते.

या अनुभवाला इतिहासाचा आधार आहे. 'भावबंधना'तला धुंडिराज घ्या. तो शब्दसृष्टीचा परमेश्वर स्वतःच उभ्या केलेल्या शब्दांच्या डोंगराखाली पार चेंगरून गेला होता. त्याला थोडे जरी शब्दवेधाचे ज्ञान असते तरी घनःश्यामाचा कठोर कावा वेळीच उमगला असता. पण शब्दांच्या ढिगाऱ्याखाली त्याने स्वतःला गळ्यापर्यंत गाडून घेतले आणि मग घनःश्यामाच्या काळ्या कृत्याला तो असहायपणे बळी पडला. म्हणून वावदूकांच्या शब्दवर्षावाला मी भीत नाही पण मंजुषेच्या एकाक्षरी शब्दाला फार भितो. माझा सारा अभिमान आणि शहाणपण तिथे संपते. मी हतबल होतो.

पण दारुण पतितावस्थेतूनच जसा माणूस पुन्हा उभा राहातो तसा मीही सावरलो. अचानक परवा मला मंजुषेला तोंड देण्याची युक्ती सापडली. ती आली आणि यक्षासारखा तिने मला तो आदिप्रश्न केला, "का?"

काय आश्चर्य! कोणत्या सुप्त ज्ञानभांडारातून मला एकदम शहाणपण आले कोण जाणे. मी तिला तितक्याच ठसक्यात उत्तर दिले, "का?"

"का?" ती.

"का?" मी.

"का?"

"का?"

"का?"

मला शब्दवेध करता आला. शब्दांचे मानवी अर्थ मंजुषेला नीटपणे कळू लागेपर्यंत आता मी तिच्या 'का'ला केवळ 'का'नेच उत्तर देणार!

कारण अखेर मी तिच्यापेक्षा चार पावसाळे जास्त काढलेच आहेत ना?

## मिळाली तर दया, खपली तर माया, पचली तर चोरी !

सकाळी उठल्याबरोबर पहिल्यांदा कानावर काय पडत असेल तर "अन्य वाढाऽऽ हो बाईऽऽ" या रागदारीतून बाहेर पडणारे एक समूहगीत !

शहरी संस्कृतीचे जे विशेष असतात त्यात अत्यंत सुसंघटित व मोठ्या प्रमाणावर चालणारा भीक मागण्याचा धंदा मुख्यतः विचारात घ्यावा लागतो. सकाळी उठल्याबरोबर खेडोपाडी कानावर पडतात त्या जात्यावरच्या ओव्या, पाखरांचा मुग्ध किलबिलाट किंवा अमर भूपाळ्या. (पाहा : 'बालवाचन', पुस्तक पहिले.) शहरात आणि विशेषतः मुंबईसारख्या बकाल शहरात असले काही आढळत नाही. उत्तुंग इमारती माध्यान्हीपर्यंत सूर्यकिरण मुळी तुमच्यापर्यंत पोचूच देत नाहीत. पाखरांचा किलबिलाट ऐकू यावा तर ती बहुधा भल्या पहाटे मुंबईत जागीच होत नसावीत. इथे अमर भूपाळ्या गातात लोकलच्या गाड्या आणि गिरण्यांचे भोंगे. पण तरीही 'सकाळ'चे भिकारी आपल्या ड्यूटीवर हजर झाले म्हणजे "अन्यऽऽ वाढाऽऽ हो बाईऽऽ" या त्यांच्या सुरेल व लयबद्ध 'कोरसा'ने तुम्हांला जाग येते हे नाकबूल करून चालणार नाही.

शहरात सकाळचे भिकारी, दुपारचे भिकारी, संध्याकाळचे भिकारी अशा व्यवस्थित शिफ्ट्स असतात. शिवाय वयानुरूप, शिक्षणानुरूप (भिकाऱ्यांच्या

प्रशिक्षणाची पद्धतशीर सोय असते आणि तिचा तपशील अंगावर काटा आणणारा असतो.) कार्यक्षमतेप्रमाणे त्यांची वर्गवारी केलेली असते. भांडवलदारी पद्धतीची इतकी सुव्यवस्थित संघटना अन्य दुसऱ्या क्षेत्रात अजून दिसायची आहे. किंवा असे म्हटले तर ते फारसे वावगे ठरणार नाही की, आर्थिकदृष्ट्या अर्धविकसित देशात भिकाऱ्यांची संघटना, धंदा व मिळकत इतकी प्रगत असते की पुढारलेल्या देशांनी त्याच्यापासून कित्ता घ्यावा! पण ते असो. शहरी संस्कृतीच्या अंगोपांगांचा विचार करताना आपणांस इतके खोलात शिरण्याचे कारण नाही.

मी सांगत होतो ते त्यांच्या त्या सकाळच्या सुरेल 'कोरसा'बद्दल. एका मागोमाग एक भिकारीण असा काही स्वच्छ सूर लावते आणि असा काही दर्द आपल्या आवाजीत भरते की अंथरुणावर डोळे चोळीत असतानाच त्या तानफिरतीने अंगावर सरसरून काटा यावा. आणि तो येतोच. एखाद्या राष्ट्राचे जसे राष्ट्रगीत असते तसेच एखाद्या अर्थव्यवस्थेचे हे द्योतक-गीत किंवा बोध-गीत समजायला हरकत नाही. एकसाथ, दमदारपणे व उग्र उत्साहाने "अन्य वाढा हो बाई" असा वेदघोष सुरू झाला म्हणजे मनात वाटते की, 'धन्य हो तुम्ही आर्य स्त्रियांनो. पांढरपेशांच्या पोशाखी संस्कृतीवर इतक्या सुरेलपणे शेणसडा ओतणे दुसऱ्या कोणालाच जमणे शक्य नाही!'

त्या तानेत तोंड वेंगाडून भीक मागण्याची संपूर्ण कला अनुस्यूत असते. आपल्या दारिद्र्याची जाहिरात असते आणि गरजेची तीव्रता पटवण्याची पराकाष्ठा असते. आणि हाती घेतलेले कार्य पार पाडण्यासाठी लागणारा अदम्य उत्साह व चिकाटीही असते. नसते ती फक्त आर्ततेची भावना. भावहीन भजन म्हणावे तसे ते आर्तहीन, कर्णकटू गान असते. आणि म्हणूनच तुमच्या दयेला हाक घालण्याचे सामर्थ्य त्या ओरड्यात मुळीच नसल्याने त्या संगीत भिकाऱ्यांना धोंडे मारून पिटाळून लावावे असा वैताग ते गाणे ऐकून मनात येतो.

बराच वेळ तानपलटे घेऊनही जेव्हा कोणी 'अन्य' वाढत नाही तेव्हा ती भिकारीण जायला निघते आणि जाताना एखादा चमत्कार करावा तसा अजिबात निराळा आवाज काढून ठाणकन ललकारी देते, "घे सुपे, टोपल्या ऽऽ."

परवा मी भिकारणींच्या अन्नप्राप्तीबद्दलच्या त्या कर्णकटू ओरड्याने वैतागून काही करणार इतक्यात त्यांची ती 'घे सुपे, टोपल्या'ची ललकारी माझ्या कानावर आदळली आणि मी एकदम चमकलोच.

पट्टीच्या नटालाही जो आवाज-बदल सहज साधला नसता तो तिने किती सहजपणे आणि आत्मविश्वासाने साधला होता. एका क्षणात भिकारणीतून विक्रेती जन्माला आली होती. याचना संपून आव्हान निर्माण झाले होते!

आवाजातून आवाज काढण्याचे माणसाचे हे कसब त्याच्या रक्तातच असते. आतला आवाज आणि बाहेरचा आवाज हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे दोन स्वतंत्र भाग असतात. बाहेरच्या आवाजाने व्यवहारात वल्ही मारत आपले होडगे तो हाकारतो तेव्हाच आतल्या आवाजाने तो परिस्थितीवर अवाक टीका करीत असतो आणि आपल्याला अनुकूल क्षण आल्याबरोबर आतला आवाज तो उंच उठवतो. पण आतला आवाज केव्हा बाहेर उमटाव-याचा त्याचे गणित कुशाग्र बुद्धीलाच कळू शकते. ते येरागबाळाचे काम नोहे!

दुसऱ्याच्या दयेला केलेले आवाहन आणि आपली चीजवस्तू विकली जावी म्हणून करायचे आव्हान यातले सूक्ष्म तारतम्य यःकश्चित भिकारीणही जाणत असते. पण वास्तविक त्यात आश्चर्य वाटावे असे काय आहे? एका अर्थाने प्रत्येकाला हे नाटक करावेच लागते. आणि ते पार पाडताना प्रत्येक जण नटसम्राट बनतच असतो.

केवळ आवाजातला बदल किंवा अभिनयकुशलता एवढ्याच अंगांनी मला ह्या भिकारणींच्या प्रभातफेरीचे वैशिष्ट्य सांगायचे नाही. बर्कने अमेरिकन क्रांतीच्या निमित्ताने पार्लमेंटात जे भाषण केले त्यात साम, दाम, दंड, भेदाच्या अनुक्रमावर फार रास्त टीका केली होती असे आपण वाचतो. दंडाचा प्रयोग अगदी अखेर व्हायला हवा असा बर्कचा योग्य सल्ला होता. सारे उपाय थकल्यावर दंड वापरता येतो, पण आधीच दंड वापरला व तो असफल झाला तर पुनः साम-दामाकडे वळता येत नाही, हा बर्कचा संदेश मानवी स्वभावावर आधारलेला आहे हे खरे. पण बर्कला हे सांगण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटचे व्यासपीठ लागले आणि तिकडे त्या अमेरिकेत राज्यक्रांती व्हावी लागली. महाजनांचे हे भाष्य न वाचता किंवा त्याची ऐकीव माहितीही नसताना आमचा याचकसमाज ते तंतोतंत आचरीत असतो हे कोणी कसे

पाहात नाही ? भिकाऱ्यांचा तांडा घराच्या आवारात शिरताना प्रथम दारुण याचनेचे सारवण चेहऱ्यावर फासून अन्नाची भीक मागतो. भीक मिळाली तरी वाहावा, न मिळाली तरी वाहावा, या थाटात दहापाच मिनिटे ओरड-ल्यावर एकदम आवाज बदलून आपल्याजवळचा माल विकणारा तो विक्रे-त्यांचा तांडा होतो. या रूपांतरात त्यांचा नवा दिमाख काय वर्णावा ? आंतर-राष्ट्रीय बाजारपेठेत मोलाचे चलन बाळगणारी राष्ट्रे आपल्या मालाबद्दल असा दिमाख एक वेळ दाखवणार नाहीत. पण भिकाऱ्यांची ही सेना आपल्याजवळच्या सुपे-टोपल्या म्हणजे साक्षात अमृत आहे अशा थाटात त्या विकतात. आता तुम्ही त्या मालाच्या दर्जाबद्दल जपून टीका करायला हवी. आता तुम्ही भिकाऱ्यापेक्षा एक पायरी खाली उभे आहात. 'घ्यायची तर घ्या, नाहीतर चालू लागा' हा नियम आता तुम्हांला लागू झाला. आणि अन्न मागणारी भिकारीण दारातून हाकलून द्यायचा हक्क तुम्हांला असेल पण स्वकष्टार्जित माल लोकशाही पद्धतीने खपवू इच्छिणारी विक्रेती दारची हाकलणे तुमच्या शक्तिबाहेरचे काम आहे.

असा विचार करीत असतानाच माझ्या मनात याचकांची एक दुसरीच सेना गर्दी करू लागली आणि ती पाहात असताना माझ्या ध्यानात येऊन चुकले की, अखेर सगळे लोक याचक किंवा विक्रेते या सदरातच मोडण्या-सारखे आहेत. राजकीय जगात काय दिसते आपल्याला ? तो कोण तो मानवी राक्षस म्हणायचा ना की, "जनसामान्यांना फसवणे फार सोपे आहे. त्या फसवणुकीला मर्यादा नाही." खरे तर माणसाच्या स्वतःला स्वतःच फसवण्याच्या सामर्थ्याला मर्यादा नाही. या लोकशाहीच्या जमान्यात एखाद्या राजकीय पक्षाच्या सफेद गणवेषाला साजेसे अघळपघळ हास्य तोंडावर पांघरून लोक जेव्हा ज्येष्ठांच्या अंगणात गर्दी करतात व आपणाला अधिकारस्थानासाठी तिकीट मिळावे असे म्हणतात तेव्हा त्यांच्या तोंडावर 'अन्य वाढा हो माई'चीच अवकळा असते. बराच काळ हाका घालून (त्या हाका मात्र आर्त असतात हं !) काही उपयोग होत नाही असे दिसताच तीच याचकमंडळी उलटी फिरतात आणि अंगच्या मग्रूरीने आव्हानाची भाषा बोलू लागतात. आता ते बाजारात उभे असतात आणि त्यांच्या खिशात मोहोरबंद असलेली ठोक मते हा त्यांचा अमृततुल्य विकाऊ माल असतो.

जो जास्त किंमत देईल त्याला आपल्या खिशातील मतासह स्वतःस विकण्याची त्यांची तयारी असते. हे नाणे वाजणारे असते. आणि तिकीट मागणारा पक्षनिष्ठ याचक जेव्हा मतांचा विक्रेता बनतो तेव्हा आपल्या अंगणातून त्याला हुसकावून लावणे राजकीय मुत्सद्याला सोईचे असत नाही!

आणि कोणत्याही लहानसहान वैफल्याच्या किंवा असमाधानाच्या अवस्थेचे मूळ आजच्या राजकीय क्षेत्रात शोधण्याच्या सवयीमुळे जरी मला तात्काल राजकारण आठवले तरी क्षणभराने विचार करता वाटले की, राजकारणच कशाला, आपल्या दैनंदिन जीवनात आपण काय कमी याचक आणि विक्रेते आहोत? व्यवसायाच्या जगात प्रत्यही हेच घडत असते. वरिष्ठाशी वागताना 'अन्न वाढा हो माई'चा आपला आर्त आवाज कनिष्ठाशी वागताना कसा हातोहात (की तोंडातोंड?) बदलतो! कारण कनिष्ठाला आपल्याजवळ नसलेले ज्ञान किंवा शहाणपण विकण्याचा प्रश्न असतो. 'मिळाली तर दया, खपले तर शहाणपण' असाच जीवनाचा सोपा अर्थ असतो. किंवा तसा तो सोपा करणे आपल्या सोईचे असते.

...पण परवा सकाळी हे जीवितभाष्य मी मनाशी अजमावत असतानाच एक चमत्कार झाला. याचकांचा तांडा प्रथम दयेची भीक मागून व नंतर विक्रेत्याची भूमिका उठवून थकला तरी कोणी त्यांची दखल घेईना, तेव्हा जाताना त्यातील एकाने पटकन दारातील सायकल उचलली आणि पाहाता पाहाता तो पसार झाला!

# अखेर सारी सौदेबाजी

लहर हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण असते असे म्हटले तरी माणसाने किती लहरीपणा करावा याला काही मर्यादा ? किंबहुना आळसालाच लहर असे गोंडस नाव देण्यात आले आहे की काय समजत नाही. 'शब्दात काय आहे' असे आपण खुशाल म्हणावे. पण शब्दात फार काही असते हे नाकबूल करता येत नाही. 'आळशी आहेस' असे एखाद्याला म्हणा आणि त्याच्या नाकाचा शेंडा कसा लाल होतो पाहा. पण 'तुम्ही फारच लहरी बुवा' असे त्याच महाभागाला सांगा आणि एक प्रकारच्या सार्थ अभिमानाने लज्जित होत्साता झालेल्या त्याच्या गालावर कशी गुलाबी चढते ते पाहा. 'आळस' आणि 'लहर' यांच्या पोटातला आशय एकच. पण आळसापेक्षा लहरीपणा अभिमानाचा वाटतो. (त्याहूनही अधिक बरे वाटणारे विशेषण म्हणजे 'मूडी'!) दाढी थोडी वाढली आहे. झब्ब्याच्या गुंड्या उसकटल्या आहेत, केसांची दशदिशांना दाणादाण झाली आहे, चपलेचा आंगठा तुटला आहे—अशा प्रकृतिविशेषाला आपण 'मवाली' म्हणतो. कुणीही तेच म्हणेल. पण नाही. त्या मवाल्यासही आपणाला 'कलंदर' म्हणवून घेणे फार आवडते. शब्दाशब्दांतून प्रगट होणारा अर्थ वेगळा असतो. आणि त्या वेगळ्या अर्थाचे स्वरूप जाणून न घेता उगीच सरधोपटपणे शब्द वापरू गेले तर पश्चात्ताप करायची पाळी आल्यावाचून राहात नाही.

सांगत काय होतो की, आळसापेक्षा लहर पत्करते. पण लहरी झाले तरी त्याला काही मर्यादा असू नये काय ? किंवा लहरीपणा एखादा दिवस तरी अंगावेगळा करण्याची लहर का बरे येऊ नये ? अगदी जरुरीचे जरी पत्र लिहायचे असले तरी हाताशी कार्डे-पाकिटे नसायची. आज पोस्टात पत्र टाकायचेच असे नक्की झाले (म्हणजे त्यावाचून गत्यंतरच उरले नाही) की मग कार्डांची खरेदी व्हायची. कुठे ? पोस्टात ? छे छे, हजार हिश्यांनी मी कार्डे-तिकिटे पानपट्टीवाल्याकडे किंवा इराण्याकडे घेतो. कारण पोष्ट आमच्या ऑफिसच्या वाटेवर कधी येत नाही. प्रत्येक वेळी मी या वस्तूंना त्यांच्या रास्त किंमतीऐवजी चारदोन पैसे जास्त देतो; पण तरीही बरीचशी कार्डे-पाकिटे पोस्टातून आणून साठवायची शिस्त लागत नाही. बरे, पत्रे लिहिल्यावर त्यावर तिकिटे लावताना रीतसर वजन करून योग्य तितकीच तिकिटे लावतो म्हणता काय ? मुळीच नाही. वजनासाठी पोस्टात जाणे होत नसल्याने अंदाजाने तिकिटे ठरवायची आणि नॉटपेड होऊ नये म्हणून दहापाच पैशांची अधिक तिकिटे लावायची हा शिरस्ता. म्हणजे एका कार्डाला सात पैसे तसे एका पाकिटाला वीस पैसे गायब. पण वर्षानुवर्षे हे असेच चाललेय. पुनः लिहिलेले पाकीट रोजच्या 'घर ते ऑफिस' या राजमार्गावर पोस्टाचा खांब लागला तरच पोस्टात पडायचे. वाकडी वाट करून ते पोस्टात टाकणे अशक्यच. आमच्या आजवरच्या आयुष्यात पोस्टाने आमचा खिसाभार पुष्कळच हलका केला आहे तो हा असा.

कार्ड-पाकिटांचे ठळक उदाहरण म्हणून मुद्दाम सांगितले. पण प्रत्येक लहानमोठ्या सौद्याच्या मुळाशी हे असलेच चमत्कारिक अर्थशास्त्र असते. भाजी, सामान, स्टेशनरी, कापड यांच्या खरेदीसाठी मनाचे व्यापार कसे चालतात ते लक्षपूर्वक पाहिले म्हणजे माझी खूप करमणूक होते. पण करमणूक तरी का म्हणायची ? विचार करता करता मला असे दिसू लागते की, आपण जास्त पैसे दिलेत खरे, पण तसे पैसे खर्च करून आपण काहीतरी विकत घेतलेच आहे. पैसे काही रस्त्यावर फेकून दिलेले नाहीत. चार दुकाने हिंडून, तपास करून एखादी वस्तू स्वस्त मिळवली म्हणून शेखी मिरवणारा एखादा आणि पहिल्याच दुकानात ती खरेदून चार पैसे जास्त देणारा एखादा यात स्वस्त-महाग कसे ठरवायचे ? दुसऱ्याने दिलेले जास्त पैसे हिंडणावळ वाचवली

म्हणून दिलेले असतात. त्या पैशांत पायपीट टाळण्याचा आराम त्याने विकत घेतलेला असतो. मग त्याला आळशी किंवा खर्चिक का म्हणून म्हणायचे?

लहानमोठ्या प्रत्येक व्यवहारात माणूस शेवटी एक सौदा पदरी पाडून घेत असतो. तो पैशांत स्वस्त असला तर सायासांत महाग असतो. पैशांत महाग लागला तर आरामात स्वस्त असतो. किंवा हा अगदी प्राकृत विचार सोडून दिला तरी पैसा देऊन प्रतिष्ठा घेणे, आत्मा विकून धन साठवणे, अभिमान सांडून ऐश्वर्य संपादणे किंवा धन नासून अहंकार पोसणे अशा अनेक प्रकारचे सौदेच ते असतात, हे थोडा विचार केला तरी कळून येईल. आणि ही सौदेबाजी आजकालची आहे असे नाही किंवा बाजारबुणग्यांची आहे असेही नाही. थोर ऋषिमुनीसुद्धा हेच करीत आले आहेत. वाल्या कोळ्याचा वाल्मीकी झाला म्हणे. माणसे मारून स्वतःच्या व कुटुंबियांच्या भरण-पोषणासाठी तो पापाचे घडे भरीत होता तेव्हा तो एक सौदा होता. त्याच्या दृष्टीने अगदी सरळ, साधा व खणकन वाजणारा. नारदांनी येऊन त्याला जरा निराळा सौदा पटवायला सांगितला. "तुझ्या पापात घरवाले वाटेकरी आहेत काय?" ही भाषाच मुळी 'वाटणीची', 'सौद्याची' होती. तसे कुणी वाटेकरी नाहीत असे जेव्हा वाल्याला दिसून आले तेव्हा त्याने काय केले? पापाचा मार्ग टाकून पुण्यसंचय सुरू केला. पुनः सौदाच. आणि कुटुंबियांचे काय झाले? काही वाईट झाले नाही. वाल्मीकीच्या अमाप पुण्यसाधनेत ते वाटेकरी झालेच की. शेवटी वाल्मीकीची पुण्याई त्यांच्या वाट्याला आली आणि त्याचे पाप त्यांच्या वाट्याला येण्यापेक्षा हा सौदा खचित अधिक चांगला होता. इंद्र काय, कर्ण काय, भीष्म काय आणि धर्म काय? येथून तेथून सारे सौदेबाज होते. आपापले सौदे पटवीत होते.

आणि इथेच माणसामाणसांत खरा फरक पडत जातो. कुणाचे सौदे पटतात, कुणाचे पटत नाहीत. सौदे पटून यशस्वी झालेली माणसे शहाणी ठरतात. ज्यांचे सौदे फसतात ती जगापुढे अयशस्वी म्हणून फडकत राहातात. त्यांच्या अपयशाच्या चौथऱ्यावर रामायणे नि महाभारते उभी राहातात.

पण आयुष्य म्हणजे निरनिराळ्या पातळ्यांवर (त्यांना उगीचच कोणी खालची पातळी आणि वरची पातळी असे म्हणतात!) अशा प्रकारे सौदे

पटवीत जाणे असते असे म्हटल्यानेच काही त्याची किंमत कमी होत नाही किंवा त्याची प्रतिष्ठा सरत नाही. केवळ दरिद्री राहाणे म्हणजेच काही शिरपेच मिरवणे नव्हे. खोल पाहिले तर एक गोष्ट दिसून येते; ती म्हणजे माणूस तथाकथित ज्येष्ठ मूल्यांचा बकवा करीत असतो तो केवळ लौकिकार्थाने त्याची साधनसंपत्ती तोकडी असते व त्या मार्गाने त्याला आपल्या यशस्वितेची पताका फडकवणे साधत नाही म्हणूनच. 'त्यागाची मूर्ती स्वार्थाच्या गादीवर शोभून दिसते' या वचनाचा मथितार्थ हाच असावा. गरिबांचा कळवळा, उच्च मूल्यांवरचे प्रेम, अभिजात कलेबद्दल निष्ठा या आणि अशासारख्या गुणसमुच्चयाची माती झालेली पाहायची असेल तर ते गुणगान करणाऱ्या भाटांची आर्थिक बाजू भक्कम करून पाहा.

एक चांगल्या प्रकारचे लेखक अमाप पैसा मिळवताच एकदम धनाढ्यांना मागे सारतील इतके रुक्ष, कठोर व भांडवलदार बनले. 'मी फक्त विशिष्ट भूमिकाच करीन' असा हट्ट धरणारे एक नटसम्राट धनप्राप्ती होते आहे असे दिसताच प्रत्येक रात्री चेहऱ्याला रंग सारवू लागले. शिक्षणाचा दर्जा संभाळणे हेच ब्रीदवाक्य असणाऱ्या एका तपोधन शिक्षणसंस्थेत पहिला वर्ग मिळवण्यासाठी 'आजचे बाजारभाव' जाहीर होऊ लागले. एक ना दोन. असे पाहिल्यावर प्रश्न पडतो की, सौदेबाज नाही कोण ? आणि आपापले सौदे पटवून यशस्वी म्हणून मिरवण्याचा खटाटोप करत नाही कोण ? व्यासपीठाचा आकार आणि उंची जास्त असली म्हणजे काही वक्त्याच्या सौदेबाजीस भागळा रंग लाभत नाही. कफनीचा घेर पायघोळ झाला एवढ्याचसाठी काही त्या बोलास मोल चढत नाही.

मग वाटू लागते की, सौदा हाच मानवी जीवनाचा पाया असेल तर मग सौदेबाजीत जास्तीत जास्त यश मिळवणे हेच आपले ध्येय का असू नये ? मग अधलीमधली स्थिती का म्हणून पत्करावी ? प्रत्येक गोष्टीबाबत तडजोड का पत्करू नये ? तत्त्वांचा आग्रह आणि उच्च, उदात्त ध्येये यांची पत्रास का म्हणून बाळगावी ?

असली मूल्ये म्हणजे बहुसंख्य दुबळ्यांचे स्वसंरक्षणासाठी पत्करलेले बुरखे असतात. एखादा महामानव यातून अपवाद म्हणून वगळता येईल. पण इतरांचे काय ? 'तीन चतुर्थांश संत हे केवळ भ्याड असतात' असे

तो क्रांतिकारक म्हणालाच होता ना? तेच खरे! "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून आणि विरोधाल तर तुम्हांला पायी तुडवून" जो ठणठणीतपणे जगतो आणि जगत राहातो तोच खरा. तेच जीवित यशस्वी आणि तेच तत्त्वज्ञान शिरोधार्य! बाकी ती सारी दुबळ्यांची केविलवाणी धडपड. ते म्हणजे 'जगून थोडें अखेर मरणें!'

माणसाच्या जीवननिष्ठेचा हा असा आलेख आहे.

आणि दैनंदिन किरकोळ गोष्टींत जो लहरीपणा माणूस करतो त्याच वैचारिक लहरीपणावर त्याची ऐतिहासिक तत्त्वज्ञाने उभी असतात. एखाद्याच्या लहरीपणाने फक्त त्याचेच वर्तन आकार घेते. पण तत्त्वज्ञ, राजे आणि कर्तृत्ववान नरपुंगवांच्या लहरीपणामुळे दळे हलतात आणि जगाच्या नकाशाचे रंग बदलतात. पण मुळात दोहोंच्याही ठिकाणी असतो तो निखळ लहरीपणा, कलंदरपणा.

आणि या साऱ्या उणिवा व कमतरता आहेत म्हणूनच माणूस, माणूस म्हणून उरला आहे. कधी कधी वाटते की, संपूर्ण पण नीरस असे दैवी जिणे वाट्याला येण्यापेक्षा अपुरे पण रंगदार असे मानवी जिणेच भोगलेले बरे. इथे दुःखे तरी आपल्या हक्काची असतात. इथे आपले अश्रू तरी निर्भेळ आपले असतात. इथे लहर आपल्याला वाऱ्यावर हेलकावे खायला सोडत असली तरी त्या लहरीचे खरे हक्कदार आपण असतो.

...आणि आपला सौदा पटो, न पटो, पण सारीपाटावर दान तरी आपण आपल्या हातांनी टाकलेले असते!

१८२९२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
८४०९५ विभाग
२९६० ०१३/०१
REFBK-0017292



ललित लेखन ▫ वाटचाल, मजल दरमजल : रा० भि० जोशी ▫ उंच आणि गारठा : शशिकांत पुनर्वसू ▫ वटाव्याची चाल : पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ▫ पांढरे केस....हिरवी मने, मनोगते : वि० द० घाटे ▫ भावमुद्रा, व्यासपर्व : दुर्गा भागवत ▫ किमया : माधव आचवल ▫ खर्डेघाशी : मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष ▫ पालखी : दि० बा० मोकाशी ▫ डोह : श्रीनिवास विनायक कुळकर्णी ▫ मौज प्रकाशने